२२०

INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING
UNIVERSITY OF MUMBAI

# तृतीय वर्ष कला

# मराठी - अभ्यासपत्रिका क्र.५

# साहित्यशास्त्र आणि साहित्यसमीक्षा

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. देवानंद शिंदे**
प्रभारी कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक :** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहाय्यक प्राध्यापक आणि सहाय्यक संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**समन्वयक :** : **डॉ. नीळकंठ शेरे**
मराठी विभाग प्रमुख,
जे. एस्. एम्. कॉलेज, अलिबाग.

**लेखक :** : **डॉ. धनाजी गुरव**
प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
महाड, जिल्हा रायगड.

: **प्रा. राजेंद्र डोंगरदिवे**
मराठी विभाग प्रमुख,
बी. एन.एन. महाविद्यालय, भिवंडी.

**पुर्नमुद्रण : ऑक्टोबर २०१७, तृतीय वर्ष कला - मराठी - अभ्यासपत्रिका क्र.५**
**साहित्यशास्त्र आणि साहित्यसमीक्षा**

**प्रकाशक :** **प्रभारी संचालक,** दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** : ACME PACKS AND PRINTS (INDIA) PRIVATE LIMITED
A Wing, Gala No. 28, Ground Floor, Virwani Industrial Estate,
Vishweshwar Nagar Road, Goregaon (East), Mumbai 400 063.
Tel. : 91 - 22 - 4099 7676

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | साहित्याचे स्वरूप: (काव्यलक्षण) | डॉ. धनाजी गुरव | १ |
| २. | साहित्याची भाषा | डॉ. धनाजी गुरव | २७ |
| ३ | साहित्याची निर्मिती प्रक्रिया | डॉ. धनाजी गुरव | ३८ |
| ४. | साहित्याचे प्रयोजन | डॉ. धनाजी गुरव | ४५ |
| ५. | साहित्याचा आस्वाद व भूमिका | डॉ. धनाजी गुरव | ६१ |
| ६. | साहित्य समीक्षा | डॉ. धनाजी गुरव | ७२ |
| ७. | वस्तुनिष्ठ प्रश्न- उत्तरे | प्रा. राजेंद्र डोंगरदिवे | ८५ |


❖❖❖❖

# तृतीय वर्ष कला - मराठी अभ्यासपत्रिका क्र.५
# साहित्यशास्त्र आणि साहित्यसमीक्षा
# अभ्यासक्रम

## घटकविषय - 'अ'

- **साहित्याचे स्वरूप : (काव्यलक्षण)**
  १. भरतमूनींचा सिद्धांत
  २. अलंकार विचार आणि वक्रोक्ती विचार
  ३. रीतिविचार
  ४. ध्वनिसिद्धांत
  ५. क्षेमेंद्राचा औचित्यविचार
  ६. प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचा अनुकृती सिद्धांत

## घटकविषय - 'ब'

- **साहित्याची भाषा**
  १. शब्दशक्ती - अभिधा लक्षणा व्यंजना
  २. वृत्त, छंद व मुक्तछंद : अलंकार
  ३. प्रतिमा (Image) आणि रूपक (Metaphar)

## घटकविषय - 'क'

- **साहित्याची निर्मितीप्रक्रिया**
  १. प्रतिभा व्युत्पत्ती आणि अभ्यास : स्वरूप व कार्य
  २. कोलरीजचा कल्पनाशक्तीचा सिद्धांत कल्पनाशक्ती (Imagination) चमत्कृतीशक्ती (Fancy) यातील स्वरूप भेदासह

## घटकविषय - 'ड'

- **साहित्याचे प्रयोजन**
  १. भारतीय साहित्यशास्त्रातील प्रयोजनविचार (भरतमूनींपासून जगन्नाथांपर्यंतचा प्रयोजनविचार)
  २. पाश्चात्यसाहित्यशास्त्रातील प्रयोजनविचार (आत्माविष्कार व जीवनभाष्य)

## घटकविषय - 'इ'

- **साहित्याचा आस्वाद व भूमिका**
  १. भट्टलोल्लट व अभिनवगुप्त यांची रसप्रक्रियेसंबंधीची मिमांसा
  २. रिचर्डस्‌चा समधात्तता/प्रेरणासंतुलनाचा सिद्धांत
  ३. ॲरिस्टॉटलचा कॅथासिसचा सिद्धांत : चित्तशुद्धीकरण आणि विरेचनवादी भूमिका

## घटकविषय - 'फ'

- **साहित्यसमीक्षा**
  १. समीक्षेची संकल्पना
  २. समीक्षेचे घटकविषय - विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन यांचा परिचय
  ३. समीक्षेचे कार्य

❖❖❖❖

## प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

### घटकविषय - 'अ'

- साहित्याचे स्वरूप - २४ गुण
  या घटकावर दोन दीर्घोत्तरी प्रश्न (प्रत्येकी १२ गुण)
  यातील प्रत्येक प्रश्नास पर्याय म्हणून दोन टीपा. (प्रत्येक टीपेला ६ गुण)

### घटकविषय - 'ब' ते घटकविषय 'फ' - ६० गुण

- या पाच घटकावर प्रत्येकी १२ गुणांचा एक दीर्घ प्रश्न व त्याला पर्याय त्या-त्या घटक विषयातील दोन टीपा येतील. (प्रत्येकी ६ गुण)

- प्रश्न आठवा हा एका वाक्यात उत्तरे लिहा.
  यात पूर्ण अभ्यासक्रमातील सर्व घटक विषयावर २० प्रश्न येतील. त्यापैकी कोणत्याही १६ प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहावीत. (गुण १६)

## संदर्भग्रंथ


१. अभिनव काव्यप्रकाश - रा.श्री.जोग
२. काव्यशास्त्र प्रदीप - स.रा.गाडगीळ
३. भारतीय साहित्यविचार - डॉ. लीला गोविलकर
४. साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समीक्षा - वसंत पाटणकर
५. नवे साहित्यशास्त्र - डॉ. यशवंत मनोहर
६. साहित्यविचार - डॉ. दत्तात्रय पुंडे, डॉ. स्नेहल तावडे
७. साहित्यविचार - दि.के.बेडेकर
८. भारतीय साहित्यशास्त्र - ग.त्र्यं.देशपांडे


❖❖❖❖

## घटक 'अ'

# १

# साहित्याचे स्वरूप

**<u>प्रस्तावना</u> -**

साहित्याचे स्वरूप समजावून घेताना प्रथमतः साहित्यविषयक काही गोष्टी माहिती असाव्या लागतात. उदा.साहित्य हे शब्दरूप असते. शब्दाच्या द्वारा साहित्याचा आविष्कार होतो. पण जे जे शब्दरूप ते ते साहित्य असे म्हणता येत नाही. रोजच्या व्यवहारातही शब्दाचाच वापर केला जातो. तसेच शास्त्रीय वाङ्मयही शब्दमयच असते. त्यामुळे साहित्यात येणारा शब्द किंवा साहित्यातील भाषा यांचे वेगळेपण कशात आहे, हे लक्षात घेणे अगत्याचे ठरते. तसेच साहित्य हे लिखित व मौखिक अशा दोन्ही रूपांमध्ये असते. साहित्यामध्ये कवितेच्या जोडीला कथा, नवकथा, कादंबरी, नाटक, निबंध, लघुनिबंध, महाकाव्य, खंडकाव्य, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मयप्रकारांचा समावेश होतो.

साहित्याचे सर्वसामान्य स्वरूप शब्द, अर्थ, गुण, दोष, अलंकार, रस, ध्वनि त्याचबरोबर औचित्य इत्यादी काव्यांच्या अंगाचे विवेचन होय. तसेच साहित्याची निर्मिती प्रक्रिया, आस्वाद, परिणाम, प्रयोजन आणि साहित्याचे प्रकार इत्यादीचा अभ्यास होय. साहित्यशास्त्राचा अभ्यास संस्कृत मधून मराठीत आला आहे. हा अभ्यास भरतमूनींच्या नाट्यशास्त्रापासून सुरू होतो तो जगन्नाथांपर्यंत. म्हणजे इसवी सनाचे पहिले शतक ते इसवी सनाचे १७ वे शतक असा जवळजवळ पावणेदोन हजार वर्षांपर्यंतचा कालखंड साहित्यशास्त्राच्या चर्चेने रंगला आहे. या कालखंडात भरतमूनी, रूद्रट, दण्डी,वामन, मम्मट, आनंदवर्धन, कुतंक, विश्वनाथ आणि जगन्नाथ पंडित या प्रमुख साहित्य मीमांसकांचा समावेश होतो.

प्राचीन भारतीय साहित्यशास्त्र हे पारमार्थिक विचारसरणीने प्रभावित झालेले नसून पूर्णपणे वस्तुनिष्ठ आणि विश्लेषणात्मक आहे. हे या साहित्याचे महान वैशिष्टये मानले जाते. त्याचबरोबर या साहित्यशास्त्राने काव्य आणि भाषा यांच्या निकटच्या संबंधावर विशेष भर दिला आहे.

भरतमूनीने आपल्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात रसकल्पनेशी संबंधित मौलिक विवेचन केले आहे व हाच ग्रंथ नंतरच्या काळातील साहित्यमिमांसेचा पाया ठरलेला आहे. शब्द आणि अर्थ यांना काव्यरूप आणि शब्दरूप कसे लाभले याविषयी अनेक साहित्यशास्त्रज्ञांनी खूप चिकित्सा केली आहे. या साहित्यशास्त्रज्ञांनी आपल्या चर्चेत एखाद्या तत्त्वाला, गोष्टीला महत्त्व देऊन काव्याच्या चर्चेत अर्थात् साहित्यशास्त्रात एक एक संप्रदाय किंवा पंथ निर्माण केला आहे. विशिष्ट विचारधारेचा म्हणजे वेगवेगळी

विचारधारा जणू पूर्णपणे वेगळी आहे. असा भास निर्माण झाला मात्र त्यामुळे साहित्यस्वरूपाची चर्चा एकांगी न बनता ती बहुअंगी किंवा बहुकेंद्री अशा स्वरूपाची बनली आहे. उदा. आपल्या नाट्यशास्त्रात भरतमूनीने रससूत्राचा अर्थात रसविचाराचा पाया घातला. भामह आणि कुतंक यांनी सुरूवातीला वक्रोक्तीविचार मांडला. वामनाने अलंकाराबरोबरच रीति अथवा गुणांना अधिक महत्त्व दिले. आनंदवर्धनाने ध्वनिसिद्धांत मांडला तर अभिनवगुप्ताने आनंदवर्धनाच्या ध्वनिसिद्धांताचा सखोल अभ्यास केला. भरताचे रससूत्र हे आपल्या विवेचनाच्या नात्याने प्रमुख तत्त्व मानले जाते. क्षेमेंद्राने औचित्यविचाराला प्राधान्य दिले आणि विश्वनाथाने '**वाक्य रसात्मक काव्य**' असे म्हणून भरतमूनींचा रसविचार पुन्हा एकदा काव्यचर्चेत अधोरेखित केला.

वर निर्देशित केलेल्या गोष्टीतून एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी की, भरतमूनीचा रससंप्रदाय, भामह, कुतंक, दण्डी यांचा अलंकार संप्रदाय, वामनाचा रीति संप्रदाय आणि क्षेमेंद्राचा औचित्य संप्रदाय असे कप्पेबद्ध विचार करणे योग्य नाही. कारण यापैकी अनेकांनी आपल्या अगोदर निर्माण झालेले साहित्यकाराचे विचार किंवा त्यांचे साहित्यशास्त्र गृहीत धरलेले आहे. उदा. ध्वनिमतप्रवर्तक आनंदवर्धनाने गुण आणि अलंकार यांचे काव्यातील स्थान नेहमी लक्षात घेतले होते. साहित्यस्वरूप विचार उत्तरोत्तर सूक्ष्म होत गेलेला आपणांस दिसतो. भरतमूनीचे रससूत्र अखेर प्रभावी ठरून या काव्यस्वरूप चर्चेला पूर्णविराम मिळतो.

संस्कृत साहित्यशास्त्र परंपरेत काव्य ही संकल्पना ललितसाहित्य या व्यापक अर्थाने वापरली जात होती. काव्याच्या अभ्यासासाठी संस्कृत साहित्यमीमांसकांनी भारतीय तत्त्वज्ञान परंपरेतील शरीर व आत्मा हे समीकरण स्वीकारले व त्यामधून काव्य सौंदर्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. आज ललितसाहित्य या शब्दाने जो बोध होतो तोच बोध 'काव्य' या शब्दाने संस्कृतात मानला जात असे. 'काव्य' हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जात असे. त्याचबरोबर काव्य म्हणजे कविता, कामिनी होय असे मानले गेले. काव्याची सुंदर अशा स्त्रीशी सांगड घातल्याने सुंदर स्त्रीच्या स्वरूपाची चर्चा होते. त्यात तिचे अलंकार, विभ्रम, कांती, चालण्याबोलण्याची पद्धती, तिचा आत्मा या अनुषंगानेच काव्याचाही विचार झालेला आढळतो.

काव्याचा आत्मा किंवा मूलभूत तत्त्व कोणते आहे ? म्हणजेच काव्य कोणत्या गोष्टीमुळे वेगळे ठरते हे दाखविण्यासाठी संस्कृत परंपरेत वक्रोक्ती, अलंकार, रीति, औचित्य, ध्वनि, रस अशा वेगवेगळ्या तत्त्वांना प्राधान्य देण्यात आले. त्यातून या परंपरेत साहित्यविषयक वेगवेगळ्या भूमिका व दृष्टिकोण निर्माण झाले. या मतांविषयी उलटसुलट चर्चाही भूमिकांच्या निर्मितीकाळात झाली आहे. या भूमिका जाणून घेणे म्हणजे या साहित्याचे स्वरूप जाणून घेणे होय.

काव्यसौंदर्याची व्याख्या करता येणे कठीण आहे. कारण काव्य व स्त्री रूपे अगम्य असतात. काव्याचा अनुभव परमेश्वरभक्तीप्रमाणे घेता येतो. या अशा प्रयत्नातूनच काव्यावर स्त्रीचे रूपक केले गेले. काव्य हे एखाद्या सजीव तत्त्वासारखे आहे. या मूलभूत

कल्पनेवर साहित्यशास्त्र उभे आहे. शब्दरूपी काव्यस्वरूपात गुण, दोष, अलंकार या संकल्पनांच्या माध्यमातून विचार केला गेला.

संस्कृत साहित्यशास्त्रात 'काव्य' हा शब्द व्यापक अर्थाने योजला जातो. पूर्वी सर्व विदग्ध किंवा ललित-अललित वाङ्मयाचा समावेश काव्य या संकल्पनेत होत असे. या अर्थाने साहित्य, वाङ्मय, सारस्वत, ललित साहित्य हे सर्व शब्दप्रयोग काव्य या परंपरेत पूर्वीच्या काळी वापरले गेले. त्यामुळे साहित्यचर्चेची किंवा काव्यचर्चेची सुरूवात प्रामुख्याने संस्कृत अभ्यासकांमध्ये सुरूवातीस काव्य या शब्दावरून झाली. म्हणजेच सुरूवातीच्या काळातसुद्धा शब्दार्थाकडून अर्थात काव्याच्या बाह्यतत्त्वाकडून काव्यचर्चेची सुरूवात झाली आहे ती पुढीलप्रमाणे -

१) **भामह** - "शब्दार्थो सहितौ काव्यम् || "
शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य.

२) **रूद्रट** - "ननु शब्दार्थो सहितौ काव्यम् || "
खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य.

३) **दण्डी** - "शरीर तावदिष्टार्थ व्यवच्छिना पदावली"
इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्य होय.

४) **मम्मट** - "तत् अदोषौ शब्दार्थो सगुणौ अनलंकृती || "
दोषरहित गुणयुक्त, क्वचित स्फुट, अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य होय.

५) **जगन्नाथ** - "रमणीयार्थ प्रतिपादक शब्द काव्यम् || "
रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य.

६) **कुतंक** - "वक्रोक्ती काव्यजिवितस्यम् || "
वक्रोक्ती हे काव्याचे जिवित आहे.

अशाप्रकारे वरील सर्व व्याख्यांमधून शब्द आणि अर्थ या काव्याच्या बाह्यतत्त्वाला महत्त्व देऊन काव्याच्या व्याख्या केल्या आहेत. त्यानंतरच्या काळात मात्र काव्याच्या आत्मतत्त्वाला महत्त्व देणाऱ्या व्याख्याचा काव्यचर्चेत सहभाग झाला.

✞✞✞✞

# अलंकार विचार

अलंकार हे संस्कृत परंपरेतील महत्त्वाचे तत्त्व आहे. अलंकारामुळे काव्यातील शब्दांचे सौंदर्य वाढते. "शब्दाने काव्याचे सौंदर्य निर्माण करणारे तत्त्व म्हणजे अलंकार" असा व्यापक अर्थ संस्कृत अभ्यासकांनी घेतला आहे. या ठिकाणी अलंकार म्हणजे कोणत्या प्रकारचा शब्दाचा की अर्थाचा अशी रचना नेमकेपणाने सांगता येत नाही. त्यामुळे "सौंदर्य निर्माण करणारी वैशिष्ट्यपूर्ण अशी शब्दयोजना" असा अर्थ घ्यावा लागतो. अलंकार ज्या ज्या ठिकाणी आहे, तेथे तेथे रूपक प्रक्रिया अभिप्रेत असते. निवेदनात्मक, नाट्यात्मक प्रकारामध्ये रूपकप्रक्रिया सर्वत्र दिसते आणि ती या प्रकारचे प्राणतत्त्व आहे. असे नेमकेपणाने म्हणता येत नाही. अलंकार म्हणजे काव्याचा आत्मा असे कोणत्याही संस्कृत साहित्यशास्त्र मीमांसकाने सांगितलेले आढळून येत नाही.

वामनाने अलंकाराची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे - '**काव्यं ग्राह्यं अलंकारात्** |' '**सौंदर्यम् अलंकारात** ||' (अलंकारामुळे काव्य ग्राह्य होते. सौंदर्य हाच अलंकार होय) सुरूवातीला अलंकार हे काव्याचे प्राणभूत तत्त्व होते. दण्डी, वामन, भामह यांनी काव्याच्या तत्त्वनिर्णयासाठी अलंकार कल्पनेला महत्त्व दिले. स्त्रीच्या संदर्भात विचार करता प्रथम तिला सौंदर्य प्राप्त करून देणारे भूषणे वा अलंकारच डोळ्यात भरतात.

## वक्रोक्ती विचार -

नाटकामध्ये नाट्यधर्मी गुणामुळे सौंदर्य निर्माण होते. तर काव्यात हे सौंदर्य कशामुळे निर्माण होते. या प्रश्नाचे उत्तर देताना वक्रोक्ती या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला. भामहाने अलंकाराचे मूळ वक्रोक्तीत आहे असे सांगितले. भामह अतिशयोक्तीला वक्रोक्ती मानतो आणि वक्रोक्तीशिवाय अलंकारच होत नाहीत हे स्पष्टपणे सांगतो.

**सैषा सर्वैव वक्रोक्तिः अनयार्थो विभाव्यते |**

**यत्नो ऽस्या कविना कार्यः को ऽलंकारो ऽनया विना ||**

(भामह - काव्यालंकार परिच्छेद २ श्लोक ८५)

वक्रोक्तीबद्दल Stright is the line of duty

Curve is the line of beauty

असे म्हटले जाते. त्यातूनही वक्रोक्तीची महती सांगितली आहे.

कुंतलाने तर वक्रोक्ती हे काव्याचे जीवित मानले आहे. वक्रोक्ती तत्त्व हे काव्याचे श्रेष्ठ तत्त्व मानले आहे. काव्याचा आत्मा वक्रोक्ती असे त्याने मानले नाही पण या वक्रोक्तीशिवाय शब्दार्थांना रसत्व प्राप्त होत नाही, असे त्यांना वाटते. त्याच्या मते -

**'वक्रोक्तीरेव वैदग्ध्यभङ्गीभणितिरुच्यते |'**

(कुंतल - वक्रोक्तीजीवित, उन्मेष १ श्लोक ११)

म्हणजे 'विदग्ध लोकांची बोलण्याची पद्धती' अशी वक्रोक्तीची कुंतलाने व्याख्या केली आहे. या वक्रतेमुळे ललित साहित्यात सौंदर्य निर्माण होते. म्हणून तेच ललित साहित्याचे प्राणतत्त्व होय. अशी भूमिका वक्रोक्तीकारांनी घेतली. कुंतलाने वक्रोक्तीला प्रतिष्ठित करण्याचा प्रयत्न केला आहे. वक्रता, वैचित्र्य, वैदग्ध्य आणि शोभा या संज्ञाचा उपयोग एकाच अर्थाने कुंतलाने केला आहे.

कुंतलाने वक्रोक्तीचे पदपूर्वाधवक्रता, पदपरार्धवक्रता, वाक्यवक्रता, प्रकरणवक्रता, प्रबंधवक्रता, प्रत्ययवक्रता, वर्णविन्यासवक्रता असे प्रकार केले आहेत. कुंतल ध्वनींचा अंतर्भाव वक्रतेत करतो. त्यामुळे त्याला ध्वनीचे स्वतंत्र अस्तित्वच मान्य नाही. वक्रोक्ती विचाराला कुंतलाने चालना दिली. वक्रोक्ती म्हणजे सरळ नसलेले बोलणे.


भामह आणि दण्डी अतिशयोक्तीलाच वक्रोक्ती समजतात. त्यामुळे काव्याला शोभा येते असे मानतात. दण्डीने वाङ्मयाचे दोन वर्ग पाडले आहेत.

**वाङ्मयाचे वर्ग**

**स्वभावोक्ती** — **वक्रोक्ती (अलंकार, वाङ्मय**

भामह हा 'वक्र' शब्द काव्यातच योजितो. मम्मटाने ही अतिशयोक्ती अलंकार प्रमाणभूत मानली आहे. भामह व कुंतल हे वक्रोक्तीला काव्याचे प्राणतत्त्व मानतात. अभिनय हा ज्या अर्थाने नाट्याचा प्राण वाटतो, त्या अर्थाने वक्रोक्ती हा काव्याचा प्राण होय. काव्यातील सर्व चमत्कृतीच्या मूळाशी वक्रोक्ती आहे. वक्रोक्तीशिवाय काव्याला 'काव्य' ही पदवी येऊ शकत नाही, असे भामह म्हणतो. नाटकामध्ये नाट्यार्थ अभिनित होतो. व्यक्त होतो. तर काव्यात तोच अर्थ वक्रोक्तीमुळे व्यक्त होतो. अभिनय हा नाट्यधर्मी आहे. तर अलंकार ही वक्रोक्ती आहे. लोकधर्मीची (लोकस्वभाव) नाट्यधर्मीतून (अंगादी अभिनय) प्रचिती येणे म्हणजे नाट्य होय. तर लोकस्वभावाची वक्रोक्तीतून प्रचिती येणे म्हणजे काव्य होय.

अभिनवगुप्ताच्या मते, नाट्यातील लोकधर्मी व नाट्यधर्मी यांच्या स्थानिक काव्यात स्वभावोक्ती व वक्रोक्ती हे दोन प्रकार येतात. यातून काव्यात रसनिर्मिती होते. नाटकातील अभिनयाचे कार्य काव्यात शब्दांना करायचे असते. म्हणूनच नाटकातील नाट्यधर्मी काव्यात वक्रोक्तीचे रूप धारण करतो.




वक्रोक्ती हे काव्याचे व्यवच्छेदक लक्षण मानता येईल का ? ते काव्याचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे यात शंका नाही. पण ते एकमेव तत्त्व आहे का ? वक्रोक्ती विचार सर्व साहित्यप्रकारांना तसेच सर्व प्रकारच्या साहित्यात समावेशक आहे का ? या प्रश्नांची उत्तरे नकारात्मक पद्धतीने द्यावी लागतील. भावकवितेसारख्या प्रकाराने वक्रोक्तीविचार महत्त्वपूर्ण ठरेल. परंतु कादंबरीसारख्या प्रकाराचे त्यातल्या त्यात वास्तववादी परंपरेचे मर्म वक्रोक्ती या तत्त्वाने सांगता येणे शक्य नाही. काही वेळा शब्द व अर्थ याची वक्रता केवळ चमत्कृतीकारक असलेली दिसते. म्हणजेच वक्रोक्ती हे काव्याचे तत्त्व मानले तरी ते एकमेव तत्त्व मानता येत नाही.

✞✞✞✞

# ७

# रीतिविचार

इसवी सनाच्या नवव्या शतकाच्या सुमारास होऊन गेलेल्या वामनाने रीतिला काव्याचे प्राणभूत तत्त्व मानले आहे.

**रीतिरात्मा काव्यस्य, विशिष्टा पदरचना रीति :**

(काव्यालंकारसूत्रवृति, अधिकरण १ अध्याय २ सुत्रे ६-७)

अशी वामनाने रीतिची व्याख्या केली आहे. रीति हे काव्याचे प्राणतत्त्व होय, सौंदर्यतत्त्व होय आणि रीति म्हणजे शब्दाची विशिष्ट पद्धतीने केलेली रचना होय. असे वामनाचे म्हणणे आहे. शब्द आणि त्यांचे अर्थ यात प्रसाद, ओज, माधुर्य, सुश्लिष्टता, प्रौढी, अर्थव्यक्ती इत्यादी गुण असतात. विषय आशय कोणताही असला तरी तो रचनेच्या केवळ पद्धतीमुळे ललित होतो. पुढे वामन म्हणतो –

**"काव्यशोभाया : कर्तारो धर्मा गुणा :"**

काव्यालंकारसूत्रवृति – संपा कवी नगेंद्र १९५४, ३.१.१

म्हणजे गुण हे ललित साहित्याला शोभा देणारे विशेष होय. म्हणजे रीति, गुण हे साधन आहे. सौंदर्यगुण हा अलंकार आणि दोषशून्यता यामुळे उत्पन्न होतो, असेही वामन म्हणतो. त्यामुळे रीति, गुण हे सौंदर्यसिद्धीचे तंत्रे आहेत. वामनाची रीति विषय, आशय, अनुभव, जीवनदृष्टी, जीवनार्थ यांच्याशी कोणताही संबंध प्रस्थापित करीत नाही. ती केवळ कसे सांगावे याचे तंत्र सांगते.

वामनाचा रीतिविचार म्हणजे केवळ शब्द सौंदर्याचा विचार नव्हे. त्याच्या विचारात काव्यार्थाचे विभावन कोणत्या तंत्रामुळे होते या विचारालाच प्राधान्य होते. 'विशिष्टा पदरचना रीति' या सूत्रामध्ये वामनाला गुणयुक्त रचना अभिप्रेत आहे. म्हणजेच 'गुणयुक्त पदबंध' असा अर्थ अभिप्रेत आहे. शब्द आणि अर्थ हे काव्यशरीर मानले तर त्या शब्दार्थाच्या ठिकाणी सौंदर्यरूपी आत्मा कसा तयार होतो. याचाच विचार वामनाने केला आहे.

रीति हा काव्याचा आत्मा होय हा आपला प्रसिद्ध सिद्धांत मांडून पुढे त्याने या रीतिविचाराचे स्पष्टीकरण केले आहे. या संदर्भात पुढील सूत्रे महत्त्वाची आहेत.

१) **रीतिरात्मा काव्यस्य** –
२) **विशिष्टा पदरचना रीति** –
३) **विशेषो गुणात्मा -**

रीति हा काव्याचा आत्मा होय. विशिष्ट अशी पदरचना म्हणजे रीति आणि पदरचनेचे हे वैशिष्टे म्हणजे गुणयुक्तता. या तीन सूत्रात वामनाने आपले रीतिविवेचन केले आहे.

"काव्यशोभाया : कर्तारो धर्मा गुणा :" ही गुणांची व्याख्या व वरील तीन सूत्रे वाचली असता वामनाच्या रीतिविचाराचे मर्म ध्यानात येते. अलंकार हे काव्याचे सौंदर्य वाढविणारे आहेत तर गुण हे काव्याच्या अंगभूत आहेत. गुण हे नित्य आहेत तर अलंकार हे अनित्य आहेत. सुंदर स्त्रीचे लावण्य हा तिचा नित्य गुण होय. पण तिने शरीरावर धारण केलेले अलंकार हे केवळ मूळचे सौंदर्य खुलविणारे बाह्य कारण होय. वामनाने रीतिविचारात अलंकारापेक्षा गुणांना महत्त्व अधिक दिले आहे.

एखाद्या युवतीचे रूप गुणांनी युक्त असल्यास अलंकाराशिवायही ती सुंदर दिसते. तर अलंकारामुळे मूळचे सौंदर्य अधिक खूलून दिसते. परंतु सौंदर्यहीन शरीरावर कितीही अलंकार घातले तरी काय होणार ? काव्याचीसुद्धा अशीच अवस्था आहे. गुणयुक्त काव्य हेच श्रेष्ठ काव्य होय. माधुर्य, प्रसाद, ओज, कांती हे केवळ शब्दगुण नव्हेत तर वामनाला यामध्ये अर्थसौंदर्य अभिप्रेत आहे. गुण आणि अलंकार यांच्या समन्वयालाच त्याने रीति हे नाव दिले आहे. त्यामुळे तो केवळ शब्दरचनेला महत्त्व देतो असा समज रूढ झाला होता.

पदरचना म्हणजे केवळ शब्दरचना नव्हे. काव्यामध्ये सुंदर शब्दाची निवड केली जाते हे योग्य आहे. परंतु शब्दरचना म्हणजे शब्दसौष्ठव नव्हे. प्रसाद, माधूर्य हे गुण पदबंधाच्या ठिकाणी असतात. गुण जसे शब्दाच्या ठिकाणी असतात तसे ते अर्थाच्या म्हणजे आशयाच्या ठिकाणीही असतात. तेजाच्या रूपानेच सूर्य व्यक्त होतो. गोडी या धर्मामूळेच विशिष्ट पदार्थाला साखरपण लाभते. आत्मा ही अव्यक्त कल्पना असली तरी ती धर्माच्या द्वारेच व्यक्त होतो. वामनाने अगदी याच अर्थाने रीतिला काव्याचा आत्मा मानले आहे.

वामनाची ही रीती मराठीत शैली केवळ पदरचना व शब्दश्रेष्ठत्व यांच्याशी (Style) तुलना करून समजून घेतली गेली. रीति म्हणजे शैली असे समजून डॉ. रा.श.वाळिंबे यांनी तिच्यावर आक्षेप घेतले. डॉ.स.रा.गाडगीळ यांनी म्हटले आहे की, "शैली वा रीति एक नव्हेत. शैलीचा भर काव्याच्या बाह्य अंगावरच आहे. तर रीति काव्याच्या बाह्यभागापूरती मर्यादित नाही. तर आंतरिक अनुभूतीचा सम्यक आविष्कार म्हणजे रीति होय आणि शैली म्हणजे शब्द व अर्थ यांची काव्यात योजना करण्याची विशिष्ट पद्धत होय. कवी प्रतिभेनुसार काव्यशैली भिन्न भिन्न प्रकारे प्रकट होते. हा सार्वत्रिक अनुभव आहे. काव्यशैलीला या शास्त्रात रीति किंवा मार्ग असे नाव आहे."

डॉ.नागेंद्र यांनी याबाबत पुढील निष्कर्ष काढले आहेत.

i) शैली व रीती यांचे वस्तुनिष्ठ रूप एकच आहे.
ii) रीतीमध्ये वैयक्तिकतेचा घटक सर्वस्वी अमान्य केलेला नाही.

iii) शैलीच्या स्वरूपात वैयक्तिकतेच्या अंशाला जेवढे महत्त्व आहे तेवढे रीतिमध्ये कधीच मानले नाही. तिच्यात वस्तुनिष्ठ अंशाचेच महत्त्व अधिक प्रमाणात मानलेले आहेत.

iv) म्हणून रीति व शैली यामध्ये वैयक्तिकतेच्या अंशाच्या प्रमाणात भिन्नता आहे.

रीतीमध्ये काय सांगायचे आहे यापेक्षा कसे सांगितले यावर भर आहे. असा आक्षेप घेतला गेला हा वामनाच्या रीतिविचारावरील आक्षेप गैरसमजाने घेतला आहे.

## रीतीचे प्रकार -

'रीतिरात्मा काव्यस्य' असे म्हणून वामनाने काव्याचे प्राणतत्त्व रीति मानले आहे. विशिष्ठ पदरचनेच्याद्वारे ही रीति निर्माण होते व रचनेचे हे वैशिष्ट्ये गुणाच्या द्वाराच निर्माण होते. म्हणूनच रीति विवेचनात गुणाना महत्त्वाचे स्थान लाभले आहे. या गुणांच्या अनुरोधानेच त्याने रीतीचे तीन प्रकार सांगितले आहेत -

i) वैदर्भी -

ii) पांचाली -

iii) गौडी -

हे शब्द प्रादेशिकता दाखवितात. वैदर्भी रीतीत सुगमता, स्वाभाविकता, संयम, सुक्ष्म माधुर्य इत्यादी गुणांचे दर्शन होते. महाकवी कालिदासाची वैदर्भी रीती प्रसिद्ध आहे.

गौडी रीतीत प्रौढता, कृत्रिमता, अलंकारिकता, अतिशयोक्ती इत्यादी गुणांना महत्त्व होते. कवी भवभूती या रीतीसाठी प्रसिद्ध आहे. तर पांचाली रीती त्या-त्या लेखकाच्या मनोवृत्तीवर अवलंबून असते. उदा. मराठीत गोविंदाग्रज हे अलंकारिकतेला प्राधान्य देत असत. तर कवी विनायक लालित्याला महत्त्व देत असत. वैदर्भी व गौडी रीतीबरोबरच इतरही काही रीतीचा प्रभाव साहित्यावर होता. उदा. वामनाची पांचाली रीती, राजशेखरची मागधी रीती.

१) रीतीरात्मा काव्यस्य ही व्याख्या कोणाची ?

२) रीतीचे प्रमुख प्रकार कोणते ?

✞✞✞✞

# भरतमूनींचा रससिद्धांत

रसविचार ही भारतीय साहित्यशास्त्रातील सर्वात प्राचीन व सर्वात प्रमुख विचारधारा आहे. अलंकार, ध्वनी, रीती, वक्रोक्ती या विचारधारांचा विकास रसविचाराच्या नंतर पण रसविचाराच्या अनुरोधाने झाला आहे. रसविचार प्रथम भरतमूनींनी आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथात मांडला आहे.

तत्र विभाव अनुभाव व्याभिचारी संयोगाद्रसनिष्पत्ती : | हे त्याचे प्रसिद्ध रसविषयक सूत्र आहे. भरतमूनींच्या आधी किमान दोन शतके यावर विचार सुरू झाला असावा. ज्याप्रमाणे सर्व नद्या शेवटी सागराला येऊन मिळतात. त्याप्रमाणेच भारतीय साहित्य विचारातील सर्व सिद्धांत शेवटी रसविचारालाच येऊन मिळतात.

**इतिहास पाहता रसाचे तीन अर्थ जाणवतात.**

i) **भावमूलक काव्यसौंदर्य -**
म्हणजे रस हे शब्दार्थाद्वारा साधलेली कवीच्या निर्मितीक्षम भावनेची कलात्मक अभिव्यक्ती होय. म्हणजे रस हा काव्यगत होय. ‘रस इति कः पदार्थ’ या सूत्राद्वारे हाच वस्तुनिष्ठ अर्थ अभिप्रेत आहे.

ii) **भावनिष्ठ किंवा भावमूलक -**
म्हणजे भावनिष्ठ किंवा भावमूलक काव्यसौंदर्याची रसिकाला येणारी अनुभूती हा होय. या ठिकाणी सहृदय रसिक वाचकाच्या चित्तामध्ये उद्‌भवलेली सुखदु:खमय भावनिक जाणीव हा रसाचा अर्थ मानला आहे.

iii) **आनंदपर अर्थ -**
रसाचा तिसरा अर्थ आनंदपर आहे. काव्याच्या परिशीलनाने विशुद्ध भावनांच्या द्वारे मनाची जी आनंदमय अवस्था होते त्याला आनंदपर रस असे म्हणतात.

## भरताचे रससूत्र -

भरतमूनींच्या ‘**नाट्यशास्त्र**’ या ग्रंथात ३६ व्या अध्यायातील सहाव्या स्कंदात रसाच्या स्वरूपाचे विवेचन केले आहे. तर सातव्या स्कंधात विभाव, अनुभाव, स्थायिभाव, सात्विकभाव, व्याभिचारीभाव यांचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे.

भरताचा रससिद्धांत प्रामुख्याने नाट्यावर आधारलेला आहे. भरताच्या रसविचारात काव्य किंवा साहित्य या शब्दांना स्थान नाही. परंतु नाटक हा साहित्याचाच भाग आहे. इतकेच नव्हे तर भरतानंतर भामह, दण्डी, रूद्रट, अभिनवगुप्त यांनी जे रसविवेचन केले आहे. त्यात काव्याचाही विचार केलेला आहे.

रस म्हणजे रसाविष्कार आणि रसाविष्कार नाही म्हणजे नाट्यप्रयोगच नाही असे भरताचे मत होते. या दृष्टीने भरताने रससूत्र सांगितले आहे.

**"तत्र विभावानुभाव व्याभिचारी संयोगाद्रसनिष्पती :|"**

यात विभाव, अनुभाव, व्याभिचारी भाव यांचा संयोग झाला म्हणजे रसनिष्पत्ती होते. रसनिष्पत्ती म्हणजे रसाविष्कार, रस व्यक्त होणे. भरताच्या या सूत्रातील विभाव-अनुभाव-व्याभिचारीभाव हे शब्द महत्त्वपूर्ण आहेत. ते समजून घेतल्याशिवाय आपल्याला रसनिष्पत्ती या शब्दाचा खऱ्या अर्थाने बोध होणार नाही.

## १) विभाव –

विभाव म्हणजे ज्ञान करून देणे, प्रकाश पाडणे असा आहे. विभावामुळे वाचिक, अंशिक व सात्त्विक अशा तीन प्रकारच्या अभिनयाची प्रतीती होते. लोकव्यवहारात त्याला कारण म्हणतात. तेच नाट्यात विभाव असतात आणि लोकव्यवहारात ज्यांना कार्य म्हणतात त्यांना नाट्यात 'अनुभाव' असे म्हणतात. लोकव्यवहारात एखाद्या चित्तवृत्तीचा उद्‌भव झाल्याचे आपण कार्यकारणावरून अनुमान करतो. उदा. एका बागेत एक तरूणी आपल्या प्रियकराची वाट पाहते. तो दूर अंतरावरून दिसताच तिच्या डोळ्यांचे विलास सुरू होतात. गालावर लाली उमटते. ती आपल्या पदरावर चाळा करते आणि तेवढ्यात तो प्रियकर जवळ येतो. येथे त्या तरूणीच्या दृष्टीने विचार केला तर त्या प्रियकराचे दर्शन हे तिच्या प्रणयोद्‌भावाचे (चित्तवृत्तीचे) कारण होय. पण हे दृश्य दुरून पाहणारे आपण जेव्हा तिच्या प्रियकर येण्याचा तर्क अनुमान करतो व तो प्रियकर आपल्याला दिसल्यावर आपली जिज्ञासा थांबते. तिथेच आपला या दृश्याशी संबंध संपतो. त्यात आपण तन्मय होऊन जात नाही. जेथे तिच्या प्रणयोद्‌भावाचे कारण व कार्य व आपण केलेला तर्क या दोन्ही गोष्टी लौकिक आहेत. प्रेयसीच्या चित्तवृत्तीची निष्पत्ती आणि त्यामुळे तिच्या अवयवांची होणारी हालचाल हे त्याचे कारण आहे. व्यवहारात ज्या गोष्टींना कारण म्हटले त्याच गोष्टीला काव्यात 'विभाव' असे म्हणतात आणि ज्याला कार्य म्हटले जाते त्याला 'अनुभाव' असे म्हटले जाते.

विभाव हे दोन प्रकारचे असतात.

अ. आलंबन विभाव - ज्यावर रसनिष्पत्ती अवलंबून त्याला आलंबन विभाव म्हणतात.

ब. उद्दीपन विभाव - आलंबन विभावाच्या उद्दीपनास उपयुक्त ठरणाऱ्या अन्य परिस्थितीस उद्दीपन विभाव असे म्हणतात. (थोडक्यात काव्यगत पात्राचे भाव ज्या कारणामुळे उद्दीपीत होतात त्यांना उद्दीपन विभाव असे म्हणतात.)

## २) अनुभाव -

अनुभाव म्हणजे उत्पन्न झालेल्या चित्तवृत्तीचे बाह्यपरिणाम. प्रस्तुत उदाहरणातील प्रेयसीच्या डोळ्यांचे विभ्रम, गालावरची लाली, पदराशी चाळा हे येथे नाट्यातील अनुभाव आहेत. रती, हास, शोक इ. स्थायी भावांना व्यक्त करणाऱ्या आश्रयाची कृती व हालचाली म्हणजे अनुभाव होय. ते भावाच्या मागोमाग येतात म्हणून त्यांना अनुभाव म्हणायचे. एखाद्या

माणसाच्या कृतीवरून किंवा हालचालीवरूनच आपण त्याच्या भावनांची ओळख करू शकतो. उदा.विरह व्याकूळ नायक, नायिकेचे हुंदके देणे, मिलन प्रसंगी आनंदाश्रू येणे, रोमांच, खेद, क्रोधप्रसंगी डोळे लाल होणे इ.

**अनुभाव म्हणजे भावजन्य कार्य. अनुभावाचे चार प्रकार मानले गेले आहेत.**

i) **अंगिक** –
ii) **वाचिक** –
iii) **सात्त्विक** –
iv) **आहार्य** –

अंगिकमध्ये शारीरिक कृती, हालचाली वा हावभाव येतात. वाचिकमध्ये संवाद, संभाषण यांचा समावेश होतो. सात्त्विक अनुभावामध्ये सुक्ष्म मानसिक क्रियांचा समावेश होतो आणि आहार्य अनुभावमध्ये वेशभुषेतील पर्यावरण येतात.

### ३) व्याभिचारीभाव -

स्थायीभावाचे अभिप्रेत कार्य करण्यासाठी सहाय्यक असलेले भाव जे स्थिर नाहीत पण कायम असतात. त्यांना व्याभिचारी भाव असे म्हणतात. व्याभिचारी भावालाच संचारीभाव असेही म्हणतात. व्याभिचार म्हणजे एक प्रकारचा संचारच. हे व्याभिचारी भाव ३३ आहेत.

स्थायीभाव व व्याभिचारीभावात फरक असा आहे की, स्थायिभाव बराच काळ टिकणारे असतात. रती, शोक, क्रोध इ. भाव हे स्थायिभाव असून ते निर्वेध, ग्लानी, लज्जा यांच्या मानाने अधिक काळ टिकणारे असतात. विशेष म्हणजे व्याभिचारी भाव हे नेहमी दुसऱ्या कोणत्याही स्थिर स्वरूप असलेल्या चित्तवृत्तीच्या अनुषंगाने उद्‌भवत असतात. ते स्वतंत्रपणे उद्‌भवत नाहीत. व्याभिचारी भावांमध्ये १४ शारीरिक अवस्था, ०३ ज्ञानात्मक मनोवस्था व १६ भावनात्मक मनोविकार आहेत. एकच संचारी भाव अनेक स्थायीभावाबरोबर येऊ शकतो. म्हणून त्यांना व्याभिचारी भाव असेही म्हणतात. निर्वेध, ग्लानी, शंका, असूया, मद, मोह, विशाद, गर्व, आवेग, उन्माद, स्मृती, निंदा, विमोद,मती, हर्ष इ. व्याभिचारी भाव आहेत.

### ४) अष्टसात्त्विकभाव -

भरताचे स्थायी व व्याभिचारी भावाप्रमाणेच ८ सात्त्विकभावांचा उल्लेख केला आहे. हे अष्टसात्त्विकभाव पुढील प्रमाणे आहेत.

i) **स्वेद** – घाम
ii) **स्तंभ** – शरीर ताठ होणे

iii) **रोमांच** – अंगावर काटा उभा राहणे

iv) **स्वरभंग** – आवाजात बदल होणे

v) **वेपथू (कंप)** – शरीराला कंप फुटणे

vi) **वैवर्ण्य** - चेहरा पांढरा पडणे

vii) **अश्रु** – पाण्याने डोळे डबडबणे

viii) **प्रलय** – निश्चेष्ट होऊन पडणे

## ५) स्थायीभाव -

प्रत्येकाच्या अंतःकरणात जन्मतःच काही मनोविकार विद्यमान असतात. त्यांना कोणीही रोखू शकत नाही. त्यांना स्थायीभाव म्हणतात. हे स्थायीभाव रसरूपी अंकुरांचेही बीज होत. स्थायीभाव म्हणजे मानवी चित्ताच्या भावना व संस्कार होत. ते सर्व मानवात सुप्तरीत्या असतात. रसिकाच्या चित्तातील हे वासनारूप स्थायीभावसुद्धा विभाव अनुभवादी बाह्यकारणांनी जागृत होतात. कोणताच विरोधीभाव त्यांना नष्ट करू शकत नाही. हे स्थायीभाव इतर भावांना आपल्यात विलीन करून घेऊ शकतात. स्थायीभाव आठ आहेत. त्यात रती, शोक, उत्साह, जुगुप्सा, क्रोध, भय, विस्मय, हास हे भरतमूनीने सांगितलेले स्थायीभाव आहेत.

भरतमूनीच्या रससूत्रात विभाव अनुभाव व व्याभिचारीभाव यांचा समावेश आहे. मात्र स्थायीभावाचा उल्लेख आलेला नाही. भरताने रसाचा विचार मांडताना केवळ आठच रस मानले आहेत. शृंगार, रौद्र, वीर, बिभत्स या रसापासून अनुक्रमे हास्य, करूण, अद्‌भुत आणि भयानक हे उपरस उत्पन्न होतात असे सांगितले आहे. यामुळे पहिले चार रस प्रधान असून उरलेले चार रस उपरस आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुलभूत रस → | शृंगार | रौद्र | वीर | बिभत्स |
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| उपरस → | हास्य | करुण | अद्‌भुत | भयानक |

भरतप्रणित आठ रसांचे स्थायीभाव पुढीलप्रमाणे सांगता येतील.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रस → | शृंगार | वीर | हास्य | अद्‌भुत | रौद्र | करूण | बिभत्स | भयानक |
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| स्थायीभाव → | रती | उत्साह | हास | विस्मय | क्रोध | शोक | जुगुप्सा | भय |

**एका वाक्यात उत्तरे लिहाः**

**१) भरतमूनीने कोणता ग्रंथ लिहिला ?**

भरतमूनीने नाट्यशास्त्र हा ग्रंथ लिहिला.

**२) भरताने कोणते रससूत्र सांगितले ?**

विभावअनुभाव व्याभिचारी संयोगाद्रसनिष्पत्ती हे सूत्र सांगितले.

**३) विभावाचे प्रकार कोणते ?**

विभावाचे आलंबन विभाव आणि उद्दिपन विभाव हे दोन प्रकार आहेत.

**४) अनुभावाचे प्रकार कोणते ?**

| | |
|---|---|
| अंगिक | सात्त्विक |
| वाचिक | आहार्य |

**५) भरतमूनीने सांगितलेले आठ रस कोणते ?**

| | |
|---|---|
| शृंगार | रौद्र |
| वीर | बिभत्स |
| हास्य | करूण |
| अद्‌भुत | भयानक |

✞✞✞✞

# ध्वनिसिद्धांत

संस्कृत साहित्यशास्त्राला ध्वनिसिद्धांताने वेगळे वळण दिले आहे. त्यामुळे ध्वनी सिद्धांताला फार महत्त्वाचे स्थान आहे. ध्वनिसिद्धांत हा सर्वाधिक मान्यताप्राप्त सिद्धांत आहे. कोलरीज ते पुढे आजपर्यंतच्या समीक्षकांनी या सिद्धांतावर भर दिला असल्याने त्यामुळे तो जूनाच सिद्धांत आहे असे मानले जाते.

ध्वनिसिद्धांत रससिद्धांताचा विस्तार असून भरताची नाट्यमिमांसा काव्याला लागू करण्याचा हा प्रयत्न आहे. नाट्यचर्चेतील रससंज्ञा काव्यचर्चेत ध्वनी कल्पनेतून प्रकट झाली आहे. मूळ नाट्यप्रकाराशी जी रसकल्पना संबंधित होती ती जशीच्या तशी लावून दाखविणे अवघड आहे. नाट्यात रस सुचित केला जातो. किंबहुना कलेचे सौंदर्य तिच्या सूचनक्षमतेत आहे हे एकदा मान्य झाले म्हणजे ध्वनिविचाराचे महत्त्व पटते. काव्यात त्याच्या सूचनक्षमतेचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. हाच प्रयत्न आनंदवर्धनाने ‘ध्वन्यालोक‘ या ग्रंथात केला आहे. अभिनवगुप्तच्या ‘लोचन’ नावाच्या ध्वन्यालोकवरील टिकेने अधिक प्रभावी केला आहे. या ग्रंथाचा आणि या टिकेचा अभ्यास झाल्याशिवाय साहित्यशास्त्राचे अध्ययन पूर्ण होत नाही असे प्रख्यात समीक्षक ग.त्र्यं.देशपांडे यांनी सांगितले आहे. यावरून या दोन्ही ग्रंथांचे आणि या दोघांनी मिळून मांडलेल्या ध्वनिसिद्धांताचे महत्त्व लक्षात येईल.

## ध्वनिसिद्धांताची रुपरेखा -

कविता ही शब्दात लिहली जाते. म्हणून शब्दाचे स्वरूप आणि त्या शब्दाने बनणाऱ्या वाक्याचे स्वरूप पहिले लक्षात घेणे आवश्यक आहे. वाक्याचे तीन अर्थ असतात ते पुढीलप्रमाणे -

i) **अभिधा – मुख्यार्थ**
ii) **लक्षणा – लक्षार्थ**
iii) **व्यंजना – व्यंग्यार्थ**

वाक्याचा सरळपणे जाणवणारा अर्थ म्हणजे मुख्यार्थ होय. हा अर्थ शास्त्रीय साहित्याच्या मांडणीत महत्त्वाचा असतो. इतर शब्दार्थ शास्त्रीय मांडणीत बाधक ठरण्याचा संभव असतो. दैनंदिन व्यवहारात बहुधा वाक्याचा मुख्यार्थच अभिप्रेत असला तरी कधी-कधी आपण लक्ष्यार्थही वापरतो. उदा. रामा घरी गेला. या वाक्याचा सहजपणे मुख्यार्थ जाणवतो.

लक्ष्यार्थ म्हणजे सरळ अर्थ न घेता दुसराच अर्थ लक्षणेने घेण्याची आवश्यकता निर्माण करणारा तो लक्षार्थ होय. उदा. रामा घरावरून गेला. या वाक्याचा मुख्यार्थ रामा घरावर चढला, उतरला आणि गेला असा घेऊन चालत नाही.

ज्या ठिकाणी वाक्यार्थ (मुख्यार्थ) गौण होऊन सूचित होणारा अर्थ महत्त्वाचा ठरतो. तेथे वाक्य व्यंग्यार्थी होते. उदा. सूर्य अस्ताला गेला. या वाक्याने संध्याकाळ झाली असे सूचित होते. पण त्याचा अर्थ वेगळाही होऊ शकतो. या वाक्यातून चोराला चोरी करण्याच्या तयारीला लागण्याची सूचना मिळेल. गुराख्याला गुरे घरी नेण्याची सूचना मिळेल हा व्यंग्यार्थ होय.

काव्य विशेषतः उत्कृष्ट काव्य प्रामुख्याने व्यंग्यार्थ प्रधान असते. ध्वनीचे लौकिक, अलौकिक असे दोन प्रकार आहेत. लौकिक ध्वन्यार्थ वाक्यार्थानेही सांगितला जातो. उदा. बालकवीच्या 'औदुंबर' या कवितेतील 'पाय टाकूनी जळात बसला असला औदूंबर' बेंडलीनने म्हटले आहे की, उत्कृष्ट काव्याभोवती असंख्य व्यंजनांचे आवरण पसरलेले असते. कवी आपल्याला एका गोष्टीविषयी सांगत असतो पण या एका गोष्टीत सर्वांचे गुण दडलेले असतात. हे सर्व लक्षात घेतले म्हणजे ध्वनीचे काव्यातील महत्त्व लक्षात घेईल. व्यंजनाव्यापारानेच काव्याला अलौकिकता येते, हाच ध्वनिसिद्धांताचा सारांश आहे. कवीला जशी सर्जनासाठी (नवनिर्मितीसाठी) प्रतिभा आवश्यक असते. तशीच ती रसिकाला व्यंग्यार्थ समजण्यासाठी आवश्यक असते. असा परिणाम घडवून आणणारी शक्ती म्हणजे प्रतिभा होय. ध्वनिविचाराच्या अनुषंगाने कवी प्रतिभेचाही विचार होऊ लागला आणि व्यंग्यार्थ हा शब्दाचा अर्थ नसून कवीच्या शब्द व्यापार व्यापार ठरत असल्याने कवीच्या उद्दिष्टांचाही विचार सुरू झाला.

## ध्वनीचे प्रकार -

ध्वनिविचारात व्यंजना महत्त्वाची असते. त्या व्यंजनेचे शाब्दीव्यंजना व आर्थी व्यंजना असे दोन प्रकार पडतात. शाब्दी व्यंजनेचे अभिधामुलक व्यंजना व लक्षणामुलक व्यंजना असे दोन उपप्रकार पडतात. आर्थी व्यंजनेचे जे प्रकार आहेत तेच ध्वनीचे प्रकार आहेत. त्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे -

**व्यंजना**

- **शाब्दी व्यंजना**
  - **अभिधामूलक**
  - **लक्षणामूलक**
- **आर्थी व्यंजना**
  - **अलंकारध्वनी**
  - **वस्तूध्वनी**
  - **रसध्वनी**

## अ) शाब्दी व्यंजना –

### i) अभिधामूलक व्यंजना –

शाब्दी व्यंजनेचा हा पहिला प्रकार आहे. जेव्हा व्यंग्यार्थ एखाद्या द्वयार्थी शब्दावर अवलंबून असतो तेव्हा हा प्रकार संभवतो. उदा. राम जोशींची छेकापन्हूती

**ii) लक्षणामूलक व्यंजना –**

काही विशिष्ठ हेतू मनात धरूनच वक्ता लक्षणेचा वापर करीत असतो. या लक्ष्यार्थामागचे प्रयोजन केवळ लक्षणा व्यापाराने कळत नाही. त्यासाठी व्यंजनेची मदत घ्यावी लागते. उदा. बालकवींची फुलराणी, संध्यातारका इ. कविता.

## ब) आर्थी व्यंजना –

या प्रकारातून व्यंजनेचे खरे सामर्थ्य प्रकट होते. एखाद्या दूयार्थी शब्दावर किंवा अलंकारावर ही व्यंजना अवलंबून नसते. संबंध काव्यपंक्तीलाच ही व्यंजना व्यापून टाकते. उदा. भा.रा.तांबे यांची 'नववधू' ही कविता.

या आर्थी व्यंजनेचे तीन प्रकार आहेत.

**i) वस्तुध्वनी –**

वाच्यार्थातून निर्माण होणारा व्यंग्यार्थ जेव्हा केवळ एखाद्या वस्तूचा किंवा कल्पनेचा आविष्कार करत असतो तेव्हा वस्तुध्वनी अलंकार निर्माण होत असतो. हा लौकिक ध्वनीचा पहिला प्रकार आहे.

**ii) रसध्वनी –**

यात रसध्वनीला अलौकिक ध्वनी म्हटले आहे. कारण तो मुख्यार्थाने कधीच प्रकट होत नाही. रसध्वनीचे आकलन होण्यासाठी रसिकाजवळसुद्धा भव्यदिव्य प्रतिभाशक्तीची आवश्यकता असते. उदा. नववधू, औदूंबर, माळाचे मनोगत इ. कविता

**iii) अलंकारध्वनी –**

यात व्यंग्यार्थ वाच्यार्थ होऊ शकतो. खरे म्हणजे अलंकार हा काव्याचा शोभादायक धर्म आहे. पण जेव्हा मुख्य अर्थाला अलंकृत करणारा अलंकार हाच प्रमुख होतो तेव्हा अलंकारध्वनी साधतो.

## ध्वनिसिद्धांत -

काव्याचा आत्मा म्हणजे त्याचे मुख्य व श्रेष्ठ आत्मभूततत्त्व हे ध्वनी अथवा सूचित अर्थ हेच आहे. असे प्रतिपादन करून काव्यविषयक विविध मते मांडण्यात आली आहेत. उदा. 'काव्यस्य आत्मा ध्वनी' म्हणजे ध्वनी हा काव्याचा आत्मा होय. वामनप्रणित रीती अथवा विश्वनाथप्रणित रस हेच काव्याचे आत्मभूत तत्त्व आहे. कुंतकप्रणित वक्रोक्ती अथवा क्षेमेंद्रप्रणित औचित्य हेच काव्याचे जीवित होय. अर्थात ही सर्व मते संदिग्ध असून व्यंग्यार्थ किंवा सूचित अर्थ हा काव्याचा आत्मा असे या सिद्धांताचे आग्रही प्रतिपादन आहे.

काव्याचा वरवर प्रतीत होणारा वाच्यार्थ हा त्यास काव्यरूप देण्यास अपर्याप्त असतो. पण वाच्यार्थापासून व त्याच्या मागोमाग प्रतीत होणारा सूचित अर्थ त्याला खरोखर

काव्यार्थ देतो हे या सिद्धांताचे मुख्य सूत्र आहे. प्रतीयमान ध्वनी, व्यंग्यार्थ इत्यादी शब्दही या दुसऱ्या अर्थाचे वाचक शब्द आहेत. तसेच व्यक्ती व अभिव्यक्ती हे शब्द व्यंजनाशक्तीचे वाचक आहेत. तथापि ध्वनी या शब्दावरूनच या सिद्धांतास नाव प्राप्त झाले आहे.

वैय्याकरणांनी शब्दार्थ चर्चेच्या संदर्भात ध्वनी व स्फोट असे दोन शब्द वापरले आहेत. शब्द म्हणजे एक किंवा अनेक वर्णाचे विशिष्ट क्रमाने केलेले उच्चारण अथवा काढलेला ध्वनी होय. त्या शब्दाच्या किंवा विशिष्ट ध्वनीच्या साहाय्याने श्रोत्यांच्या मनात शब्दत्व प्रतीत होते. हे शब्दत्व म्हणजे स्फोट होय. याच धर्तीवर अनेक शब्दांच्या वाच्यार्थापासूनच मिळणाऱ्या परंतु त्यापासून वेगळ्या अशा अर्थाची प्राप्ती जेव्हा होते तेव्हा आपल्याला ध्वनीत अर्थ प्रतीत होतो. उदा. सीता अपहरणानंतर तिचे दागिने जेव्हा सापडले तेव्हा रामाने ते दागिने लक्ष्मणास दाखविले आणि 'तू हे ओळखतोस का ?' असे त्यास श्रीरामाने विचारले. त्यास लक्ष्मणाने पुढील उत्तर दिले.

**नाही जाणत केचुरे न ओळखीत कुंडले |**
**जाणा भी नुपूरे मात्र नित्य पादाभी वंदने ||**

लक्ष्मणाचे हे उत्तर ध्वनीचे उत्तम उदाहरण समजले जाते. त्यातील वाच्यार्थ असा की, मला यातील काही दागिने ओळखता येतात काही नाही. मी केयूर आणि कुंडले ओळखू शकत नाही मात्र नुपूरे ओळखू शकतो. कारण मी दररोज सीतेच्या चरणाचे दर्शन घ्यावयचो. लक्ष्मणाची सीतेकडे पाहण्याची ही कृती अत्यंत शालीनत्त्वाची होती, हा अर्थ आपल्या लक्षात येतो.

वरील अर्थ शब्दाच्या अभिधा आणि लक्षणा आदी मान्यता पावलेल्या शक्तीच्याद्वारे मिळत नसतो तर व्यंजनाशक्तीच्या आधारे मिळतो असे या सिद्धांताचे मत आहे. अभिधा हा शब्दाचा मुख्यार्थ. या मुख्यार्थाला बाधा आल्यास म्हणजे मुख्यार्थ सुसंगत नसल्यास लक्षणेने अर्थ घ्यावा लागतो. त्यानेही अर्थबोध होत नसल्यास तो बाद अर्थ प्रस्तुत उदाहरणात होत नसल्याने येथे लक्षणा शक्तीही कार्य करू शकत नाही. त्यावेळी सूचित अर्थ लक्षात येतो. तेव्हा तो तिसऱ्या शक्तीमुळे प्रतीत होतो असे समजावे लागते. ही शक्ती म्हणजे व्यंजनाशक्ती होय. असे या सिद्धांतातून सूचित होते.

ध्वनीचे प्रकार बरेच असले तरी वस्तुध्वनी, अलंकारध्वनी आणि रसध्वनी हेच त्याचे मुख्य तीन आहेत. त्यापैकी रसध्वनी हा मुख्य असून वस्तुध्वनी आणि अलंकारध्वनी याची परिणती शेवटी रसध्वनीतच होते. रसनिर्मितीला ते पोषक ठरतात, असे ध्वनीवाद्यांचे म्हणणे आहे. रस एवंम वस्तुतः आत्मा असे अभिनवगुप्त आपल्या ध्वन्यालोकवरील टिकेत म्हणतो. असे असूनही 'काव्यस्य आत्मा ध्वनी' हा एक ध्वनीचा प्रकार आहे असा ध्वनीवाद्यांचा दावा आहे.

काव्यचर्चेत ध्वनी आणि शक्तीचा पुरस्कार करण्याचे पहिले श्रेय ध्वन्यालोककार आनंदवर्धन याला दिले जाते. ध्वनीकल्पना जेव्हा प्रथम प्रतिपादिली तेव्हा तिला

स्वाभाविकपणे विरोध झाला. जयद्रथाने अलंकार सर्वस्वावरील आपल्या टीकेमध्ये दोन कारिका (श्लोक) उद्‌धृत केला आणि स्वतंत्रपणे ध्वनी मताला विरोध करणाऱ्या बारा विरोधी मताचा उल्लेख केला. कित्येकाचे म्हणणे असे की, व्यंजनेने मिळणारा अर्थ हा सारा अभिधाशक्तीच्याच दीर्घ व्यापाराने मिळतो. भट्टनायक हा रसवादी असून रसध्वनीला मात्र त्याने विरोध केला होता. असे असले तरी बाराव्या शतकाच्या आरंभी मम्मटाच्या 'काव्यप्रकाश' या ग्रंथामध्ये ध्वनीला मान्यता मिळाल्यावर ध्वनिविचाराला होणारा विरोध मावळला असे म्हणता येईल.

✞✞✞✞

# औचित्यविचार

क्षेमेंद्राने काव्यचर्चेत औचित्यविचाराला महत्त्वाचे स्थान दिले आहे. तो औचित्याला रसाचे जीवित मानतो. शब्द अर्थ आणि एकूणच अभिव्यक्ती ही औचित्य विचाराची कक्षा आहे. त्याने

**"औचित्यस्य रसजीवितभूतस्य"**

(औचित्यविचार चर्चा, कारिका ३)

इथे औचित्याला त्याने रसाचे अर्थात सौंदर्याचे जीवित मानले आहे आणि औचित्याची व्याख्या करताना -

**उचित प्राहुराचार्यः सदृशं किल यस्य यत् |**
**उचितस्य च यो भावःतदौचित्य प्रचक्षते ||**

(औचित्यविचार चर्चा, कारिका ७)

**"औचित्य म्हणजे अनुरूप, योग्य, शोभेसी गोष्ट म्हणजे उचित"** अशी औचित्याची व्याख्या क्षेमेंद्र करतो.

औचित्य म्हणजे रसाचा उत्कर्ष साधणारी शब्दालंकाराची योजना होय. काव्यात अशा प्रकारची (शब्दालंकाराची) रचना नसेल तर अनौचित्याचा दोष निर्माण होतो. त्यामुळे काव्यात रसभंग निर्माण होतो. कोणतीही गोष्ट उचित असेल तरच सुंदर दिसते अन्यथा सारा विरस होतो. वस्तू कितीही सुंदर असूनही तिची अयोग्य ठिकाणी मांडणी केल्यास सौंदर्यहानी होते. हेच अनौचित्य होय.

औचित्य म्हणजे उचितता किंवा योग्यता होय. वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर शब्द अर्थ गुण, अलंकार,रस यांच्या योग्यतेवरच काव्याची योग्यता अवलंबून असते. करूणरसामध्ये ओजस्वी शब्दरचना कारणीभूत होतात. विशिष्ट मनोवृत्तीला अनुरूप व्यापार कोणता ? याचा विचार करूनच काव्यगत पात्राच्या हालचाली, संभाषणे यांची योजना झाली पाहिजे. गडकऱ्यांनी 'राजसंह माझा' या कवितेमध्ये सुंदर कल्पनेच्या मोहाने करूणरसाला हानीकारक अशा दीर्घ रूपकांची योजना केली आहे. त्यामुळे कारूण्याऐवजी अलंकार चमत्कृतीच अधिक साधली आहे. तसेच 'धन्य तुझे लावण्य' या लावणीत नायिकेच्या पायातील जोडव्याचे वर्णन करताना तो शाहीर म्हणतो -

**मांड्या, गुडघ्या, सरळ पोटऱ्या पायी जोडवी खणानी |**
**जसे घोड्याचे नाल वाजती आवाज कानी दणानी ||**

या लावणीत औचित्यहानी घडलेली दिसून येते.

अनौचित्याखेरीज रसभंगाचे दुसरे कोणतेही कारण नाही. उचित म्हणून जे प्रसिद्ध आहे तेच आपल्या काव्यात समाविष्ट करणे हीच रसोत्पत्तीची मुख्य गुरूकिल्ली आहे असे सांगणारा एक श्लोक क्षेमेंद्राने '**औचित्यविचारचर्चा**' या ग्रंथात आला आहे. हीच कल्पना घेऊन व तिच्या अंगोपांगाचे व्यवस्थित प्रतिपादन करून क्षेमेंद्राने हा आपला सिद्धांत सांगितला आहे. अनेक उदाहरणांच्या साहाय्याने त्याने हा विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात तो उचित गोष्टीचे उदाहरण देतो व त्यापाठोपाठ अनुचित काय ? या गोष्टीचेही उदाहरण देतो. औचित्याने काव्य कसे समृद्ध झाले व अनौचित्याने काव्याची कशी हानी झाली हे क्षेमेंद्राने सप्रमाण दाखवून दिले आहे.

'**औचित्यविचारचर्चा**' या ग्रंथात आपले मत स्पष्ट करताना त्याने कालीदास, कवी भोज यांच्या काव्यातील उदाहरणे घेतली आहेत. त्याने इतर कवींच्या अनौचित्य तर दाखविलेच, पण स्वतःच्या काव्यातील अनौचित्यही स्पष्टपणे दाखविले आहे. गळ्यात मेखला, पायात नूपूर, कानात कुंडले अशा औचित्याशिवाय जर काव्यनिर्मिती झाली तर त्यात अलंकार येत नाहीत असे म्हटले आहे. आपल्या ग्रंथात क्षेमेंद्राने पद, वाक्य, गुण, अलंकार, रस यांच्या औचित्याविषयी चर्चा आली आहे. याशिवाय लिंग, वचन, क्रियापद, विशेषण याचेही औचित्य कसे असते याची चर्चा केली आहे. संस्कृत साहित्य शास्त्रकारांनी अलंकारिकतेचा म्हणजेच काव्याच्या सौंदर्याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला होता. या विचारात रस, वक्रोक्ती, उपमा उत्प्रेक्षादी अलंकार इत्यादी गोष्टीविषयी चर्चा झाली.

क्षेमेंद्राशिवाय औचित्याला इतके महत्त्व दुसऱ्या कोणत्याही साहित्यशास्त्रकाराने दिलेले नाही. औचित्य हा कितीही महत्वाचा आवश्यक आणि अपरिहार्य असा काव्याचा गुण असला तरी तो गुणच होय, गुणी नव्हे. धर्म होय, धर्मी नव्हे. म्हणून त्यास गुणीचे किंवा धर्मीचे महत्त्व देता येत नाही. कोणत्या प्रकारच्या शब्दयोजनेने किंवा अर्थयोजनेने किंवा रीतीने मनातील अभिप्राय व्यक्त करायचा हाच औचित्याचा महत्त्वाचा भाग आहे. सांगण्याची उचित अशी पद्धतीच औचित्यात अभिप्रेत आहे. रीतीपेक्षा निराळे महत्त्व किंवा स्थान याला नाही.

✞✞✞✞

## २२

# प्लेटो-ॲरिस्टॉटलचा अनुकृती सिद्धांत

पाश्चात्य साहित्यशास्त्रातील आद्य आचार्य प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रिटीसचा शिष्य व ॲरिस्टॉटलचा गुरू प्लेटो याने साहित्याच्या सैद्धांतिक निरूपणाचा पाया घातला. त्याच्या काळापर्यंत कला ही अनुकरण होय. (Art is Imitation) हा सिद्धांत परिचित झाला होता. ईश्वरकृत मूळ आदर्श हीच वास्तविक सत्ता असते अशा आदर्शाची एक सूक्ष्म दृष्टी असते ही त्या आदर्शविश्वाची अपूर्व अशी अनुकृती होय.

## अनुकृती म्हणजे काय ?

अनुकृतीचा मूळ ग्रीक धातू mimeisthai असा असून त्याचा अर्थ दुसऱ्याने केले ते करणे असा आहे. परंतु ग्रीक भाषा व्यवहारात या धातूची व्याप्ती अनुकृती करणे, दर्शन घडविणे, निर्देश करणे आविष्कृत करणे अशी झालेली आढळते.

## प्लेटोची अनुकृतीची कल्पना -

प्लेटो हा शुद्ध तात्त्विक विचारांचा, गणिती पद्धतीचा पुरस्कार करणारा विचारवंत होता. त्याचा कालखंड इ.स.पूर्व ४२७-३४७ हा आहे. सॉक्रेटिस आणि प्लेटोच्या काळात ग्रीक नगरराज्ये विघटनाच्या अवस्थेत होती. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नैतिक आणि बौद्धिक अधःपतन झाले होते. अथेन्सला अराजकाच्या ज्वालांनी घेरले होते. अज्ञ, नादान आणि दांभिक लोकांना गोंजरण्यासाठी लोकशाहीची यंत्रणा राबविणारे लोक कोणती अमानुष कृत्ये करतात हे त्याने सॉक्रेटिसला दिल्या गेलेल्या देहान्ताच्या शिक्षेच्याद्वारे पाहिले होते. सॉक्रेटिस प्रज्ञानी होता, शहाणा होता. तो बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचा जनक मानला जातो. प्रत्यक्ष जीवनात बौद्धिक प्रबोधन करण्यासाठी तो धडपडत होता. तो निष्ठेचा पक्का होता. सॉक्रेटिस ईश्वर मानीत नाही किंवा राजसंस्थेला मान्य असलेले देव मानीत नाही आणि बुद्धिवादी विचार तरूणांना सांगून बिघडवितो असे द्वेषदग्ध आरोप त्याच्यावर केले गेले होते. त्यामुळे त्याने हेमलॉक विषाचा स्वीकार करून तुरुंगातच आपला शेवटचा श्वास घेतला. हे सर्व प्लेटो पाहात होता. आपल्या आदरणीय गुरूला दांभिक व बुद्धीविरोधी लोकांनी कसे मारले हे त्याने स्वतः पाहिले आणि हा संवेदनशील शिष्य रक्तबंबाळ झाला. लोकशाहीला विकृत करणाऱ्यांचा त्याला राग आला. आपले जळते मन घेऊन तो गावोगाव हिंडला. आपल्या प्रज्ञानी आणि विचारवंत गुरूला मारणाऱ्या राजकारणाची त्याला अतोनात किळस आली. प्रचलित राजकारण आणि समाजरचना पार बदलून टाकावी म्हणून त्याने 'रिपब्लिक' हा ग्रंथ लिहला. पण प्लेटोच्या या विद्रोहाने सॉक्रेटिसच्या बुद्धिवादाकडे पाठ फिरविली. अध्यात्मिक नैतिकतेचा आदर्श गौरवून सांगणारा प्लेटो, जिने त्याच्या बुद्धिवादी गुरूला मारले तिचाच अनवधानाने कैवारी ठरला.

प्लेटोच्या मते, बुद्धीला केवळ सत्याचा बोध घेता येतो आणि प्रकाशातच मानवी जीवनाची चांगली घडी बसविता येते. यावर प्लेटोचा दृढविश्वास होता. प्लेटाचे तत्त्वज्ञान सामान्यतः अनुभवजन्य व इंद्रियजन्य ज्ञानाला कमी लेखणारे होते.

प्लेटो ईश्वर, अध्यात्म मानणारा तत्त्वज्ञानी आहे. आयडीया (Idea) म्हणजे चिद्रूप. हे चिद्रूप इंद्रियगोचर नसते. हे चिद्रूप इंद्रियगोचर सृष्टीतील वस्तूच्या आधी अस्तित्त्वात असते. हे चिद्रूप अविकारी अविनाशी व अपरिवर्तशील असते. हे चिद्रूप केवळ बुद्धीलाच आकळते. नश्वर वस्तूंचे इंद्रियांना जाणवणारे भाग म्हणजे अंतिम सत्य नव्हे. बुद्धिला जाणवणारे त्याचे अविनाशी स्वरूप म्हणजेच त्याचे चिद्रूप होय. हे चिद्रूप म्हणजेच अंतिम सत्य होय.

प्लेटोच्या या चिद्रूपाच्या कल्पनेबरोबरच आत्म्याच्या तीन भागाची कल्पनाही इथे लक्षात घ्यावी लागते. आत्म्याचा

- पहिला भाग हा अमर, अविनाशी आणि अभेद्य असतो.
- दुसरा भाग विनाशी आणि विच्छेद्य असतो. शौर्य, संयम अशा गुणांचे अधिष्ठान या भागात असते.
- तिसरा भागही विनाशी असतो. तो संग्रहशील असतो.

जनावरांमध्ये पहिला विचारशील भाग नसतो. उरलेले दोन भाग मात्र असतात. चिद्रूपाची परिणती शिवतत्त्वात (Good) होते आणि त्याचे आकलन फक्त विचारशील आत्माच करतो. चिद्रूपाव्यतिरिक्त उरते ते सर्व असत्य आणि सत्यसंशोधनाचा अधिकार कलांना नाही. तर तो आहे तत्त्वज्ञानाला. प्लेटोच्या तत्त्वज्ञानात कला आणि वाङ्मयाशी विचारशील आत्म्याचा संबंध तुटला आणि आत्म्याचा दुय्यम भागाशी कला आणि वाङ्मयाचा संबंध जोडला गेल्याने कलांना आणि वाङ्मयाला गौणत्व प्राप्त झाले आहे.

प्लेटो म्हणतो की, अंतिम सत्य शाश्वत एकमेव असले पाहिजे. साहित्य या अंतिम सत्यापर्यंत पोहचू शकत नाही. एवढेच नव्हे तर साहित्यादी कला या अंतिम सत्यापासून दोनदा ढकललेल्या असतात. (Twice removed form truth) कशा ते पुढीलप्रमाणे प्लेटो स्पष्ट करतो.

१. ईश्वरनिर्मित मूळ सूक्ष्म व आदर्श रूप -

हे इंद्रियातीत आणि पूर्ण आहे. हे चिद्रूप म्हणजेच अंतिम सत्य होय. हे ऐंद्रिय ज्ञानाचा विषय नाही. ते बुद्धिगम्य आहे. उदा. पलंगाचे चिद्रूप म्हणजे पलंगामागची अव्यक्त कल्पना. अनेक विवक्षित पलंगाचे हे वैश्विक (Universal) आणि शाश्वत रूप असते.

२. चिद्रूपाची सुतार/लोहार यांनी केलेली अनुकृती म्हणजे विवक्षित पलंग. ही अनुकृती उपयुक्त असते. पण ही चिद्रूपाची अपूर्ण प्रतिकृती असते.

३. चित्रकार हा सुतार/लोहाराच्या अनुकृतीचे रंगरेषाच्या द्वारा चित्र काढतो. हे चित्र म्हणजे सुताराच्या पलंगाची अनुकृती असते. अंतिम सत्यापासून पलंग आणि चित्र यांच्या रूपाने-मार्गाने साहित्यादी कला दोनदा दूर गेलेल्या असतात म्हणून

साहित्यादी कलांना त्याने अनुकृतीची अनुकृती (Imitation of Imitation) म्हटले आहे.

अनुकरणात्मक कलांची निर्मिती ही सृष्टी नियमांच्या ज्ञानावर अवलंबून नसते. तर ती दैवी प्रेरणांवर अवलंबून असते. दैवी प्रेरणेने कवी जसा आकृष्ट होतो तसे प्लेटोच्या मते सारी कलासृष्टीदेखील आकृष्ट व विक्षिप्त स्वरूपाची बनते.

या जगात प्रत्येक गोष्टीमागे माणसे, झाडे यांच्या वर्गाशी सबंधित असे प्रत्येक वस्तुजातीचे एक चिद्रूप असते. त्याचे अस्तित्त्व हे वस्तुच्या अस्तित्त्वावर अवलंबून नसते. प्लेटोच्या या तत्त्वज्ञानात चिद्रूपांची एक श्रेणी आहे. वस्तुविषयक चिद्रूपे ही त्याहूनही खालच्या पातळीवरची असतात.

प्लेटोच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे पलंगाचे चिद्रूप हे अंतिम सत्य आहे. सुताराने बनविलेला पलंग हा चिद्रूपाची एक अनुकृती होय. हा पलंग जीवनाला उपयुक्त असल्याने व त्या अनुकृतीच्या साहाय्याने मूळ चिद्रूपाची मनाला जाणीव होत असल्याने सुताराने पलंग निर्माण करणे हितावह आहे. पण सुताराच्या या पलंगाची जेव्हा चित्रकार रंग, रेषा आणि कॅनव्हासच्या साहाय्याने किंवा साहित्यिक शब्द व अर्थ या माध्यमातून अनुकृती तयार करतो त्यापैकी कोणतीही गोष्ट साधत नाही. सुतार/लोहाराचा पलंग चिद्रूपाची नुसती अनुकृती असते तर चित्रकाराचा पलंग ही त्या अनुकृतीची अनुकृती असते.

या प्रतिपादनाने प्लेटोने सर्वच ललित कलांना अंतिम सत्यापासून दूर ढकलेले आणि तत्त्वज्ञानाच्या, सत्यसंशोधनाच्या क्षेत्रातील आपला अधिकार प्रस्थापित केला.

## ॲरिस्टॉटलचा अनुकृती सिद्धांत -

'पाश्चात्य साहित्यशास्त्राची गंगोत्री' अशा शब्दात सुप्रसिद्ध समीक्षक श्री.के.क्षीरसागर यांनी ॲरिस्टॉटलचा गौरव केला आहे. ख्रिस्तपूर्व ३८४ ते ३२२ हा त्याचा कालखंड होता. सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता प्लेटोचा शिष्य आणि सिकंदरचा गुरू असलेल्या ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र (poetics) व वक्तृत्त्वकला हे साहित्यशास्त्रातील प्रसिद्ध ग्रंथ आहेत. ॲरिस्टॉटलच्या काळात महाकवी होमर, ईक्लीस, सोफाक्लीस यासारख्या विख्यात नाटककारांची नाटके, प्लेटोचे गद्यपद वाङ्मय यासारखे साहित्य उपलब्ध होते. या साहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून त्याने आपले साहित्य सिद्धांत मांडले.

ॲरिस्टॉटलने आपल्या गुरूचेच Art imitates nature हे तत्त्व स्वीकारले आणि अगदी विरूद्ध टोकाचे निष्कर्ष काढून दाखविले. काव्य म्हणजे सत्याची केवळ नक्कल नसून कल्पना प्रस्तुत प्रतियमान रूपाचे चित्रण होय. काव्यामूळे नैतिक अध:पतनाऐवजी मानवाचे चित्तशुद्धीकरण व उदात्तीकरण होते. असा सिद्धांत प्रस्थापित करून त्याने प्लेटोप्रणित अनुकरण सिद्धांताचा चेहरामोहरा बदलून टाकला.

**अनुकरणाबाबत ॲरिस्टॉटलची सूत्रे अशी आहेत -**

i) **कला प्रकृतीचे अनुकरण करते.**

ii) **शोकनाट्यात सहा घटक असावेत.**

कथानक, पात्रे, पात्ररचना, पदरचना, विचारसत्त्वे, दृश्यविधान गती यात अनुकरणाची माध्यमा, अनुकरणाची पद्धती अनुकरणाचे विषय असतात. अनुकरणाच्या विषयामध्ये वास्तव, कल्पित वास्तव, संभाव्य असे प्रकार असतात. अनुकरणाने प्राप्त होणारा आनंद सर्वांना सारखाच प्राप्त होतो.

प्लेटोने कलावंत हा बाह्यसृष्टीचे अनुकरण करतो असे म्हटले आहे. हे अनुकरण अर्थातच अज्ञानजन्य, खोटे म्हणून, काव्याचे अनुकरण करणाऱ्या कवीचाही प्लेटो तिरस्कार करतो. ॲरिस्टॉटलने या विचारसरणीचे खंडन करून अनुकरण सिद्धांताला एक वेगळी तात्त्विक बैठक प्राप्त करून दिली.

Arts is imitation of nature या वाक्यातील प्रकृती म्हणजे जड व बाह्यसृष्टी आहे. प्रत्येक वस्तू विकसित झाल्यावर जशी दिसेल वा जशी असेल तिला प्रकृती म्हणतात. असे पूर्ण विकसित रूप हेच या वस्तूचे आदर्शरूप असते. सृष्टीतील प्रत्येक वस्तू पूर्णत्वाच्या प्राप्तीसाठी धडपडत असते. पण त्यात अडथळे निर्माण होत असल्याने प्रगतीत अडथळा निर्माण होतो. कलावंत हे अडथळे दूर करून आपल्या निर्मिती प्रक्रियेच्या बळावर आपल्या कलेत त्या वस्तूला पूर्णत्व प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणजे एक प्रकारे ती वस्तू तिच्या आदर्श रूपात कलावंत प्रकट करीत असतो. कलावंत एकप्रकारे सृष्टीच्या निर्मितीचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण करतो. या दृष्टीने काव्यात अनुकरण असते. तेव्हा कलावंताला कलावंत बनविणारे जे तत्त्व तेच अनुकृतीचे तत्त्व होय.

अनुकृतीचे विशेष -

१) काव्यात्मक अनुकृतीचे विशेष प्रवृत्तीतील अंतर्बाह्य अनुकृती प्रकट करणारे असतात.

२) बाह्य जगातील वास्तवापेक्षा त्याच्या प्रतीयमान रूपाचे अनुकरण अधिक होते. वस्तू कशी आहे यापेक्षा ती कशी असू शकते, कशी असावी याचे काव्यात होणारे अनुकरण महत्त्वाचे असते.

३) कलेत वा काव्यात तीन रूपाचे अनुकरण केले जाते.

i) **प्रतीयमान रूप** –

प्रतीयमान रूप म्हणजे कलावंताला वस्तूचे प्रतीत होणारे रूप.

ii) **संभाव्य रूप** –

संभाव्य रूप म्हणजे वस्तूचे जसे रूप असू शकते तसे.

**iii) आदर्श रूप** –

आदर्श रूप म्हणजे वस्तू कशी असावी ते रूप.

म्हणून अनुकरणामध्ये आनंद तत्त्वाचा अंतर्भाव अनिवार्य आहे. म्हणजे अनुकृती करून जी कलाकृती निर्माण होते ती रसिकाला केवळ आनंद देणारी असली पाहिजे. म्हणून अनुकरण म्हणजे काय तर मानवी जीवनाचे कलात्मक पुनर्निर्माण होय.

ॲरिस्टॉटलच्या मते अनुकरण करणे, प्रतिकृती करणे हे माणसाच्या भावनेचेच उपजत अंग आहे. यात त्यास आनंद वाटतो. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनातील वेदनायुक्त अनुभवही कलात्मक चित्रणात आनंददायक ठरतात. म्हणूनच माणसाला नाटक पहावे, नृत्याचा लय अनुभवावा, संगीत ऐकावे, चित्र पहावे असे वाटत असते. कलेचा आनंद हा अर्थातच बौद्धिक/मानसिक पातळीवरचा आनंद होय.

प्लेटोचाच परंपरागत अनुकरणाचा सिद्धांत स्वीकारून ॲरिस्टॉटलने त्याला अगदी वेगळे रूप दिले आहे. प्लेटोप्रमाणे काव्य/कलेचा विचार राजकीय नीतिशास्त्रीय भूमिकेतून न करता त्याने सौंदर्यशास्त्रीय दृष्टिकोणातून केला म्हणून जेम्स स्पॉट म्हणतो – "त्याने काव्यास तत्त्वज्ञान, राजकारण व नीतीशास्त्र ह्यांच्या हातून मुक्त केले."

✞✞✞✞

**घटक 'ब'**

# २

# साहित्याची भाषा

## शब्दशक्ती – अभिधा, लक्षणा, व्यंजना

शब्द हे वस्तूचे प्रतीक असते. त्यात त्याचा संकेताने प्राप्त झालेला वाच्यार्थ एकच असतो. पण वेगवेगळ्या संदर्भात याच शब्दाला वेगवेगळे अर्थ प्राप्त होतात. एखाद्या गाढवाला पाहून आपण 'ते पहा गाढव' असे म्हटले तर त्याचा जाणवणारा अर्थ हा वाच्यार्थ होय. पण एखाद्या व्यक्तीला उद्देशून 'तू गाढव आहेस' असे म्हटले तर येथे 'गाढव' या शब्दाचा मूळ अर्थ घेता येत नाही. या ठिकाणी गाढव या शब्दाचा अर्थ 'मूर्ख माणूस' असा बोलणाऱ्याच्या मनात असतो. हा दुसरा अर्थ म्हणजे लक्ष्यार्थ होय. हा अर्थ कुठल्याही कोषामध्ये मिळत नसला तरी मराठी भाषिकाला तो कळतो. जर एखाद्या आईने आपल्या बाळाला उद्देशून हे वाक्य म्हटले तर त्या वाक्यातून आईचा वात्सल्यभाव जाणवतो. हा व्यंगार्थ होय.

### अ) अभिधा – (वाच्यार्थ, मुख्यार्थ, संकेतार्थ)


अभिधा ही शब्दाची प्रथम जाणवणारी शक्ती आहे. शब्दाचा प्रचलित अर्थ या शक्तीमुळे जाणता येतो. हाच अर्थ शब्दकोशात दाखविला जातो. संकेत, आकांक्षा, योग्यता या तत्त्वानी अभिधार्थ कळतो. अभिधा शक्ती हीच शब्दाचा प्रथम बोध प्रकट करणारी शक्ती आहे. त्यानंतरच शब्दाच्या लक्ष्यार्थाची व व्यंगार्थाची प्रतिती (अनुभव) होऊ शकतो. विविध शास्त्रीय ग्रंथात अभिधा शक्तीचाच उपयोग व महत्त्व असते. आय.ए.रिचर्डस् अभिधा शक्तीला Scientific Meaning म्हणतात. गाय हा शब्द उच्चारताच त्या प्राण्याची विशिष्ट आकृती व त्या जातीचे गुण विशेष याचे समन्वीत चित्र मनःचक्षूसमोर उभे राहते. यालाच वाच्यार्थ किंवा मुख्यार्थ असे म्हणतात.

शब्दांना अर्थ कसा प्राप्त होतो हे जरी सांगता येत नसले तरी भाषेतील काही शब्दांना अर्थ व्युत्पत्तीने कळू शकतो. पण भाषेतील घर, डोळा, इ. शब्दांचा अर्थ व्युत्पत्तीने कळत नाही. तो अर्थ केवळ रूढ आहे म्हणून रूढीने स्वीकारावा लागतो. व्युत्पत्तीने ज्याचा अर्थ कळतो त्यांना यौगिक शब्द म्हणतात. उदा. गृहस्थ.

काही शब्दांमध्ये रूढी व व्युत्पत्ती या दोन्हीची मदत घ्यावी लागते. उदा. पंकज = पंक म्हणजे चिखल आणि अज म्हणजे जन्मलेले. त्यामुळे पंकज म्हणजे चिखलात जन्मलेले असा अर्थ व्युत्पत्तीने त्याचा होतो. पण चिखलात जन्मलेल्या सगळ्याच वस्तूंना आपण पंकज म्हणत नाही. तर रुढीने पंकज = कमळ असा मर्यादित अर्थ घेतला जातो. त्याला योगरूढ असे म्हणतात. अभिधेचे रूढ, योग आणि योगरूढ असे तीन प्रकार पडतात.

## ब) लक्षणाशक्ती – (लक्ष्यार्थ)

अभिधेपेक्षा अधिक महत्त्वाची शक्ती म्हणजे लक्षणा होय. काव्यामध्ये व व्यवहारामध्ये लक्षार्थाला अधिक महत्त्व असते. शब्दाच्या पलिकडचे असे जे काही काव्यातून प्रकट होत असते त्यासाठी हा प्रथम लक्ष्यार्थ जाणता यावा लागतो. शास्त्रीय लेखनात व व्यवहारातही लक्षणेची मदत घ्यावी लागते. उदा. नळ आला. या उदाहरणात पाणी आले असे कळते. लक्षार्थ कळण्यासाठी मुख्यार्थ बाद व्हावा लागतो. जो दुसरा अर्थ त्या वाक्यातून जाणवतो तो मुख्यार्थाशी संलग्न असतो. उदा. 'आयत्या बिळात नागोबा' असे म्हटल्यावर 'श्रेय लाटणारी व्यक्ती' असा जाणवतो. दुसरा कोणताही अर्थ त्यातून जाणवणार नाही. ही वाच्यार्थाशी संलग्नता म्हणजे तद्योग होय. तद्योग ही लक्ष्यार्थाची दुसरी अट होय. असे तद्योग साधण्यासाठी काही तरी कारण हेतू असावा लागतो. त्या शब्दांचा वाच्यार्थ व लक्ष्यार्थ यामध्ये सामिप्य, सादृश्य, साहचर्य किंवा रूढी असे कोणते तरी कारण असावे लागते. उदा. तो कर्ण आहे. कर्ण व औदार्य यांच्यामध्ये साहचर्य असल्याने तो कर्ण आहे ही लक्षणा होऊ शकते असे कारण किंवा प्रयोजन ही लक्ष्यार्थाची तिसरी अट होय. म्हणी, वाक्प्रचार व अलंकार यामध्ये लक्ष्यार्थ योजलेला असतो.




**निरूढा** – लक्षणेमध्ये मुख्यार्थ बाद, तद्योग, प्रयोजन यांच्या जोडीला तसे बोलण्याची रूढी हे सुद्धा कारण असते. जेव्हा केवळ तसे बोलण्याची रूढी असते तेव्हा निरूढाा लक्षणा होते. उदा. पानिपतवर सव्वा लाख बांगडी फुटली.

**प्रयोजनवती लक्षणा** – हे लक्षणेचे खरे क्षेत्र आहे. वाच्यार्थाला बाजूला सारून त्याच्याशी संलग्न असलेला दुसरा अर्थ स्वीकारायला काहीतरी प्रयोजन असावे लागते. असे प्रयोजन असलेली लक्षणा ही प्रयोजनवती लक्षणा होय. हे प्रयोजन कधी गुढ असते तर कधी स्पष्ट असते. जेव्हा प्रयोजन गुढ असते तेव्हा लक्षणेत अधिक सौंदर्य जाणवते.

### लक्षणेचे वर्गीकरण

### अ) शुद्धा लक्षणा –

शुद्धा लक्षणेमध्ये गुणांचा संबंध नसतो. कार्यकारण सामिप्य, जनक-जन्य इ. संबंध असतो. उदा. मी केशवसूत वाचला.

**शुद्धा लक्षणेचे चार उपप्रकार पडतात.**

i) **सारोपा** **ii) साध्यवसाना** **iii) उपादान** **iv) लक्षण-लक्षणा**

याचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

i) **सारोपा शुद्धा लक्षणा** – उदा. संप म्हणजे प्रत्यक्ष मरणच. हे या प्रकारचे उदाहरण आहे. या वाक्यात संप म्हणजे मरण नव्हे तर मरणसदृश्य यातना हा अर्थ घ्यावा लागतो. त्यामुळे ही लक्षणा ठरते. संप आणि मरण या दोन्हीचा स्पष्ट निर्देश केलेला आहे. म्हणून ती सारोपा शुद्धा लक्षणा ठरते.

ii) **साध्यवसाना शुद्धा लक्षणा** – उदा. तो साक्षात बलच सेवन करीत आहे. हे या प्रकारचे उदाहरण आहे. कधी कधी ज्याच्यावर आरोप करायचा त्याचा निर्देश न करता केवळ परिणामाचा निर्देश केलेला असतो. मद्य पित असलेल्या व्यक्तीला उद्देशून जर आपण तू रोगालाच आमंत्रण देत आहेस असे म्हटले तर अशावेळी प्रत्यक्ष मद्यपानाचा निषेध केला नसल्याने तो सारोपा ठरणार नाही तर ती साध्यवसाना होय.

iii) **उपादान शुद्धा लक्षणा** – उपादान शुद्धा लक्षणेचे अजहल्लक्षणा असे देखील नाव आहे. कारण तिच्यात मूळचा अर्थ न घेता दुसराच अर्थ घेतला जातो. उदा. लग्न समारंभात हजार पानं उठली. येथे लाक्षणिक अर्थाबरोबरच वाच्यार्थही घ्यावा लागतो. उदा. पानिपतावर सव्वा लाख बांगडी फुटली.

iv) **लक्षण-लक्षणा** – तिच्या दारावरून हत्ती गेला. काही ठिकाणी फक्त लक्ष्यार्थाच घ्यावा लागतो. वाच्यार्थ घेता येत नाही. लक्षण लक्षणेत मुख्यार्थ संपूर्णतः बाद होऊन अर्थसिद्धी होते. या लक्षणेलाच जहल्लक्षणा असेही म्हणतात.

**ख) गौणी लक्षणा** –

जेव्हा लाक्षणिक अर्थ गुणांवर आधारलेला असतो तेव्हा गौणी लक्षणा मानली जाते. उदा. तो बृहस्पती आहे.

गौणी लक्षणेचे दोन प्रकार आहेत.

i) **सारोपा गौणी लक्षणा** - उदा. मना झाली दैवते माय-तात. या उदाहरणामध्ये सारोपा गौणी लक्षणा आहे. आई-वडील ही दैवते नसून ती माणसेच आहेत हे माहीत आहे. पण त्याच्या अंगी दैवत्वाचा गुण आहे असे कवीला सांगायचे आहे. गुणावर आधारलेली गौणी आणि ज्या आईवडीलांवर ह्या गुणांचा आरोप करायचा त्याचा प्रत्यक्ष निर्देश ह्या ओळीत केलेला आहे. म्हणून ती सारोपा गौणी लक्षणा होय. या लक्षणेचे दुसरे उदाहरण - 'तिचे मुख म्हणजे चंद्रबिंबच' हे देता येईल.

ii) **साध्यवसाना गौणी लक्षणा** – कधी-कधी ज्यांच्या संदर्भात या गुणाचा उल्लेख करायचा त्या व्यक्तीचा प्रत्यक्ष निर्देश केलेला नसतो. 'चाफ्याच्या झाडा' या कवितेत पद्मा गोळे यांनी वाच्यार्थ बाद केल्यामुळे लक्षणा आली आहे. पण ज्या बालपणाला उद्देशून या गुणांचा उल्लेख केलेला आहे त्या गुणांचा प्रत्यक्ष उल्लेख नसल्याने ही प्रत्यक्ष साध्यवसाना गौणी लक्षणा ठरते. लक्षणेच्या या प्रकारात ज्याच्यावर या गुणांचा आरोप करायचा त्याचे अध्यवसान (लोप) होते.

हा चंद्रच भूतलावर अवतरला आहे.

या उदाहरणामध्ये मुख या शब्दाचे अध्यवसान झालेले आहे.

## क) व्यंजना शक्ती –

काव्यव्यापारामध्ये व्यंजनाशक्तीला अधिक महत्त्व असते. काही वेळा तर काव्याचे काव्यपणच व्यंजनेमध्ये सामावलेले असते. असे वाटावे इतके काव्यात व्यंजनेचे महत्त्व असते. काव्यामध्ये प्रत्यक्ष वर्णनापेक्षा सूचकतेला महत्त्व असते. ही सूचना देण्याचे सामर्थ्य म्हणजे व्यंजनाशक्ती होय. व्यंजनेत शब्दाच्या वाच्यार्थाला मानावे लागते. त्या वाच्यार्थाबरोबरच अधिक काही सुचविलेले असते. हे सुचविणे सौंदर्यपूर्ण असते. व्यंजनेचे संस्कृतमधील उदाहरण म्हणजे 'सूर्य अस्ताला गेला' (गतो ऽ स्तमर्क) हे होय. हे वाक्य उच्चारताच किंवा ऐकताच ब्राह्मण, चोर, नववधू, अभिसारिका, शेतकरी, इत्यादीच्या मनात भिन्न भिन्न अर्थाची प्रतिती येऊ शकते. ब्राह्मणाला सायंसंध्येची, चोराला चोरी करण्याची, नववधूला आपल्या पतीच्या स्वागताची तयारी करण्याची अभिसारिकेला आपल्या प्रियकराला भेटण्याची सूचना मिळेल. शेतकऱ्याला शेतीची कामे आटोपते घेण्याची सूचना मिळेल.

व्यंजनेने कळणारा अर्थ हा कोणत्याही शब्दाचा वा शब्दसमुहाचा नसतो. कवीच्या मनातील आंदोलने त्या शब्दातून सूचविलेली असतात आणि रसिक-सहृदयवाचक आपल्या कल्पनाशक्तीच्या साहय्याने ती आंदोलने आणतो. त्याचा आस्वाद घेऊ शकतो. शब्दाच्या वाच्यार्थाहून वेगळा, सहृदयांना जाणवणारा अर्थ म्हणजे व्यंग्यार्थ (ध्वन्यार्थ) होय. रमणीच्या अवयव सौंदर्याहून भिन्न पण त्याच्याच द्वारे अभिव्यक्त होणारे तिचे लावण्य जसे अपूर्ण असते त्याप्रमाणे शब्दाच्या वाच्यार्थाहून भिन्न परंतु शब्दाच्या द्वारा जे अभिव्यक्त होते तेच काव्य सौंदर्य होय. हे काव्याचे आत्मतत्त्व होय. यालाच ध्वनी किंवा प्रतियमान अर्थ म्हणतात. रस हे असेच सतत ध्वनीत होत असतात. रस कधीही शब्द-वाक्य नसतात.


**व्यंजनाशक्तीचे प्रकार –**

संस्कृत समीक्षकांनी व्यंजनेचे प्रमुख दोन विभाग केले आहेत.

i) **शब्दाशी निगडीत असलेली ती शाब्दी व्यंजना -**

ii) **अर्थाशी निगडीत असलेली ती आर्थी व्यंजना -**

हे खालील मानचिन्हावरून स्पष्ट होईल.




### i) **शाब्दी व्यंजनेचे प्रकार -**

### १) **अभिधामूलक शाब्दी व्यंजना** –

शाब्दी व्यंजनेचा हा पहिला प्रकार आहे. जेव्हा व्यंग्यार्थ द्वयार्थी शब्दावर अवलंबून असतो. तेव्हा हा प्रकार संभवतो. उदा.  कर दरीत

कर हरित

एका वाक्याचे दोन अर्थ असल्यावर श्लेष अलंकाराची उभारणी होत असते. मग श्लेष अलंकारापेक्षा व्यंजनेचे वेगळेपण कोणते ? [ श्लेष अलंकारातील द्वयार्थी शब्दाचे दोन्ही अर्थ प्रस्तुतच असतात व ते अभिधा व्यापारानेच कळतात.] पण व्यंजनेनेच जो दुसरा अर्थ अप्रस्तुत वाटणारा अर्थ सूचविलेला असतो. तो केवळ अभिधेने आकलन होत नाही. त्या अप्रस्तुत अर्थाने अधिक काही दाखून दिलेले असते. अभिधामूलक व्यंजना हा व्यंजनेचा प्रकार असला तरी तो केवळ एका द्वयार्थी शब्दावर अवलंबून असतो.

### २) **लक्षणामूलक शाब्दी व्यंजना** –

काही विशेष हेतू मनात धरूनच वक्ता लक्षणेचा वापर करीत असतो. त्या लक्षणेमागचे केवळ लक्षणा व्यापाराने कळत नाही. त्यासाठी व्यंजनेची मदत घ्यावी लागते. [ सामान्यतः प्रयोजनवती लक्षणा या प्रकारात मोडते.]

उदा. तिच्या दारावरून हत्ती गेला.

ii) या वाक्यात घर आणि हत्ती याचे निकटत्व व्यंजनेने सूचित होते.

## **आर्थी व्यंजनेचे प्रकार -**

या प्रकारातून व्यंजनेचे खरे सामर्थ्य प्रकट होत असते. या ठिकाणी केवळ एखाद्या द्वयार्थी शब्दावर किंवा अलंकरणावर व्यंजना अवलंबून नसते. ती त्या सगळ्या काव्यपंक्तीलाच व्यापून राहिलेली असते. त्या पद्याच्या वाच्यार्थाबरोबर किंवा लक्ष्यार्थाबरोबरच वाचकाच्या मनात अनेक प्रकारे संमिश्र भाव निर्माण होत असतात. मराठीत भा.रा.तांबे यांची ‘नववधू’ ही कविता या व्यंजनेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. बालकवीची ‘औदुंबर’ ही कविता अर्थाची अनेक वलये निर्माण करते. संस्कृतमध्ये आर्थी व्यंजनेचे दोन प्रकार केले आहेत.

आर्थी व्यंजना
- लौकिक
  - वस्तुध्वनी
  - अलंकारध्वनी
- अलौकिक
  - रसध्वनी

**१) वस्तुध्वनी –**

वाच्यार्थाहून व्यक्त होणारा व्यंग्यार्थ जेव्हा केवळ एखाद्या वस्तूचा किंवा कल्पनेचा आविष्कार करत असतो तेव्हा वस्तुध्वनी होतो. उदा. सूर्य अस्ताला गेला.

हे वाक्य उच्चारणाऱ्या विशिष्ट व्यक्तीला अनुसरून वाचकाला जे वेगवेगळे अर्थ जाणवतात ते केवळ वस्तुरूप आहेत. थोडक्यात जेव्हा व्यंग्यार्थाने जाणवणारा भावार्थ पुष्कळशा प्रमाणात दुसऱ्या प्रकाराने, साध्या वाच्यार्थाने सांगता येत असेल तेव्हा ते वस्तुध्वनीचे उदाहरण होय.

**२) अलंकार ध्वनी –**

यामधील व्यंग्यार्थ वाच्य होऊ शकतो. खरे म्हणजे अलंकार हा काव्याचा शोभादायक धर्म. पण जेव्हा मुख्य अर्थाला अलंकृत करणारा अलंकार हाच प्रमुख होतो, तेव्हा अलंकार ध्वनी प्रकार साधतो. अशा उदाहरणात खरे म्हणजे अलंकार सुचित केलेला असतो. तो स्पष्ट नसतो. याच अर्थाने त्याला अलंकार ध्वनी म्हणतात. उदा. कुसुमाग्रजांच्या 'समिधाच सख्या' या कवितेतील पंक्ती अलंकार ध्वनीचे उत्तम उदाहरण आहे.

समिधाच सख्या म्या, त्यात कसा ओलावा
कोठून फुलांपरी वा मकरंद मिळावा ||

**३) रसध्वनी –**

रसध्वनीला अलौकिक ध्वनी असे म्हटले जाते. कारण तो वाच्यार्थाने कधीच प्रकट करता येत नाही. त्याचे आकलन होण्यास रसिकाजवळ प्रतिभा असायला पाहिजे. नववधू, औदूंबर, माळाचे मनोगत, डोह यासारख्या कवितांचा आस्वाद रसिक मनाशिवाय शक्य नाही. रसिकालासुद्धा या कवितांच्या वाचनाने जे जाणवते ते दुसऱ्या शब्दातून प्रकट करणे शक्य नसते. या कवितांच्या परिशीलनाने त्यांच्या मनामध्ये अनेक भावनातरंग निर्माण होतात.

## प्रतिमा व रूपक ; मुक्तछंद

**प्रतिमा :**

काव्याची अभिव्यक्ती ही एक ग्रहण प्रक्रिया आहे. केवळ शब्दांच्या माध्यमातून कवीला आपल्या भावना सांगता येतात परंतु त्या वाचकापर्यंत पोहचविणे कठीण जाते. त्यामुळे कवींना अंत्यत प्रभावी भावना,अभिव्यक्तीचा वाचकाला प्रत्यय आणून देणारे

माध्यम म्हणून प्रतिमांचा वापर केलेला आहे. प्रतिमासृष्टी ही संकल्पना पाश्चिमात्य साहित्याच्या दृष्टीकोनातून आपल्याकडे विकसित झाली आहे. २०व्या शतकाच्या मध्यानंतर जाणीवपूर्वक साहित्यामध्ये आणि विशेषतः काव्यांमध्ये प्रतिमांचा वापर मोठया प्रमाणात होऊ लागला.

**प्रतिमा म्हणजे काय ?**

१) "अमूर्त कल्पनेचा किंवा एखाद्या संकल्पनेचा इंद्रियांना आव्हान करणारा आशय म्हणजे प्रतिमा होय".

२) "प्रतिमा म्हणजे शब्दनिष्ठ चित्र, काव्यामधल्या संवेदनांना प्रतित करणारा भाग म्हणजे प्रतिमा होय."

**- ल्युईस**

३) कल्पनेच्या पातळीवर इंद्रिय गोचर होऊ शकणार व जाणिवेने भारलेला काव्याच्या घटक म्हणजे प्रतिमा होय."

**-वि.दा. करंदीकर**

४) "प्रतिमा म्हणजे उच्चारांनी चिन्हांकित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भामध्ये म्हणजेच त्यातील संवेदना कृती व तत्सलग्न भावनिक वैचारिक घटक यामध्ये घडणाऱ्या साधर्म्य वैधर्म्याधिष्ठित आंतरप्रक्रियेतून निर्माण होणारी मूर्त (प्रत्यक्षात) गतिशील अनेकार्थी व सेंद्रिय संघटना होय".

**- डॉ. सुधीर रसाळ**

एका भाववृत्तीच्या संदर्भात जेव्हा दोन किंवा अधिक वस्तूमध्ये साधर्म्य किंवा वैधर्म्य प्रस्थापित केले जाते तेव्हा त्यातील ज्या वस्तूच्या आधारे हे साधर्म्य व वैधर्म्य प्रस्थापित होते त्या वस्तूला आपण प्रतिमा म्हणतो.

**उदाहरणार्थ** :- "तिचे मुख म्हणजे जणू चंद्रबिंबच आहे." या वाक्यात चंद्रबिंबाचा स्त्रीच्या मुखावर अध्यारोप केलेला आहे. या ठिकाणी चंद्रबिंब ही प्रतिमा आहे. एखादी वस्तू आपल्या समोर प्रत्यक्षात उपस्थित नसताना त्या वस्तूच्या रंग रुपाच्या गंध नादाचा प्रत्यय प्रतिमांच्या द्वारे घेतला जातो. साहित्याच्या ठिकाणी असलेली ही फार मोठी शक्ती आहे. संवेदनाची पूर्ननिर्मिती करण्याचे प्रतिमा हे एक सामर्थ्य संपन्न माध्यम आहे.

मानसशास्त्राच्या दृष्टीने दृश्य वस्तुमुळे घडणाऱ्या वेदनांच्या उद्दिपनाशिवाय केवळ कल्पनाशक्तीमुळे त्या त्या वस्तूची प्रतिकृती जेव्हा मनात साकार होते. तेव्हा त्या प्रतिबिंबाला प्रतिमा म्हणतात. त्यामुळे त्या प्रतिमांचा संबंध इंद्रियगम्य अशी श्रुती, गंध, रुची,स्पर्श अशा वेदनाशी असतो. या इंद्रियगम्य घटकांचा प्रत्यय प्रतिमाच्या द्वारे घेता येतो.

प्रतिमेच्या संदर्भात खालील गोष्टी सांगता येतील.

१) प्रतिमा ही काव्यानुभावीशी एकरूप असली पाहिजे.

२) प्रतिमेत नाविन्य असणे आवश्यक आहे.

३) प्रतिमा सांकेतिक असू नये.

४) चांगल्या प्रतिमांचा प्रगटण्यात अपरिहार्यता व अकस्मातपणा या दोन्ही गोष्टी एकदम अनुभवास येणे आवश्यक आहे.

५) कधी कधी विशिष्ट संवेदना प्रकट करण्यास असमर्थ ठरते तेव्हा साहित्यकृतीत प्रतिमांचे विश्वच उभे केले जाते.

**रूपक :**

रुपक हे संस्कृत साहित्यात एक अलंकार मांडण्यात आलेले आहे. उपमेय आणि उपमान यांचा अभेद झाला असता हा अलंकार होतो असे संस्कृत साहित्यकार मांडतात. रूपक म्हणजे काय हे सांगताना डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात की "**भाषेच्या एका खास अर्थ योजनेच्या वृत्तीला रूपक प्रक्रिया म्हटले जाते**." एका वस्तूचे गुणधर्म किंवा स्वरूप दुसऱ्या वस्तूशी जोडले की रूपक निर्मिती होते या प्रक्रियेत दोन्ही वस्तूंच्या गुणधर्मात आणि स्वरूपात फेरबदल होतात कारण एकीचे गुणधर्म दुसऱ्यावर लादली जातात. त्यामुळे एकीच अपूर्ण स्वरूप दुसऱ्या पूर्ण स्वरूपात किंवा एकीचे अपूर्ण तर दुसरीचे पूर्ण स्वरूप परस्पर संयोगामुळे कमालीचे बहुरंग बहुस्पर्शी असे संवेदनाच्या पातळीवर समृद्ध होते.

**रूपक म्हणजे काय ?**

१) "अनेक अवलोकन घटकांचे एका समर्थक प्रतिमेत होणारे संश्लेषण म्हणजे रूपक होय."

**- हबर्ट रीड**

रूपक ही एक व्यामिश्र कल्पनेची अभिव्यक्ती असते ही कल्पना विश्लेषणातून नव्हे किंवा अमुर्त विधानातून नव्हे तर झटकन जाणवणाऱ्या वस्तूनिष्ठ संबंधातून अभिव्यक्त होते.

२) विशिष्ट वस्तूंसाठी वापरल्या जाणाऱ्या नामाचे दुसऱ्या वस्तूचा निर्देश करण्यासाठी साधरण्याद्वारे स्थलांतर होते यालाच रूपक असे म्हणतात.

**- ॲरिस्टॉटल**

ॲरिस्टॉटल रूपकाची जी व्याख्या केलेली आहे यावर भाष्य करताना व्हील राईट म्हणतो की यामध्ये तीन गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत.

१) रूपक म्हणून वापरल्या जाणाऱ्या शब्दास एक सर्वाज्ञात अर्थ असतो.

२) हा शब्द कमी रूढ कमी ज्ञात व कमी परिचित अर्थ सांगण्यासाठी सिद्ध होतो

३) रूढ अर्थ व रूपकात्मक यात एक सामर्थ्य असते म्हणून रूपक म्हणजे कमी ज्ञात हे सर्व- ज्ञाताशी जोडणारा मार्ग होय.

१) भिन्न वस्तू व घटना यांच्या समान गुणधर्मांना एकत्र संघटित करण्याची प्रक्रिया रूपकात असते.

२) ती संवेदनात्मक व भावनिक असते.

३) संवेदना, साधर्म्य, भावसाधर्म्य यांच्या आधारे आपले मानसिक संदर्भ घटत असतात.

४) साहित्यातील भाषा ही व्यवहारातील भाषेपेक्षा वेगळ्या प्रकारची आहे.

५) वाङ्मयात लालित्य आणण्यासाठी वाङ्मय अधिक सुंदर, सुशोभित करण्यासाठी प्रभावी अशा अर्थ योजनेचा वापर वाङ्मयात केला जातो. या अर्थामध्ये नाविन्य तसेच ताजेपणा असतो टवटवीतपणा ही असतो.

**उदाहरणार्थ :-** बी. रघुनाथ यांच्या कथेतील नायिका लैला पुरुषांना उद्देशून म्हणते की "कुत्रे मेले" यामध्ये पुरुष व कुत्रे यांच्यात कसले ही रूप साधर्म्य संवेदना साधर्म्य नाही. उलट या दोन्हीतील वैधर्म्य तीव्रतेने जाणवते. परंतु त्याच बरोबर कुत्र्याच्या वर्तन पद्धतीतील व या कथेतील पुरुषांच्या वर्तन पद्धतीतील संवेदना वृत्तीमध्ये साधर्म्य आहे. चिवट लगतपणे कुत्र्याचे कुत्रीमागे लागण्याचे वर्तन यातील संवेदनाच्या आकृती समान स्वरुपाच्या आहे. त्याचबरोबर कुत्र्याच्या वृत्ती व पुरुषांची वृत्ती यांचे भावनिक सामर्थ्य ही प्रस्थापित होते. रूपक कुठल्याही प्रकारचे असले तरीही त्यामध्ये संवेदनाची साधर्म्यधारे किंवा वैधर्म्याधारे जुळणी झाल्याशिवाय ते अस्तित्वातच येऊ शकत नाही.

**उदाहरणार्थ :-** संत एकनाथांच्या "विंचु चावला" या भारुडातून माणसातील गुणधर्माचे आणि विंचवाचे गुणधर्म यांचे साम्य दाखविले आहे.

माणसाच्या मनातील काम, क्रोध, लोभ, मत्सर, द्वेष, तीरस्कार हे षड़रिषू आहे हे माणसाच्या मनात निर्माण झाले की माणूस ही विंचवाच्या नांगीतून निघणाऱ्या जहराप्रमाणे वर्तन करतो. वरील विकार माणसाच्या मनात उद्भवले की त्याचे बोलणे जहरासारखे कडू वाटायला लागते. कशाही प्रकारे बोलला तरीही दुसऱ्याचे मन दुखावल्या शिवाय राहत नाही. अशा माणसाला गुरुप्रसादाचा उतार मिळाला की त्याचे मन निर्मळ झाल्याशिवाय राहणार नाही. असा दुसरा एक अध्यात्मिक अर्थ आढळून येतो.

**मुक्तछंद** :-

प्राचीन मराठी काव्यात श्लोक रूपाने वृत्तबंध रचना आढळते तर भावकाव्यासाठी ओवीचा तसेच अभंगादी रचनांचा उपयोग केलेला आहे. वृत्त, मात्रावृत्ते, जातिवृत्ते या सर्वांचा वापर असला तरी 'मुक्तछंद' हा रचना प्रकार अर्वाचीन काळातील आहे. या रचनेची काही प्रवृत्ती व खुणा केशवसुतांच्या रचनेत आढळतात. या दृष्टीने एक प्रयत्न स्वातंत्र्यवीर कवी

वि.दा.सावरकर यांनी केला होता. त्यांनी वैनायक नावाचे वृत्त वापरले. हे वृत्त निर्ममळ व प्रवाही छंदात तीन मात्रक गटानंतर एक गूरु अशी याची रचना होती.

**उदा.**

ये मृत्यो, ये तू ये यावया प्रती
निघालाच असशिल तरी.....

मुक्तछंदात मराठी रचना झाली त्याच्या या सुरवातीच्या काळात पु. शि. रेगे व द. वा. शिदोरे ही दोन नावे यासंबंधी घेता येतील.

## मुक्तछंदाचे स्वरूप :

१) मुक्तछंदात लहान लहान चरण असतात. त्यांना चरणक किंवा उपचरण म्हणतात.

२) चरण सामान्यतः चार ते सात अक्षरांचे असतात.

३) एका ओळीत किती चरम असावेत यावर बंधन नाही. पण संकेत असा आहे की, एक ते चार चरणके असावीत.

४) कडवे किती ओळींचे असावे यामध्ये बंधन नाही.

५) संकेत असा आहे की एक कल्पनाविचार किंवा एक संवेदना पूर्णपणे कडव्यात यावी.

६) लयबद्धता मात्र असलीच पाहिजे.

**उदा.**

ओळ १ - **आज माझा प्रत्येक शब्द**
४ अक्षरे ३ अक्षरे
(४ अक्षरांचे पहिले चरणक ५ अक्षरांचे दुसरे चरणक एकूण दोनच चरणके आहेत.)

ओळ २ - **आभाळ झालाय**
(६ अक्षरांचे एकच चरण)

ओळ ३ – **सडून होतो, पडून होतो कढून होतो**
(पाच-पाच अक्षरांची तीन चरणके आहेत.)

## प्रश्नावली

१) शब्दशक्ती म्हणजे काय ? ते सांगून त्याचे विवेचन करा.

२) विविध शब्दशक्ती कोणत्या ? त्यातील कोणत्याही दोन शब्दशक्ती प्रकारासह स्पष्ट करा.

३) साहित्याची भाषा म्हणून अभिधेचे कार्य सविस्तर विषद करा.

४) साहित्याच्या भाषेचा विचार लक्षणा या शब्दशक्तीच्याद्वारे विषद करा.

५) व्यंजना या शब्दशक्तीचे स्वरुप स्पष्ट करून साहित्याची भाषा या दृष्टीने व्यंजनेचा विचार कसा करता येईल.

## एका वाक्यात उत्तरे द्या.

**१) लक्षणेचे दोन प्रकार कोणते ?**

शुद्धा व गौणी

**२) अभिधेचे प्रकार कोणते ?**

योग, रूढी, योगरूढी

**३) गौणी लक्षणेचे दोन प्रकार कोणते ?**

सारोप व साध्यवसाना

**४) उपादान लक्षणा दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखली जाते ?**

अजहल्लक्षणा

**५) लक्षण-लक्षणा दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखली जाते ?**

जहल्लक्षणा

✞✞✞✞

# ३

## साहित्याची निर्मिती प्रक्रिया

कवीच्या प्रतिभा शक्तीद्वारे शब्दार्थानी बद्ध झालेली भावनात्मक कलाकृती म्हणजे काव्य होय. भावनात्मक कलाकृतीचा आविष्कार हे साहित्याचे प्रधान कार्य आहे. हे ज्यायोगे साधते ती शक्ती म्हणजे प्रतिभा होय. वैविध्यपूर्ण, रम्य, सुखादी कल्पना आणि तिच्या अभिव्यक्त करण्यास अनुकूल असे शब्द जिच्या योगे प्रतित होतात ती मनाची शक्ती म्हणजे प्रतिभा होय.

प्रतिभा ही एक अलौकिक शक्ती आहे. तिच्या साहाय्याने दिव्य स्वरूपाचे ज्ञान कवीजवळ येत असते. साहित्याचे जे अनोखे विश्व कवी निर्माण करीत असतो ते त्याच्यापाशी असलेल्या प्रतिभा शक्तीच्या साहाय्याने. कवी केशवसुतांनी ती अद्‌भुत शक्ती कवी निर्मितीचा कानमंत्र देणारी जणू शारदाच आहे असे म्हटले आहे. तर तुकाराम महाराजांनी प्रतिभा म्हणजे कवीच्या अंतःकरणात मूळ स्वरूपात वस्ती करून राहणारा झराच आहे. समर्थ रामदासांच्या मते, ती 'आदिशक्तीची ठेवण' आहे. अगदी प्राचीन काळापासून प्रतिभा ही एक अतींद्रीय शक्ती आहे असा समजण्याचा परिपाठ आहे. म्हणून प्रतिभा ही अलौकिक शक्ती आहे.

**प्रतिभेच्या व्याख्या –**

**हेमचंद्र व वाग्भट –**

"नवोन्मेषशालीनी प्रज्ञा प्रतिभा |"

**अभिनवगुप्त –**

"अपूर्व वस्तूनिर्माणक्षमः प्रज्ञा प्रतिभा |"

**मम्मट –**

**"शक्ती कवित्व बीजरूपः संस्कार विशेषः |"**

याविन काव्य न प्रसरेत, प्रसरेत वा उपहासनीय भवते ||

अपूर्व वस्तू निर्माणक्षमप्रज्ञा प्रतिभा किंवा नवोन्मेषशालीनी प्रज्ञा प्रतिभा या व्याख्यांमध्ये काव्यनिर्मितीच्या प्रेरणांत प्रतिभा हा घटक महत्त्वपूर्ण आहे हे सिद्ध होते. पुढे मम्मटाने काव्यनिर्मितीची तीन कारणे सांगताना म्हटले आहे.

**"शक्तिर्निपुणता लोकशास्त्र काव्याद्य वेचक्षणात इतिहेतू तद्‌दभवे ||"**

यात शक्ती म्हणजे प्रतिभाशक्ती, निपुणता म्हणजे व्युत्पत्ती आणि अभ्यास या तीन शक्ती काव्य निर्मितीची जनक कारणे आहेत. त्यात प्रतिभा हे सर्वश्रेष्ठ, सामर्थ्यशाली शक्ती आहे आणि प्रतिभेखालोखाल व्युत्पत्ती व अभ्यास. याच्याशिवाय काव्यनिर्मिती अशक्य आहे.

## "नवोन्मेषशालिनी प्रज्ञा प्रतिभा -"

भावनात्मक अनुभूतीचा आविष्कार हे ललित साहित्याचे प्रधान कार्य आहे. ज्या शक्तीच्या योगे हे कार्य होते. ती शक्ती म्हणजे प्रतिभा होय. दण्डीच्या मते अशी प्रतिभाशक्ती प्राप्त होणे हा पूर्वजन्मीच्या संस्काराचा परिणाम आहे. पूर्ववासनागुणानुबंधी प्रतिभानम् अशी त्याने प्रतिभेची व्याख्या केली आहे. मम्मट म्हणतो प्रतिभाशक्ती म्हणजे कवित्व बीजरूपी संस्कार होय. या विना जर काव्य निर्माण झाले तर ते उपहासात्मक होईल. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, काव्यनिर्मितीमध्ये प्रतिभा हे एक आवश्यक अंग आहे. तिच्याअभावी चांगल्या काव्याची निर्मिती होऊ शकत नाही. काव्यरचनेस अनुकूल अशी शब्दार्थाची मांडणी जिच्यामुळे कवीला करता येते. अशी शक्ती म्हणजे प्रतिभा.

अभिनवगुप्ताच्या मते प्रतिभेचे सामर्थ्य अपूर्ववस्तूनिर्माण क्षमतेत आहे. केवळ शब्दार्थाच्या मांडणीने काव्यरचना होत नाही तर शब्दार्थाने अभिनयन करणारी शक्ती म्हणजे प्रतिभा. रूद्रटाने प्रतिभेच्या रूपाविषयी विस्ताराने लिहिले आहे. ज्या शक्तीच्या योगाने मनोवृत्ती तल्लीन होणे आणि विषयासंबंधी विस्फुरण होऊन आपोआप उचित शब्द सुचतात. ती शक्ती म्हणजे प्रतिभाशक्ती होय. दण्डीच्या मते प्रतिभाशक्ती ही पूर्वजन्मीच्या वासनागुणांवर अवलंबून असणारे हे ज्ञान म्हणजे एक प्रकारची मानसिक शक्ती होय.

Poets are born, not made या इंग्रजी वचनातील अर्थ असाच आहे की कवी जन्माला यावे लागतात, ते तयार करता येत नाही. म्हणून प्रतिभा श्रेष्ठ व अत्यावश्यक काव्यशक्ती आहे.

प्रतिभेचे अंतरंग उलगडून दाखविणे कठीण असले तरी उज्वल प्रतिभाशक्ती आणि सौंदर्यसमीक्षादृष्टी याचा मनोहर संगम तिच्या ठिकाणी झालेला असतो. हे मान्य करण्यास हरकत नाही. कल्पना हा कवितेचा प्राण होय. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे म्हणतात ते कवीच्या याच प्रतिभाशक्तीच्या जोरावर. परमेश्वराच्या मायावी शक्तीप्रमाणेच कवीच्या ठिकाणी ही एक दिव्यशक्ती असते असे मानले जाते. याच दिव्यशक्तीच्या म्हणजे प्रतिभा शक्तीच्या जोरावर कवी वाङ्मय निर्माण करीत असतो.

## प्रतिभेचे अलौकिकत्व -

प्रतिभा ही एक अलौकिक शक्ती आहे असा समज रूढ होण्यासंबंधी तिचे एक तत्त्व म्हणजे तिचे विरलत्व. ती फार थोड्यांनाच प्राप्त होते. त्यामुळे प्रतिभेला अलौकिकत्व प्राप्त झाले आहे. संतानीही ईश्वराच्या कृपाप्रसादाने काव्यनिर्मिती झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे या मताला अधिकच पृष्टी मिळाली आहे. 'मज विश्वंभर बोलवितो ' असे ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर यांनी म्हटले आहे. याशिवाय आधुनिक कवी केशवसुत शारदेने कानमंत्र दिल्याने काव्यलेखनास प्रवृत्त झालो असे म्हणतात.

मानसशास्त्रज्ञ म्हणतात की, प्रतिभा ही एक मानसिक विकृतीचा भाग आहे. विकृती म्हणजे सामान्य माणसाच्या मनोवृत्तीतून वेगळेपण दिसून येते. एवढाच अर्थ

घेतल्यास प्रतिभावंताचा मनोविकार विकृत असतो हे विधान मान्य करण्यास हरकत नाही. परंतु प्रतिभा ही वेडाची बहीण आहे हे इटालियन संशोधक लोंब्रोसो याचे मत मान्य करता येत नाही. प्रतिभा हे मानसिक विकृतीचे चिन्ह नव्हे. या अपूर्व इच्छाशक्तीचे काही महत्त्वाचे विशेष सांगता येतील.

१) कोणत्याही वस्तूच्या दृष्टीने विविध साम्यवाचक व विरोधात्मक कल्पना सूचने व त्याच्या कल्पनेने मनःचक्षूसमोर उभे राहणे हे प्रतिभेचे वैशिष्ट्य होय.

२) वस्तूदर्शनाने अपूर्व अशा कल्पनांचा साक्षात्कार होणाऱ्या नव्यानव्या कल्पना पुढे येणे हे प्रतिभा शक्तीचे दुसरे वैशिष्ट्य आहे. यात कवी आपल्या अनुभूतीला नवा आकार देण्याचे कार्य करीत असतो. त्याची ही जी नवी दृष्टी आहे ती प्रतिभेचा दुसरा विशेष होय.

३) व्यक्तिनिरपेक्ष स्वरूप शोधणे म्हणजे कलावंताचा अलिप्तपणा व्यक्तिगत भावना यामधील व्यक्तीनिरपेक्ष विश्वात्मक असा शोध हे कवीच्या प्रतिभेचे तिसरे वैशिष्ट्य आहे.

## प्रतिभा आणि स्फूर्ति -

प्रतिभाशक्तीच्या अलौकिकत्वाचा आशय पाहिल्यावर प्रतिभा आणि स्फूर्ति यांचे नाते काय आहे ते पाहणे महत्त्वाचे ठरते. प्रतिभावंताच्या निर्माण क्षमतेची ही जी उत्कट अवस्था आहे तिला स्फूर्ति म्हणतात. अशी व्याख्या आहे. आकाशात क्षणभर वीजेचा लोळ चमकून जावा त्याप्रमाणे कवीच्या अंतरंगात स्फूर्तिला आवेग येतो. त्याची सर्व मानसिक शक्ती त्यावेळी कार्यप्रवण होतात. विशिष्ट कल्पनेने कवी झपाटला जातो आणि त्याच्या तोंडून सहजोद्‌गार बाहेर पडतात. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' हे संत तुकारामांचे उद्‌गार या अवस्थेचे द्योतक आहेत. मनाची ही जी अवस्था होते तिचे कारण स्फूर्तिचा आवेग हेच होय. परंतु स्फूर्ति स्वतंत्र मानण्याचे कारण नाही. कारण स्फूर्ति प्रतिभेची क्षणिक आविष्कार किंवा विकास असल्याने प्रतिभेहून वेगळे असे स्वतंत्र अस्तित्त्व दिला नाही.

स्फूर्ति ही कवितेइतकी टिकावू नसली तरी प्रभावी जरूर आहे. विद्युल्लतेप्रमाणे चंचल असणारी स्फूर्ति क्षणभर तरळून जाते. तरी तेवढ्याच अल्पवेळेत कवीचे सारे अंतरंग उजळून काढण्याचे सामर्थ्य तिच्यात असते. कवीच्या प्रतिभेला जागृत करण्याचे काम स्फूर्ति करीत असते. तिचा स्वभाव लहरी आहे. ते केव्हाही जागृत होते. उचंबळून येते. तिला केव्हाही राबवणे कवीच्या हाती नसते तर ती जेव्हा प्रसन्न होईल तेव्हाच कवी तिचा उपयोग करू शकतो.

## कल्पनाशक्ती आणि उत्प्रेक्षा -

निर्मितीच्या प्रयोगातील सर्वात महत्त्वाचे अंग म्हणजे कल्पनाशक्ती. कवीच्या उत्प्रेक्षण सामर्थ्याचे सामान्यपणे कलात्मक निर्मितीसाठी आणि त्याच्यामध्ये केवळ कवी

आदी उत्कटतेचा शब्द असे म्हणण्यात येते हे चुकीचे आहे. या शक्ती भिन्न आहेत. उत्प्रेक्षण निर्मितीवर चैतन्याचा मानवी अंतःकरणाचा आविष्कार असतो. उत्प्रेक्षणातून क्षणभर चमत्कृतीचे मौन पहावयास मिळेल. पण वाचकाला एका वेगळ्या नव्या सृष्टीत नेऊन सोडण्याचे कार्य करते.

कवी निर्मितीत पूर्ण संग्रहीत गोष्टीचीच पुनर्रचना असते. हे पूर्णपणे सत्य नाही. श्रेष्ठ कवी आपल्या प्रतिभा बळाने अपूर्व अशी शक्ती निर्माण करतो. तो पुनर्रचना करत नाही. म्हणूनच कलानिर्मितीत उत्प्रेक्षण यामध्ये जो भेद आहे तोच नवनिर्मिती व पुनर्रचना यामध्ये आहे.

## व्युत्पत्ती -

प्रतिभेच्या खालोखाल व्युत्पत्तीला स्थान प्राप्त झाले आहे. मम्मटाने व्युत्पत्तीला निपुणता म्हटले आहे. ही निपुणता म्हणजे स्थावर जंगम संपत्ती/सृष्टी. याचे ज्ञान, शास्त्र म्हणजे छंदशास्त्र, व्याकरण, नृत्यृ गीते चित्रकला, कथन इत्यादी शाब्दीक ज्ञान. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरूषार्थाची माहिती. मोक्ष ज्ञानातील तत्त्वज्ञानाची माहिती यालाच बहुश्रुतता असे म्हणतात.

दण्डी व्युत्पत्तीला व्रत असे म्हणतात. अनुभव संपन्नता ही गोष्ट देखील व्युत्पत्तीत समाविष्ट केली आहे. व्युत्पन्नता आणि अभ्यास असे याचे प्रतिभेवर संस्कार होण्याची गरज हेमचंद्र आणि वाग्भट यांनी सांगितली आहे. कवी म्हणजे सत्य सृष्टीचा आविष्कार, मानवी जीवनाचा भाष्यकार. सत्यसृष्टीचे आणि मानवी जीवनाचे ज्ञान जितके खोल तितके त्याचे काव्य प्रत्ययकारी होण्याची शक्यता अधिक. काव्यवस्तूची रूपरेषा प्रतिभेने तयार केली जात असली तरी गतीला सौष्ठव (बळकटी) आणि सौंदर्य प्राप्त करून देण्यास कवीची व्युत्पन्नता उपयोगी पडते. म्हणून कवीच्या ठायी बहुश्रुतता असणे अत्यंत आवश्यक असते.

व्युत्पन्नता हा अत्यंत महत्त्वाचा गुण असला तरी त्याचे काव्य निर्मितीत स्थान प्रतिभा आणि भावनात्मकता यांच्या मानाने गौण ठरते. बहुश्रुततेच्या अभावी काव्यनिर्मिती होऊ शकते. प्रतिभा आणि भावनात्मकतेच्या अभावी काव्य निर्मिती होऊ शकत नाही.

## अभ्यास -

अभ्यास म्हणजे एखाद्या गोष्टीचे पुनः पुनः अवर्तन करणे, सराव करणे. यामुळे चर्चा करण्याचे सामर्थ्य आपल्याला प्राप्त होते. काव्यचर्चा करण्यात निपुण अशा लोकांजवळ त्यांच्या हाताखाली सतत काव्यनिर्मिती करत रहाणे म्हणजे अभ्यास असे संस्कृत साहित्यशास्त्रकाराचे म्हणणे आहे. काव्याच्या मर्मज्ञाच्या सहवासात राहणे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा पुन्हा काव्यरचना, लेखन करणे आणि सातत्याने सर्वांगिण साहित्याचे वाचन, चिंतन, मनन करणे आदी गोष्टी समाविष्ट असतात. अभ्यासात बाह्यांगाशी निगडीत विचार येणे आवश्यक असते. अंतरंग केवळ अभ्यासाने साध्य होत नाही. काव्याचे अंतरंग प्रयत्न साध्य आहे किंवा नाही याविषयी मतभिन्नता असण्याची

शक्यता असली तरी काव्याचे बाह्यांग रेखीव आणि निर्दोष करण्यासाठी होणारे अभ्यासाचे सहाय्य कोणासही नाकारता येत नाही.

कलात्मक मांडणी, रसानुकूल वृत्तरचना, समर्पक शब्द या बाबतीतील कौशल्य केवळ अभ्यास व सराव या योगेच प्राप्त होऊ शकते. कवी व्यापारात प्रतिभेचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे, अलौकिक असे आहे.

कवीच्या मनाचे सहज उद्‌गार म्हणजे काव्य. हे कितीही खरे असले तरी त्यात असंबद्धता, खडबडीतपणा, पुनरावृत्ती हे दोष नसलेले काव्य केव्हाही चांगले. बाह्यांग निर्दोष असेल तर अंतःरंगाकडे लक्ष वेधले जाते. ते केवळ प्रतिभेच्या जोरावर. काव्य सुंदर नाही किंवा ते सुंदर बनविता येत नाही, ते मुळात सुचावे लागते. त्यासाठी प्रतिभेचे देणे आवश्यक असते. पण काव्याचे बाह्यांग आकर्षक, रेखीव, निर्दोष बनविण्यात अभ्यासाचे महत्त्व आहे. तेव्हा साहित्य निर्मिती प्रक्रियेत प्रतिभा महत्त्वाची असली तरी बहुश्रुतता (व्युत्पत्ती) व अभ्यास तिच्या खालोखाल महत्त्वाचे आहेत. प्रतिभा बहुअंगी निसर्गदत्त असते. परंतु व्युत्पत्ती आणि अभ्यास प्रयत्न साध्य आहेत व ते श्रेष्ठ करण्यासाठी आवश्यक आहेत. मात्र मुळात प्रतिभा नसेल तर व्युत्पत्ती आणि अभ्यास यांना शून्य महत्त्व आहे. प्रतिभेला या दोन्हीची जोड द्यावी लागते.

काव्यकारणांमध्ये प्रतिभा, व्युत्पत्ती, अभ्यास ही तीन उत्पादक कारणे ठरतात. त्याचप्रमाणे भावनात्मकता, मानसिक-शारीरिक अवस्था, सभोवतालची परिस्थिती ही सहाय्यक कारणे सांगितली जातात.

✞✞✞✞

# कोलरीजचा कल्पनाशक्ती सिद्धांत

## कल्पनाशक्ती आणि चमत्कृतीशक्ती यातील स्वरूपभेद :-

कल्पनाशक्ती (Imagination) आणि उत्प्रेक्षण शक्ती या दोन शक्तींमध्ये भेद स्पष्ट करण्याचे श्रेय एस.टी कोलरीज या इंग्रजी कवीला आहे. कल्पनाशक्ती ही डोळ्यांना दिसणाऱ्या समोरच्या वस्तूपेक्षाही अधिक मोठ्या चमत्कारिक सुंदर गोष्टीची कल्पना करू शकतो. कांटच्या मते –

कल्पनाशक्ती ज्ञानाला कारणीभूत होणाऱ्या मनाच्या शक्तीपैकी एक आहे. संवेदना आणि संकल्पना यांच्यामधील प्रतीकात्मक स्वरूप प्राप्त करून देणारी शक्ती म्हणजे कल्पनाशक्ती होय. तिची सृजनशीलता प्रचंड आहे. या जगातील सामुग्रीला ती प्रती सृष्टीमध्ये नेऊन ठेवण्याइतकी संपन्न असते. कांटने कल्पनाशक्तीचा संबंध ज्ञाननिर्मितीशी लावला आहे. प्रतिमांची निर्मिती समोर दिसणाऱ्या वस्तुंना नवे रूप देणे हे कल्पनाशक्तीचे स्वरूप व कार्य वेगवेगळ्या पद्धतीने पाहिले जाते. पण तिची नवनिर्माणक्षमता सर्वांनीच मान्य केली आहे.

## कल्पनाशक्ती आणि उत्प्रेक्षण :-

स्फुर्तिच्या सहाय्याने सजीव होणारी ही प्रतिमा नुसती कल्पनाची आतषबाजी करत नाही. केवळ कल्पनांच्या स्वैर विहारात रमणारी शक्ती म्हणजे चमत्कृतीशक्ती. हिलाच उत्प्रेक्षण म्हणतात. कवीच्या मनात कल्पना, घटना, व्यक्तिरेखा स्फुरत असतात. त्यामधील काही अत्यंत रेखीव आकर्षक असतात. पण कवी हा त्याच्या आकर्षणात गुंतून पडत नाही. जो विशिष्ट अनुभव कवीला रेखाटायचा असतो त्यामध्ये ती कल्पना कितपत अनुरूप आहे याचे भान म्हणजे औचित्याचे भान त्याला ठेवावे लागते. व्यक्त होणाऱ्या अनुभवामध्ये त्या कल्पनेचे स्थान तिचे कार्य प्रतिभा लक्षात घेत असते. कल्पना, विलास आणि चोखंदळ औचित्य विवेक हे दोन्ही विशेष प्रतिभेमध्ये सतत जागृत असतात. पण जेव्हा कल्पना वैभव आपले लक्ष वेधून घेते. तेव्हा केवळ कल्पनेमुळे ते काव्य आपल्याला आवडू लागते. तेथे फक्त चमत्कृतीशक्ती प्रभावी असते.

इंग्रजी कवी कोलरीजने या दोन शक्तीमधील भेद स्पष्ट करताना (heart & head) हृदय आणि मस्तक यांतील भेदाचा आधार घेतला आहे. त्यांच्या मते उत्प्रेक्षण ही कल्पनाशी केलेली बरीच वैचारिक चमत्कृतीपूर्ण क्रीडा असते. तर कल्पनात्मकतेत चैतन्याचा किंवा मानवी अंतःकरणाचा आविष्कार असतो. उत्प्रेक्षणा म्हणजे कल्पनांचा स्वैर विहार होय. मात्र कल्पनाशक्ती ही एक संपूर्ण नवनिर्मिती साधणारी शक्ती होय. गोविंदाग्रजांच्या 'अरूण' कवितेत आपल्याला क्षणभर खिळविणाऱ्या उत्प्रेक्षणाशक्तीचा खेळ बघायला मिळतो. याउलट बालकवींच्या 'अरूण' या कवितेत कल्पनाशक्तीने साधलेल्या एका अपार विश्वाचे दर्शन पडते. त्यात प्रतिमा आणि आशय यांचे कवीच्या व्यक्तिमत्त्वात मुरून एकजीव झालेले रसायन जाणवते. कल्पनाशक्ती म्हणजे नवनिर्मिती साधणारी सर्जनशक्ती (Realtive Power) होय. ते प्रतिभेचे एक महत्त्वपूर्ण आधारभूत

अंग असते. कल्पनाशक्तीच्या कार्यात धारणाशक्ती आणि स्मरणशक्ती यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. मानवी मनावर नेहमी नानाविध संस्कार होत असतात. ते तसे विस्मृतीतही जात असतात. पण त्यांचा संचय त्याची धारणा कळत-नकळत मानवी मनात होते. स्मरणशक्तीच्या जोरावर त्यातील अर्थपूर्ण संस्कारांची माणूस पुनर्निर्मिती करत असतो. साहित्याच्या निर्मितीत ज्या जून्या संस्काराला नवे रूप, नवे संदर्भ लाभत असतो. हे कार्य धारणा आणि स्मरण या दोन शक्तीच्या साहय्याने कल्पना करते. हाच कवी व्यापार होय. जुन्या संस्कारांना निर्मितीमध्ये लाभणाऱ्या नव्या अपूर्व संदर्भामुळे चिरंतनताही प्राप्त होते. ती त्यामुळेच होय. यामागे क्षणिक टिकणारी कल्पनेची निव्वळ स्वैर भरारी म्हणजे उत्प्रेक्षा असते. खटकेबाज शब्दरचना एखादी आकर्षक कल्पना किंवा या दोन्हींनी युक्त अशी एखादी चमत्कृतीरचना इतपतच मर्यादित असे उत्प्रेक्षा शक्तीचे कार्यक्षेत्र असते. ती यामुळेच होय. यामागे क्षणिक टिकणारी स्वैर भरारी म्हणजे (Fancy) उत्प्रेक्षा नसते. खटकेबाज शब्दरचना एखादी आकर्षक कल्पना किंवा या दोन्हींनी युक्त अशी एखादी चमत्कृतीपूर्ण रचना इतपतच मर्यादित असे उत्प्रेक्षा शक्तीचे कार्यक्षेत्र असते.

✞✞✞✞

## घटक 'ड'

# ४

# साहित्याचे प्रयोजन

## प्रास्ताविक

साहित्याचे प्रयोजन सांगणे म्हणजे साहित्याच्या निर्मितीमागचा हेतू स्पष्ट करणे होय. प्रतिभावंत साहित्याची निर्मिती कोणत्या उद्दिष्टाने करतो हा प्रश्न प्राचीन काळापासून आपल्याकडे भरतमूनी, भामह, मम्मट, रूद्रट, वामन यांच्यासह पाश्चात्य जगात प्लेटो, ॲरिस्टॉटल इत्यादीनी सतत चर्चिला आहे. साहित्याचे प्रयोजन हा समीक्षेतील एक मध्यवर्ती विचार आहे. या प्रश्नाच्या उत्तरावरच सौदर्य, कला, वाङमयीन महत्ता या सर्व संकल्पनाचे अर्थ निश्चित होतात.

प्रयोजन म्हणजे हेतू, उद्देश होय. "काव्यनिर्मितीच्या वेळी जो हेतू साहित्यिकाने किंवा कवीने मनात धरलेला असतो. त्यालाच सर्वसाधारणपणे 'प्रयोजन ' म्हणतात." प्रयोजन म्हणजे विशिष्ट उद्दिष्टाच्या अनुषंगाने केली जाणारी निर्मिती. हे निर्मिती हेतूनिष्ठ किंवा प्रयोजनमूलक असते. प्रत्येक साहित्याच्या निर्मितीत आपण तिच्या निर्मात्याला आपण साहितनिर्मिती का करता ? असा प्रश्न विचारल्यास त्यावर मिळणारी अनेक उत्तरे ही त्या निर्मितीचे प्रयोजनेच सिध्द करतात. म्हणजेच प्रत्येक साहित्यनिर्मितीचा जो एक विशिष्ट हेतू असतो त्यातूनच साहित्यनिर्मिती किंवा काव्याची निर्मिती होत असते. यालाच साहित्याचे प्रयोजन म्हणतात.

मानवाच्या सर्वच प्रवृत्ती (कृती) काही ना काही तरी प्रयोजन डोळ्यांसमोर केल्या जातात. निष्कारण कोणतीही क्रिया केली जात नाही. काव्यरचनाही याचप्रकारे होत असते. त्यामुळे प्रयोजन हे नाव अजाणता घडणाऱ्या गोष्टीला लावणे इष्ट नाही. येथे परिणाम व प्रयोजन यामधील फरक ध्यानात घ्यावयास हवा. प्रयोजन हे विशिष्ट हेतूपुर्वक असते. परिणाम अहेतूपुर्वकही होतात. अन्नग्रहणाचे मूख्य प्रयोजन हे जीवितरक्षण किंवा क्षुधाशांती हे आहे. अन्नसेवन हेतूपुर्वक केले जाते. पण मर्यादेपेक्षा जास्त अन्नग्रहण केल्यास नाना प्रकारच्या व्याधी होतात. हा परिणाम आहे.

प्रयोजनाचा आणखी दोन अंगानी विचार करावा लागतो.

अ. **लेखकगत प्रयोजन** - यात साहित्यिक साहित्यनिर्मिती का करतो ?

ब. **वाचकगत प्रयोजन** - यात वाचक किंवा आस्वादक साहित्य का वाचतो ?

या दोनअंगानी प्रयोजनाचा विचार केला जातो. विशिष्ट वस्तूची प्रकृती हीच त्या वस्तूचे प्रयोजन ठरविते किंवा त्या वस्तूचे विवक्षित रूप ठरविते. खूपदा असेही घडते की नियोजित प्रयोजनावर निर्मिती प्रक्रियेतील वस्तूची शक्ती मात करते आणि वस्तूची प्रकृतीच बदलून जाते.

साहित्याचे प्रयोजन एकच एक असावे असे आपल्याला कितीही वाटले तरी जीवनात माणसाच्या वेगवेगळ्या भूमिका असतात. प्रत्येक प्रश्नाकडे त्या भूमिकांमधून पाहिले जाते. त्यामुळे प्रश्नांची वेगवेगळी उत्तरे पुढे येतात. साहित्याच्या प्रयोजनासंबधी येणारी वेगवेगळी उत्तरे ही जीवनभूमिकांशी निगडित असतात. त्यामुळे साहित्याची वेगवेगळी प्रयोजने सांगितली गेली आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रयोजनाला विशिष्ट भूमिकेचा चेहरा असणे अटळच असते. म्हणून वेगवेगळे जीवनविषयक दृष्टिकोन जोपर्यंत आहेत तोपर्यंत प्रयोजनासंबधी एकमत घेणे अशक्य आहे. प्रयोजनविषयक उत्तरावर पुढल्या अनेक प्रश्नांची उत्तरे अवलंबून असतात. प्रयोजन भिन्नतेच्या पोटी समीक्षेतील सर्व प्रकार आणि पद्धती जन्माला आल्या आहेत. जीवनातील भूमिकांचे युध्द किंवा जीवनातील सर्व नैतिकमूल्याचा संघर्ष प्रयोजनविचारातूनच साकार होतो. या प्रश्नावर रणे माजतात आणि साहित्यशास्त्रात हा मुद्या चर्चेचा अथवा मध्यवर्ती बनतो. त्याचेही कारण जीवनातील भूमिका हेच आहे. हे खरे असले तरी या संदर्भात कलेच्या मूळ प्रकृतीचे ध्यान बाळगणे आवश्यक आसते. आपल्या अस्तित्वाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी आदिमानव सुधारणा करीत करीत आपली हत्यारे सुंदर करीत गेला. असे सुंदर पाते असलेले हत्यार शिकारीचा वेध घेण्यास अधिक सक्षम असते हे अनुभवाचेच त्याला सांगणे होते. उपयुक्त आणि सौदर्य यांच्यात एक सेंद्रिय नाते आहे. प्रयोजनाचा विचार करताना हे नाते विसरून चालत नाही.

## भारतीय साहित्यशास्त्रातील प्रयोजन विचार :-

(भरतमूनीपासून ते जगन्नाथाप्रर्यतचा प्रयोजनविचार)

व्यवहारोपयोगी वस्तूच्या बाबतीत प्रयोजनाचा विचार साधा सरळ असतो वस्त्र निर्मितीचे प्रयोजन शरीराचे आच्छादन करणे आणि शरीर सौदर्य खुलविणे असे प्रयोजन चटकन सांगता येते पण कलावस्तू किंवा साहित्यकृती यांचे प्रयोजन चटकन सागता येत नाही. साहित्यिक साहित्यिकृती का निर्माण करतो. याचे उत्तर गुंतागुतीचे आहे. त्यामुळे प्रयोजनाबाबत पौर्वात्य आणि पाश्चिमात्य समीक्षकांनी वेगवेगळे मते नोंदवली आहेत. साहित्याची अनेक प्रयोजने असतात. काव्यची प्रकृतीच उपयोग ठरवित असते. एखाद्या साहित्यकृतीत साहित्याच्या प्रयोजनाच्या दृष्टीने अनावश्यक परतू एकंदरीत मनोवेधक व अन्य कारणास्तव समर्थनीच असा बराचसा भाग असू शकतो त्यावरूनच साहित्याचे प्रयोजन लक्षात येते. भारतीय साहित्यशास्त्रामध्ये वामन, जगन्नाथ, भरतमूनी, दगडी, भरतमूनी, दगडी, भामह,मम्मट रूद्रट यांनी काव्याची अनेक प्रयोजने सांगितली आहेत. त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे

संस्कृत साहित्यशास्त्रात काव्याच्या नावाने ललित साहित्याचा विचार झालेला आहे.भरताने

**हितोपदेशजननं धृतिक्रीड़ासुखादिकृत ।।**
**दुःखार्ताना श्रमार्ताना शोकार्तानां तपस्विनाम् ।।**
**विश्रांतीजननं... हितं बुध्दिविवर्धनम्।**

(भरतः नाट्यशास्त्र १.११३ -११५)

या वचनातून हितकर उपदेश म्हणजे श्रृतिस्मृतीप्रमाणित सदाचाराचा उपदेश तसेच लोकांची करमणुक आणि सुखप्राप्ती ही प्रयोजने सांगितली आहेत. याच ग्रंथात त्याने समर्थ ़असुनही दुःखार्त असणारे व असमर्थ असेल तर साहजिकच अधिक दुःखार्त असणारे असे जे लोक असतात अशांना काही विश्रांती मिळावी म्हणुन नाटक लिहले जाते व पाहिले जाते असे म्हटले आहे. हे नाट्याच्या प्रयोजनाचे काव्याकडे अनुसंधान जोडले तर सबंध साहित्याचे हे प्रयोजन ग्राह्य मानायला काही हरकत नाही.

भामहाच्या मताने चांगल्या काव्यरचनेने धर्म अर्थ काम मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ लाभून चौसष्ट  कलामध्ये प्रगती होऊन प्रीती म्हणजे आनंद व कीर्ती म्हणजे यश याची प्राप्ती होते. हे सांगताना

**धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्य कलासु च**
**प्रीति करोती कीर्ति च साधुकाव्यनिबंधम्।**

(भामहः काव्यालंकार. परि.१, श्लोक २)

वामनाने यांपैकी प्रीती व कीर्ती ही दोन प्रयोजने काव्यालंकारसुत्र या ग्रंथामध्ये मांडली आहेत.

**काव्यं सल् दृष्टादृष्टार्थ प्रीतिकीर्तिहेतुत्वात्**

वामनः काव्यलंकारसुत्रे १.१.५

रूद्रहाने चतु:र्वर्गावरच भर दिला आहे. हे सांगताना

**'ननु काव्यन क्रियते सरसानामवगम :  चतुर्वर्गे'** असे म्हटले आहे.

रूद्रट : काव्यलंकार १.५

अभिनवगुप्ताने प्रीति आणि व्युत्पति हे दोन प्रयोजने सांगितली आहेत प्रीती म्हणजे आनंद आणि धर्म काम मोक्ष या चार पुरूषार्थाच्या सिद्धीसाठी आवश्यक उपायांची जाण म्हणजे व्युत्पत्ति होय. ही जाण उपदेशरूप नसते. ती रसरूप असते. म्हणजेच काव्यात एकजीव झालेली असते.

यावरून अभिनगुप्त याच्यासह भामह, दगडी, कुन्तक, विश्वनाथ, वामन, रूद्रट, या साहित्य मीमांसकांनी प्रीति आणि व्युप्तति ही दोन प्रयोजने स्वीकारली आहेत.

मम्मटाने काव्याची प्रयोजने व्यक्त करणारी एक यादीच दिली आहे. त्याने सांगितलेल्या सूत्राचा अनेकदा उल्लेख केला जातो, त्यात-

**काव्यं यशसे, अर्थकृते, व्यवहारविदे ,शिवेतरक्षयते,**

**सद्यः परनिर्वृतये, कांतासंमिततयोपदेशयुजे।**

(मम्मट : काव्यप्रकाश ३.१ का.२)

काव्यप्रकाश या ग्रंथात मम्मटाने दिलेली साहित्याची सहा प्रयोजने खालीलप्रमाणे १)यश २)अर्थप्राप्ती ३)व्यहारविदे ४)अशुभनिवारण ५)तात्काळ होणारा उच्च /निखळ आनंद ६) पत्नी ज्या रोचक पद्धतीने उपदेशकरिते तसा उपदेश. मम्मटाने सांगितलेली ही प्रयोजने आणि इतराच्या साहित्यप्रयोजनात चतुर्वर्गाचा आलेला उल्लेख यांना आजच्या युगातही कमी अधिक प्रमाणात महत्त्व आहे. इतर साहित्यकारांची प्रयोजने मम्मटाच्या प्रयोजनविचारात कमी अधिक प्रमाणात सामावलेली आहेत. त्यामुळे मम्मटाची प्रयोजनविषयक भूमिका सविस्तर पहाणे उचित ठरले.

## मम्मटाचे साहित्य प्रयोजने

### १) यश :-

यशःप्राप्ती हे प्रयोजन लेखकाच्या डोळ्यापुढे अधिक असते. सर्वच लोकांना आपल्या कर्तृत्वाने आपला नावलौकिक व्हावा. आपले नाव अजरामर व्हावे असे वाटणे स्वाभाविक आहे. त्याप्रमाणे आपल्या काव्यलेखनाची रसिकांनी बूज राखावी. कलाकृतीचा आणि आपला उचित सन्मान व्हावा अशी प्रत्येक प्रतिभावंत कवीची आंतरिक ईच्छा असते. आपल्या कृतीविषयी अनुकूल मत पडतात आनंद व्हावा, प्रतिकूल पडताच दुःख व्हावे हीच गोष्ट साहजिक आहे. आनंद अथवा दुःख होण्यातच यशाच्या इच्छेचे गमक आहे. कवी कितीही विद्वान अगर समजुतदार असला तरी बहुधा /शक्यतो मुक्त नसतो. कीर्ती म्हणजे यश मिळावे या ईच्छेचे प्रमाण कमी अधिक असेल .उदा. भवभूतीने त्या काळात आपल्याला समान धर्मा भेटला नाही म्हणून 'उत्पत्स्यते ऽ स्ति मम को ऽ पि समानधर्मा 'असे आत्मविश्वासाने औद्धत्याने म्हणाला, थोडावेळ तो दुःखी झाला परंतु काळ हा अनंत आहे. काळाच्या ओघात असा एखादा समानधर्मा भेटेलच ! असा आशावाद त्याने ही व्यक्त केला त्यातून यशप्राप्तीच अपेक्षा दिसून येईल

कवी गुणाढ्याने आपले रक्त आठवून जो ग्रंथ लिहला त्याची तत्कालीन राजाने कदर केली नाही म्हणून त्याने आपला ग्रंथ अग्नीला अर्पण केला. या कृतीमागे आपल्याला कीर्ती लाभावी अशीच कवीची अपेक्षा दिसून येते. 'क्व च अल्पविषया मतिः' असे म्हणणाऱ्या कालिदासाला ती नव्हती असे थोडेच आहे ? एखादा प्रसिद्धीलोलुप कवी आपली आपणच आरती ओवाळून घेईल तर एखादा खरोखरीचा मोठा कवी आपली स्तुती ऐकून केवळ स्मित करील असे कीर्तीच्या इच्छेचे प्रमाण कमी अधिक असेल.

परंतु सगळेच कवी या उद्देशाने लिहतात असे म्हणता येणार नाही. उदा. ज्ञानेश्र्वरादी संतकवीच्या बाबतीत हे प्रयोजन होते असे म्हणणे अयोग्यच नव्हे तर चुकीचेही होईल. तेच केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज या कवीच्या बाबतीत म्हणावे लागेल. या सर्व

कवीच्या बाबतीत यश मिळावे यापेक्षा काहा लिहावे,व मनात काही सांगावयाचे आहे. ते लिहून त्याला सुंदर रूप द्यावे हीच इच्छा मूळ व प्रबळ ठरते.

**२) अर्थप्राप्ती :-**

अर्थ म्हणजे द्रव्य, आपले ऐहिक जीवन सुखी समाधानी बनवायचे असेल तर माणणसाला पैशाची जरूरी आहे. माणूस श्रम किंवा कष्टाच्या जोरावर अर्थ प्राप्ती करूण घेतो. पैशाच्या मोबदल्यात आपले श्रम विकणे हे प्राचीन काळापासून चालत आले आहे. पूर्वी राजे लोक गुणवान लोक संग्रहीत करीत असत. त्याच्या काव्याचे वाचन करून, सेवन करून त्यांना काही द्रव्य देत असत. पुढे त्याला नेमून वेतन,वर्षासन देत असत त्याला राजाश्रय म्हणत. ज्याला राजाश्रय लाभला, ज्याचा मानसन्मान झाला त्यास ‘राजकवी ’ असे म्हणत. आपल्याकडे पूर्वीच्या काळी राजदरबारातून अजूनही इंग्लंडमध्ये किंवा काही संस्थानातून ही प्रथा होती. कलेच्या जीवावर उपजिविका करणाऱ्या काही शाहीरी कवीचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. इतकेच नव्हे तर मम्मटाने हर्षासून धावकादी कवींना द्रव्यप्राप्ती झाल्याचा उल्लेख केला आहे. फार्सी कवी फिरदौसी याने आपला ‘शहानामा ’ हा ग्रंथ द्रव्यप्राप्तीच्या आशेनेच लिहिला असे म्हणतात. विक्रमांकदेवचरित अथवा नवसाहसांकचरित हे संस्कृत महाकाव्ये मूळ अर्थप्राप्तीच्या हेतूनेच लिहली गेली असावीत. कवी कालिदास - बाण यांना ती प्राप्त झाली असे म्हणता येईल. शिवाजी महाराजाच्या वेळी कवी भूषण यास बरेच वैभव मिळाले होते. ग्वाल्हेर  संस्थानचे राजकवी भा. रा. ताबे. आणि इतरांचीही नावे नोदंविता येतील.

पण यालाही कवीचा अपवाद दिसून योतो. काव्य रचना करणाऱ्या साऱ्यानाच द्रव्य मिळाले किंवा मिळावे म्हणूनच साऱ्यांनी रचना केली या दोन्ही गोष्टी खऱ्या नव्हेत. काही कवी अतिशय स्वाभिमानी होते. द्रव्य मिळावे म्हणून ते साहित्यनिर्मिती करीत नाहीत. उलट ते राजाश्रय व द्रव्य (पैसा) यांना नकार देतात. उदा. कवी नरेंद्र, परशुराम, संत तुकाराम, यांना पैशाचा लोभ नव्हता. भवभूती, जयदेव, माघ,भर्तृहरी या कवींना राजाश्रय लाभला नव्हता. परंतु त्याचेही काव्य श्रेष्ठ ठरले आहे.

त्याच प्रमाणे आजच्या आधुनिक युगात औद्योगिक क्रांती झालेली आहे. व्यापारवृद्धी झालेली आहे. अर्थ प्राप्तीचे अनेक मार्ग खुले झाले आहेत. त्यामुळे साहित्यलेखनातून अर्थ प्राप्ती होईल असे समजणे चुकीचे होईल. हा बिनभरवशाचा धंदा आहे. असे म्हटले तर उचित होईल. कित्येक कवी तर स्वतःच्या पदरचा पैसा खर्च करून आपल्या काव्यचे प्रकाशन करतात. त्यामुळे केवळ काव्यलेखनावर जगणारा कवी दुर्मिळच आहे.

**३) व्यवहार विज्ञान :-**

काव्य ‘व्यवहारविदे ’ आहे असे मम्मटाने म्हटले आहे.‘व्यवहार’ या शब्दाचा त्याने अतिशय मर्यादित अर्थ घेतला आहे. त्यात राज दरबारातील संकेत प्रघात इत्यादी विषयीचे ज्ञान. यात राजदरबारारीचा व्यवहार एवढाच अर्थ मर्यादित होता. पण आज साहित्याने

संपूर्ण मानवी व्यवहारालाच व्यापून टाकले आहे. त्यात व्यवहारात्तील चालीरीती, रूढी - परंपरा, संकेत इत्यादी संस्कृतीरक्षक घटकांचा समावेश होतो. त्याच प्रमाणे विविध स्वभावाचे, वृत्ती प्रवृत्तीचे, नीत्तिमत्तेचे, तत्वज्ञानाचे आणि संघर्षाचे चित्रण साहित्यातून वाचकाला होते. तसेच मानवी मनाचे गुढ व्यापार कवीने साहित्यातून चित्रित केलेले असतात. उदा. हॅम्लेटची विकारवशता, मॅकबेथची महत्वाकांक्षा आणि झालेला व्यक्तीचा अध:पात विल्यम शेक्सपियरच्या हॅम्लेट या नाटकातून आपल्याला त्यांच्या स्वभावाची माहिती मिळेल. तर  उत्तररामचरित्रात सत्य, न्याय आणि लोकमत यांच्या परस्पर विरोधात्त सापडलेल्या रामाची अनुकंपनीच आवस्था, मेघदूतामधील शृंगारिक वर्णने इत्यादीचे दर्शन आपल्याला घडते. नुसते महाभारत जरी अभ्यासले तरी धर्मराजाची सत्यनिष्ठा, द्रोपदीचा मानी स्वभाव, भीमाचा उतावळेपणा, धृत्तराष्ट्राचा पुत्रलोभ आणि मनाचा कमकुतपणा, गांधांरीचे पातिव्रत्य, कर्णीचा उदार परंतु अहंकारी स्वभाव, शकुनी मामाचा निर्भेळ दुष्टपणा, कपटीपणा, परंतु भित्रेपणा, भीष्मद्रोणादिकांचे अर्थदास्य, अश्वत्थाम्याची सूडाची भावना या व इतर व्यक्तीचे परस्परविरोधी व सहकार्याचे संबध. त्याचे महाभारतात झालेले पर्यवसान. त्यामुळे या ग्रंथास आलेले व्यवहारज्ञानाचे स्वरूप खरोखरच विस्मयजनक आहे.

उत्तम कादंबरीप्रमाणेच उत्तम काव्य, नाटक, कथा सुध्दा गहन व गुंतागुतीच्या व्यवहाराचे स्वरूप यथार्थपणे डोळ्यासमोर उभे करू शकते. त्यामुळे कोणाही वाचकाला जगातील अनेक गुढ प्रकाराचे सुक्ष्म धागेदोरे समजू शकतील. त्यामुळे प्रत्यक्ष साऱ्या गोष्टीचाही अनुभव न घेता जगातील व्यवहाराचे बरेचसे ज्ञान वाचकास प्राप्त होऊ शकेल. एकेका माणसाचे जीवित मर्यादित असते. त्यामुळे त्याच्या कालवधी आणि अनुभवही मर्यादित असतो. त्यामुळे काव्यवाचून स्वतःचे नसले तरी दुसऱ्याचे अनुभव वाचकाला वाचावयास मिळून त्याच्या बौद्धिक क्षमतेत वाढ होते. व जगाचा व्यवहार चांगल्याप्रकारे जाणू शकतो. म्हणून मॅथ्यू अर्नोल्ड यांनी काव्य ही जीवनावरील टीका आहे. ते जीवनाचा अर्थ लावते, अशी काव्याची व्याख्या केली आहे. अर्थात लोकव्यवहाराचे ज्ञान हे प्रयोजन वाचकाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. कारण कवी जे मांडतो ते त्याला आधीच अवगत असते. तसेच परिणाम व प्रयोजन यांमध्ये वर जो फरक दाखविला आहे तोही इथे आवश्य लक्षात घ्यावयास पाहिजे

### ४) अशुभ निवारण :-

शिवेतर म्हणजे अशुभ. क्षयते म्हणजे निवारण.काव्याच्या निर्मिती व वाचनामुळे अशुभाचे निवारण होते. संकटे नष्ट होतात अशी प्राचीन काळापासून श्रध्दा व विश्वास आहे. त्यामुळे मम्मटाने याचा आपल्या प्रयोजनविचारात उलेख केला आहे. प्राचीन काळी कवीला ज्ञानी म्हणत असत. मंत्रदृष्टा असे संबोधत. मंत्राचे उच्चारण करून देवताना आव्हान करण्याची दैवी शक्ती त्याच्यामध्ये असते तिलाच यात्वात्मक शक्ती  (Magical Potence) असे म्हणतात. यातून काही विधी केले जात. जपतप केले जात.

अशुभनिवारण या प्रयोजनाचे मम्मटाने मयुराचे उदाहरण दिले आहे. मयुराने सूर्यशतक लिहल्याने त्याचे कुष्ठ बरे झाले. असे म्हणतात. दुसरी दंतकथा जगन्नाथ पंडिताची म्हणता येईल. त्याने एका यवन स्त्रीशी लग्न केले. त्यामुळे काशीच्या ब्राम्हणानी बहिष्कार टाकला. त्यावेळी गंगेच्या एका घाटाच्या वरच्या पायरीवर बसून त्याने आपले गंगालहरी काव्य लिहले. काव्याचा एकेक श्लोक रचला जात असताना गंगेचे पाणी एकेका पायरीने चढत होते. व बावन्नाव्या श्लोकास तिने जगन्नाथास स्पर्श करून यवनीसह पावन करून घेतले. नंतर ब्राम्हणांनी त्यांच्याशी व्यवहारास प्रारंभ केला.

बिल्हणकवीला त्याच्या भृंगारमूलक अपराधावरून सुळावर देण्याची शिक्षा झाली असता एक शृंगारप्रचूर काव्य रचिल्यामुळेच त्याची मुक्तता झाली. अशीही दंतकथा आहे. अशाप्रकारे काव्यच्या लेखनामुळे लौकिक जीवनामध्ये काही ना काही फळ प्राप्ती झाल्याची उदाहरणे आहेत.

आधुनिक काळात मि. ब्राऊनिंग आणि मिसेस ब्राऊनिंग यांचा परिचय व विवाह दोघामध्ये असणाऱ्या काव्यगुणांमुळे झाला. आधुनिक मराठी काव्य इतिहासातही कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे, इंदिरा संत आणि नामा संत हे साहित्यिक दापत्य त्याच्यामध्ये असणाऱ्या काव्यगुणांमुळे सफल झाले आहेत. पण यामुळे विवाह हे काव्यरचनेचे प्रयोजन कोणी गंभीरपणे प्रतिपादन करू लागला तर त्याला वेडयात काढावे लागेल.

सारांश अशुभ निवारण हे काव्याचे नित्य उद्दिष्ट नव्हे. अथवा काव्य लिहणे म्हणजे काही औषधोपचार नव्हे. त्याच्या अंतर्शक्तीमुळे एखादा रोग ,संकट यांचे कदाचित निवारण झाले असेल तर तो योगायोगाचा भाग होय. आजच्या विज्ञानयुगात मंत्रतंत्रावर कोणी विश्वास ठेवत नाही. मात्र त्यातून मानसिक शक्तीला आव्हान असेल तर हे नाकारता येत नाही.

**५) सद्यपरनिर्वत्तये** (तात्काळ होणारा निखळ आनंद /आल्हाद)

या प्रयोजनाला स्वतःमम्मटाने 'सकलप्रयोजन मौलिभूत ' असे म्हटले आहे. आल्हाद हे सर्वश्रेष्ठ प्रयोजन होय. निर्माता व आस्वादक या दोघांनाही असा आल्हाद मिळतो असे म्हटले आहे. हा अनिर्वचनीय आल्हाद असतो. हा आल्हाद म्हणजे व्यावहारिक किंवा शारीरिक सुखापेक्षा वेगळा आणि शुद्ध, उच्च मानसिक आनंद असतो असे म्हटले गेले आहे. विश्वचैतन्यवादी किंवा सत् चिद् आणि आनंदरूप परमेश्वर मानणाऱ्या आणि विश्वाला परमेश्वररूपात पाहणाऱ्या आनंदवाद्याना ही भूमिका चट्कन सद्गदित करते. अभिनवगुप्त या प्रतीतीचे वर्णन 'विश्रांतिकारिणी ' असे करतो. तर कांट Disinterested joy अर्थात निरपेक्ष आनंद असे या आनंदाबद्दल म्हणतो.

अलिकडच्या काळात ज्ञानक्षेत्रात प्रचंड उलथापालथी होत आहेत. साहित्यविषयक समजुतीची इतकी मोडतोड होणे आहे की परिणामी जीवनाला किंवा

विश्वाला परमेश्वररूप म्हणजे सच्चिदानंदरूप मानण्याची प्रथाही आता बरीच मोडीत निघत आहे. आता आनंद अथवा आल्हाद हे प्रयोजन मानण्याची गरज आजच्या साहित्यमीमांसकांना वाटत नाही. ही गोष्ट डॉ. वि. ना. ढवळे यांच्यात शब्दात पुढीलप्रमाणे सांगता येईल "आनंद देणे हे पूर्वी साहित्यात एक मूल्य होते. हे मूल्य भारतीय व जूने पाश्चात्य समीक्षक फार महत्वाचे मानीत होते. हल्ली तो आनंद जवळ जवळ विसरला आहे." (वि. ना. ढवळे. साहित्याचे तत्वज्ञान पूणे १९९७ प्र. ७)

**६) कांतासम्मित उपदेश :-**

काव्याचे सहावे प्रयोजन उपदेश हे आहे. असे मम्मटाने सांगितले आहे. उपदेश म्हणजे बोध होय. साहित्यातून संस्कारक्षम मनावर सदाचाराचे संस्कार होतात. मनाला बोध होतो. अभिनवगुप्त आणि मम्मट या दोघांनीही तीन प्रकारचा उपदेश सांगितलेला आहे.

१. **प्रभुसंभित:-** श्रुतीस्मृतीमधून देवादिकांनी केलेला उपदेश. वेद म्हणजे धन्यासारखे चर्चा नही, शंका नाही, हा उपदेश असाच का ? असा तार्किक प्रश्न येथे विचारता येत नाही. वेद प्रमाणच असतात. असे या उपदेशाचे स्वरूप असते.

२. **सुहृदसंमित :-** मित्राने करावा असा उपदेश. यात प्रभुत्वाचा, अधिकाराचा भाग नसतो. तो स्वीकारणे न स्वीकारणे हा संबधित व्यक्तीच्या इच्छेचा भाग असतो. इतिहासपुराणांचा उपदेश असा असतो.

३. **कांतासंभित :-** या प्रकारामध्ये लालितकला, नृत्य, संगीत, शिल्प, इ. कलांचा समावेश होतो. या आस्वादाला सरळ बोध नसतो किंवा आज्ञाही नसते तर पत्नी जशी रोचक शब्दात आपल्या पतीला सल्ला देत. तसा उपदेश यामध्ये असतो. कांता केवळ पत्नी नाही. ती प्रिया आहे. तिची भाषा ह्दयाची, भावनाची ! इथे अधिकाराचे राज्य नाही इथे उपदेशही नाही. पण ही काळजाची बोली टाळताच येत नाही. त्यात आर्जव, विनंती, प्रसंगी अश्रु अशी भूमिका असते. त्यामुळे वडीलधाडी माणसांनी अधिकारयुक्त वाणीने सांगूनही जे पटत नाही ते कांतेने सांगितल्यास पटते. तशाच प्रकारचा उपदेश हितोपदेश, पंचतंत्र, इसापनीती, जातक इ. ग्रथातून केलेला आढळतो.

## पाश्चात्य साहित्यशास्त्रातील प्रयोजनचर्चा विचार :-

### आत्माविष्कार व जीवनभास्य

संस्कृत साहित्यमीमांसकांनी प्रयोजनचर्चा ही उपदेश आणि आनंद या दोन प्रयोजनाच्या परिघात फिरत असली तरी ही दोन्ही प्रयोजने परस्परविरोधी नाहीत. असे ही मानले जाते. चातुर्वर्ण्य व वर्णविहित पुरूषार्थ या साखळीत पुरूषार्थप्राप्ती आणि आनंद या गोष्टी एकरूपच आहेत. साहित्याने वैदिक धर्माचा उपदेश करावा आणि त्याच्या आचरणाचा आनंद द्यावा हीच सत चिद् आनंदरूपाची आराधना होय हे सांगितले गेले आहे.

साहित्य म्हणजे मानवी मन विश्वचैतन्याचा अविष्कार आहे. अनेकतेत एकता हे तत्वाचे रूप आहे. ही भूमिका पाश्चात्य कांट, हेगल, क्रोचे, कॉलिंगवुड इत्यादीनी घेतली आहे. या सर्व विचारांवर उभा असलेला प्रयोजन विचार खऱ्या गहनात साहित्याला शिरू देत नाही. परमेश्वर हे परमसत्य नाही. माणूस हेच परम आणि अंतिम सत्य आहे. आणि अंतिम सत्वही आहे. त्याच्या आणि त्याच्यासारख्याच माणसाच्या संबंधाचा गोतावळा; या सर्वाच्याच अर्थाच्या व अनर्थाच्या चित्रणातून जीवनाचे मर्म वाचकाच्या मनात प्रकाशमान करणे हयाहून साहित्याचे सुदंर प्रयोजन दुसरे असू शकत नाही. मॅक्झिम गोकी म्हणतो. त्या प्रमाणे I know of nothing finer, more Complex, more interesting, than man, He is everything. माणूस हेच जीवनाचे परमसत्य आहे. तेच जीवनाचे अंतिम सत्य आहे. तेव्हा परमेश्वर या परमसत्यात अडकलेला भारतीय प्रयोजनविचार तिथून खेचून आणून माणूस या परमसत्याशी जोडणे आवश्यक आहे. नीतीवादी प्लेटोने स्तोमात्रा आणि सज्जनप्रशस्ती करणाऱ्या वाङमयाचा पुरस्कार केला. कवी सत्यापासून दोनदा दूर जातात. म्हणून त्याने आदर्श राज्यातून कवीना हद्पार केले. चिद्‌रूप हे अंतिम सत्य होत. हे सांगणारा प्लेटो या सत्याला प्रयोजन मानीत होता. ॲरिस्टॉटलने उच्च ज्ञानरूप आनंद हे प्रयोजन सांगितले. काव्य हे सुंदर व उपयुक्त असावे (Dulce and utile) असावे असे होरेस म्हणतो. तेव्हा सौंदर्य आणि उपयुक्तता याची सांगड तो घालतो असे म्हणता येईल.

पाश्चात्य साहित्यविश्वात प्लेटो- ॲरिस्टॉटलप्रमाणे टॉलस्टॉलने आदर्श मानवी भावनांचा साहित्याचे प्रयोजन म्हणून पुरस्कार केला. प्रयोजन म्हणून P. B. Shelly ने नीतीचा पुरस्कार केला. तर वर्डस्वर्थ आणि डॉ जॉन्सन यांनी ज्ञानाला प्रयोजनरूपात पाहिले .आणि जीवनावर भाष्य करणे हे साहित्याचे प्रयोजन होय. असे मॅथ्यु अर्नोल्ड ने सांगितले.विश्वतैतन्याचा आविष्कार करुन वाचकाला निरपेक्ष आंनद देणे हे साहित्याचे प्रयोजन होय. असे कांटने म्हटले आहे तर कलेसाठी कला असा प्रचार करणारे गॉतिए डॉ.ब्रॅडली, वाल्टर पेटर, क्लाइव्ह बेल, राजर फ्राच इत्यादी मीसांसकांनी विशुध्द आंनदाला प्रयोजन म्हणून पुरस्कार केला आहे.

आय.ए.रिचर्डसची भूमिका नीतिवादी आहे. आणि ती अत्यंत महत्वाची आहे. जीवनमूल्यांपासून साहित्याला तोडणाऱ्या कलावाद्यांचा अथवा स्वायत्तवाद्यांना त्याने दिलेले स्पष्टीकरण फार महत्वाचे आहे. साहित्याने प्रेरणा जागृत होतात. पण त्याची प्रत्यक्ष कृती निर्माण होणार नाही अशी व्यवस्था लावली आहे. साहित्याद्वारे होणारे परिणाम दूरगामी असतात आणि ते महत्वाचे असतात नीतिपालनामूळे जीवन जगणे मूल्यवान होते. साहित्यामुळेही असेच होते. धर्म जिथे अपेशी ठरला तिचे साहित्य यशस्वी होईल. असे रिचर्डसने म्हटले आहे. रिचर्डसने सौंदर्यमूल्ये आणि जीवनमूल्ये ही अविभाज्य मानली आणि ज्ञान देणे हेच साहित्याचे प्रमोजन आहे. असे ठासून सांगितले आहे. पलायनवाद, वासनापूर्ती, इच्छापूर्ती मनोरंजन, कलेसाठी कला, आत्माविष्कार, जिज्ञासापूर्ती उदबोधन, सामाजिक बांधिलकी इत्यादी प्रयोजने पाश्चात्य साहित्य शास्त्रकारांनी सांगितले आहेत. त्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे :-

## आत्माविष्कार -

पाश्चात्य साहित्यशास्त्रात सर्वात जास्त चर्चिले गेलेले प्रायोजन म्हणजे आत्माविष्कार. हे एक महत्वाचे प्रयोजन आहे. आत्माविष्कार म्हणजे स्वतःच्या भावनाचा, अनुभवांचा अथवा विचाराचा आविष्कार होय. आपल्या मनात ज्या भावना किंवा जे विचार येतात तेच विचार लेखक आपल्या साहित्यकृतीतुन प्रकट करत असतो. परंतु हा आत्माविष्कार करताना तो आता आपणांस आत्माविष्कार करावयाचा आहे या जाणीवेने लेखन करत नसुन ती एक सहज सुलभ प्रक्रिया आहे. आत्माविष्कारात प्रामुख्याने स्वतःच्या भाव-भावनांना महत्व असते. त्यामुळे आत्माविष्कारात्मक साहित्य आत्मनिष्ठ ठरण्याचा संभव असतो.

## आत्माविष्काराचे युग -

पाश्चात्य साहित्यात औधोगिक कृती व फ्रेच राज्यक्रांतीनंतर व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्व वाढू लागले व साहित्यात मानवी जीवनानुभवांना महत्व आले. याच प्रभावाने या कालखंड़ात आत्मविष्कारात्मक साहित्य निर्माण होऊ लागले. मराठीतील स्वच्छंदवादी साहित्यलेखनामागे आत्माविष्कार हेच प्रमुख प्रयोजन दिसून येते.

## लेखकाच्या अंगाने विचार (लेखकनिष्ट प्रयोजन) -

साहित्यिक हा माणुस असतो. साहित्यकृती ही व्यक्ती मनाने निर्माण केलेली आशय संघटना असते या संघटनेवर लेखकाच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक मुद्रा उमटलेल्या असतात. दर्शनी स्वरुपात आत्माविष्कार हे प्रयोजन लेखकनिष्ठ प्रयोजन आहे. साहित्यकृतीत लेखक आपले जीवनानुभव व्यक्त करत असते. हे अनुभव त्या विशिष्ठ लेखकाच्या व्यक्ती मनाचे असतात.यातील त्याच्या व्यक्ती मनाचे अनुभव हा जो पूर्वार्ध त्याच्याशी आत्माविस्काराच्या संकल्पना मांडली गेली आहे. लेखक आपल्या भावना , आपले विचार व्यक्त करत असताना ते आपल्याच स्वानुभवासह आविष्कृत करन असतो. त्यामुळे लेखकाच्या साहित्यातून लेखकाचे व्यक्तिमत्व प्रकट होते. उदा. आपल्या संतकवींची आत्मपर अभंगरचना, बालकवीची फुलराणी, गोविदाग्रजांची प्रेम आणि मरण कुसुमाग्रजांची आगगाडी आणि जमीन यासारख्या काव्यामधून या कलवंताने आपला आत्माविष्कारच साधला आहे.

आत्मविष्काराबाबत समीक्षकांची मते :-

१. **विल्यम वर्डस्वर्थ :-** याने साहित्याची व्याख्या करताना, आत्मविष्काराचेच प्रयोजन मांडले आहे. त्याच्यामते आपल्या मनातील भाव जेव्हा उचंबळून येतात तेव्हा त्याचा उत्कटतेने केलेला अविष्कार हा आत्माविष्कार असतो. म्हणजेच साहित्याची निर्मिती आत्माविष्कारातूनच होते.

२. **डॉ.ब्रॅडला :-** यांनी ‘कलेसाठी कला’ हा सिध्दांत मांडताना म्हटले की, कवी काव्यलेखन करतो ते त्याला जाणवलेल्या भावलेल्या सत्याच्या आविष्कारासाठी होय. हे

जाणवलेले व सांगण्यासारखे भावसत्य प्रकट करताना तो स्वतःलाही व्यक्त करतो. स्वतःच्या भावना विचारांची अभिव्यक्ती करतो. स्वतःचे व्यक्तिमत्व साररुपाने तो व्यक्त करतो म्हणजेच अप्रत्यपणे तो आत्माविष्कारच साधत असतो कवीव्यापारामागे या भाव सत्याच्या अभिव्यक्तीशिवाय दुसरा कोणताही हेतू नसतो व ते भाव सत्य प्रकट केल्याशिवाय त्याची अस्वस्थताही कमी होत नाही म्हणूनच आत्माविष्कार हे प्रयोजन महत्वाचे आहे.

३. **मॅथ्यू ऑर्नाल्ड :-** यांच्या मते साहित्याचा आत्माविष्कार दोन प्रकारांनी साधना जातो

अ. लेखक स्वतःच्या जावनाचे अर्थ Inter Pretation life शी लावण्याचा प्रयत्न साहित्याच्या लेखनातून करतो व आपल्या आविष्कार साधतो

ब. लेखक समग्र मानवी जीवनविषयक तत्वज्ञान Criticism of life सांगण्याच्या प्रेरणेतून साहित्य निर्मिती करतो. स्वतःच्या जीवनाविषयक व समग्र जीवनाविषयक कवीच्या काही भावना काही विचार असतात. व या दृष्टिकोणातून तो स्वतःच्या व समग्र मानवी जीवनाचा अर्थ साहित्यातू सांगत असतो. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हा त्याचा आत्मविष्कारच असतो.

## वाचकाच्या अंगाने विचार (वाचकनिष्ट प्रयोजन)

आत्माविष्कार हे वाचकनिष्ट प्रयोजन संबोधले जाते. संस्कृतमधील राजशेखर,मम्मट यांनी वाचकालाही प्रतिभावंत म्हटले आहे. वाचकही मुका कलांवत असतो त्याच्या ठिकाणी सुध्दा निर्मितीची ही सुप्त सृजनशीलता जागृत होते. आविष्कृत होते तिच्या आविष्काराला साहित्याच्या वाचनाने प्रेरणा मिळते व तो वाचक स्वतः कलेच्या वाचनाने आपल्या भावनांची अर्थ संगती लावतो यालाच त्याचा आत्माविष्कार म्हणता येईल. अशाप्रकारे आत्माविष्कार विचारधारेतीत सर्वात महत्वाचे लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ (रसिकगत) प्रयोजन आहे.

**जीवनभाष्य:-** पाश्चात्य प्रयोजनात जीवनभाष्य हे एक महत्वाचे प्रयोजन मानले जाते या काव्यप्रयोजनात लेखक आपले विचार केवळ कल्पनांच्या आधारे न मांडता जेव्हा प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असे लिखाण करतो, तेव्हा त्या लेखकाचा जीवनभाष्य हा हेतु असतो. चरित्र, आत्मचारित्रात्मक लेखन हे या स्वरुपातील लेखन या प्रयोजनाद्वारे सिध्द होते यात लेखकाचे विचार स्वतंत्रपणाचे प्रगट होत असतात.

विल्यम वर्डस्वर्थ यांनी कवीला देवाचा प्रेसित मानले आहे. प्रेसित म्हणजे दुत. त्याना देवाने पृथ्वीतलावर लोकांचे कल्याण करावयाला पाठविले आहे. विल्यम वर्डस्वर्थ हा निसर्गकवी आहे. तो निसर्गाला जीवनात महत्वाचे स्थान देतो.निसर्ग हा भव्यदिव्य नटलेला आहे. म्हणून तो म्हणतो मानव जो पर्यंत निसर्गच्या सानिध्यात होता तो पर्यंत तो सुखी

होता. जेव्हा तो निसर्गापासून अलग झाला. तेव्हा त्याला अनेक दु:खाना सामोरे जावे लागते आणि निसर्ग हा आदर्श गुरु आहे. म्हणून त्याने Back to the nature असा संदेश दिला आहे.

कवीला साहित्यातून फक्त घटना वर्णायच्या नसतात तर त्यातून जीवनाचे तत्वज्ञान सांगायचे असते. त्याला साहित्याच्या माध्यमातून आपली भूमिका कथन करावयाची असते

**उदा. हरी ज्याचा कैवारी पांडूसुताशी वंदितो भावे।**
**वाटे चरित्र त्याचे काही आपण तरावया गावे ।।**

यावरुन वैयक्तिक सुखासाठी, स्वतःच्या उद्धारासाठी काही तरी गावे अशी मोरोपंताची भूमिका आहे. संत तुकाराम व समर्थ रामदास यांच्या अनुभवसंपन्न व्यक्तिमत्वामूळे त्याच्या रचनेत अनेक जीवनभाष्ये आढळतात.

**उदा. १) नाही निर्मळ मन, काय करील साबण । तुकाराम**
**२) लेकुरे उदंड झाली तो ते लक्ष्मी निघोन गेली। रामदास**

**पलायनवाद इच्छापूर्ती स्वप्नरंजन :-**

पलायनवादाच्या संकल्पनेतून ईच्छापूर्ती, वासनापूर्ती, स्वप्नरंजन ही प्रयोजने सांगितली गेली आहेत. नैराश्यवादाचा सिध्दांत मांडणाऱ्या शॉपेन हॉवेर या समीक्षकाच्या विचारधारेत या प्रयोजनाचा उगम दिसून येतो. आपल्याकडे प्रा. ना. सी. फडके यांचा पुनप्रत्ययाचा आनंद या प्रयोजनाशी साम्य दर्शवतो.

मानवी जीवन दु:खमय असून हे मानवी दु:ख माणसाच्या वासनातृप्तीस, इच्छा पूर्तीसाठी केल्या जाणाऱ्या धडपडीतून उगवतात म्हणून या इच्छावर किंवा वासनांवर विजय संपादन करण्याचा किंवा त्या काल्पनिकरीत्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रयत्नातूनच कलेची निर्मिती होते असे या प्रयोजनाबाबत म्हटले जाते. कलासृष्टीत रममाण झाल्यावर काही कालावधीकरिता तरी दु:खाचा विसर पडतो. सुख पाहता जवापाडे दु:ख पर्वताएवढे या तुकाराम महाराजाच्या वचनाप्रमाणे नेहमीचे मानवी जीवन दु:खमय असून या दु:खाचा फेरा चुकविण्याचा मानव सतत प्रयत्न करतो. त्यासाठी तो पलायनवादाचा मार्ग शोधून साहित्याच्या आस्वादात क्षणभर का होईना तो आपले वैयक्तिक विश्व विसरुन जातो. व साहित्यविश्वामध्ये एकरुप होतो. एक अनुभूतीपूर्व आनंद देण्याचे कार्य साहित्य करते व व्यवहारी जीवनामध्ये ज्या इच्छा आपण प्रत्यक्ष उपभोगू शकत नाही. त्याची ही पूर्ती साहित्यातून होते म्हणून इच्छापूर्ती, स्वप्नरंजन हे साहित्याचे प्रयोजन आहे असे म्हटले जाते.

इच्छापूर्वी, स्वप्नरंजन या प्रयोजनाना मानसशास्त्राने मोठा आधार दिला आहे. जगप्रसिध्द मानसशास्त्रज्ञ सिगमंड फ्राईड त्यास 'दिवास्वप्न' (Day Dreaming) असे म्हणतो. साहित्याचा आस्वाद घेताना व साहित्याची निर्मिती करताना लेखक व वाचक हा दिवास्वप्न पाहत असतो. त्यामूळे हे प्रयोजन वाचकनिष्ठ व लेखकनिष्ठ प्रयोजन आहे असे म्हणता येईल. मात्र तरीही एका मर्यादे पर्यंत या प्रयोजनाचा विचार आपणास करता येईल. उदा. माधन ज्यूलियन यांच्या 'सुधारक' या काव्यातील त्यांनी निर्मिलेला नायक माधव ज्युलियन यांचे दिवास्वप्न पूर्ण करतो असे वाटते. ग्रामिण-दलित साहीत्यात कलिलेला समाजाद्धार हा सुद्धा प्रत्यक्ष व्यवहारात जीवनात पूर्ण करता आला नसला तरी साहित्याच्या निर्मितीतून ते आपली इच्छापूर्ण करुन घेतात मात्र सर्वच साहित्यलेखनामागे हेच प्रयोजन असते. असे म्हणता येत नाही कारण साहित्य हे जीवनापासून दूर जाण्यास सांगत नाही तर जीवनाचे आव्हान स्वीकारण्यास शिकविते. जीवनाशी लेखकाचा व वाचकांचा ती संबंध जोडते त्यामूळे श्रेष्ठ दर्जाचे साहित्य पलायनवादी भूमिकेतून निर्माण झालेले नसते. त्यामूळे त्या प्रयोजनास मान्यता देता येत नाही तरी ही ती दिल्यास साहित्य हे व्यावहारिक जीवनातील दु:ख मुक्तीचे एक साधन ठरेल त्यामूळे हे प्रयोजन मान्य करता येत नाही.

**जिज्ञासापूर्ती :-**

एफ.एल.ल्युक्स यांनी जिज्ञासापूती हे प्रयोजन सांगितले आहे. त्याने जिज्ञासापूर्ती यालाच कुतुहलपूर्ती असेही म्हटले आहे. जिज्ञासा किंवा कुतुहल ही माणसाला ठिकाणी असणारी प्रबळ अशी जन्मजात प्रेरणा आहे. सृष्टीतील प्रत्येक गोष्टीचे माणसाला कुतूहल वाटत असते. त्यानी त्यापायी कल्पनेच्या जोरावर सृष्टीचे रहस्य शोधण्याचा त्याच्यापरीने आजपर्यत प्रयत्न चालविला आहे. म्हणून अशा मानवी कुतूहलप्रेरणेला नवनवीन शोधण्याची जननी म्हटले आहे. याच जिज्ञासेने तो जीवनव्यवहारात रस घेतो. डॉ. स.रा. गाडगीळ म्हणतात. "जीवन असमाधान देणारे म्हणून ते बदलून त्याच्या जागी नवे विश्व निर्माण करण्याची प्रेरणा म्हणजे नवनिर्मिती होय. मानवी जीवनाची मर्यादा आणि मनाची अनाकलनीयता याबद्दलचे कुतुहल माणसाला वाटत असते असा कुतूहलापोटी साहित्याचे वाचन केले जाते" त्यामूळे हे प्रयोजन वाचकनिष्ट प्रयोजन मानले जाते.

जर्मन तत्वज्ञ शॉपेन हॉवेर असे म्हणतो की, माणसाच्या मर्यादित जीवनात त्याला सर्वच गोष्टीचे आकलन होऊ शकत नाही अशा अज्ञ राहणाऱ्या गोष्टीबद्दलची त्याची जिज्ञासा तशीच राहते. या जिज्ञासेची तृप्ती साहित्याद्वारे होत असते.

साहित्याच्या वाचनाने जिज्ञासापूर्वी होत असली तरी तो साहित्याचे एकमेव प्रयोजन नाही. फार तर तो साहित्याचा एक अनुषंगिक उपयोग वाटतो तसेच जिज्ञासा एक वैचारिक व ज्ञानात्मक जाणीव आहे. तिची एकदा तृप्ती झाली की, माणूस पून्हा त्या मार्गाकडे वळत नाही. त्यामूळे एकदा वाचलेले पुस्तक पुन्हा वाचले गेले नसते परंतु कोसला, रणांगण, नटसम्राट बनगरवाडी इ. सारख्या साहित्यकृती आपण पुन्हा पुन्हा वाचतो. म्हणून जिज्ञासापूर्ती हे साहित्याचे एकमेव प्रयोजन मानता येत नाही. मम्मटाने सांगितलेल्या व्यवहारज्ञान या प्रयोजनाशी हे प्रयोजन साम्य दाखविले.

**उद्बोधन :-**

उद्बोधन या शब्दातील मुख्य घटक बोध हा आहे. त्यामूळे प्रथम साहित्य व बोध याचा संबंध नजरेसमोर येतो. साहित्याने बोध करुन वाचकाला सन्मार्गाला लावावे म्हणून हे प्रयोजन सांगितले गेले आहे. साहित्याचा निर्माता बोध देण्यासाठी साहित्याची निर्मिती करते असे म्हणता येत नाही. तसेच साहित्याकडून ही बोधाची अपेक्षा केल्यास लेखकाची भूमिका धोक्यात येऊन तो उपदेशक बनेल म्हणून या प्रयोजनाला सर्वकष मान्यता दिली जात नाही. मात्र उद्बोधन या शब्दाचा अर्थ तसा खुप व्यापक दिली आहे. 'खोल समृध्द आणि व्यापक जागृती म्हणजे उद्बोधन होय.' असा अर्थ घेतल्यास लेखकाने वाचकाची जीवन जाणीव आपल्या जीवनानुभवातून विकसित करावी, त्यातून वाचकांचे उद्बोधन व्हावे असा अर्थ घेतल्यास उद्बोधन हे प्रयोजन मानता येते. लेखक आपल्या साहित्यातून विविधप्रकारच्या मनुष्य स्वभावाची चित्रे रंगवित असतो. प्रवृतीचीनानावृत्ती सृष्टी तो साहित्यद्वारे् निर्माण करतो. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा सर्वच संदर्भातील मानवी जीवन व्यवहाराची तपासणी तो साहित्याद्वारे करतो व अशा साहित्याचे वाचनाचे वाचकांचे आपोआप उद्बोधन होते. साहित्यकृतीतून त्याला जीवनासंबधीचे मान येऊ लागते. त्याच्या जाणीवेच्या कक्षा आपोआप रुंदावतात. विस्तार पावतात.

**सामाजिक बांधिलकी :-**

साहित्यात शब्दाच्या माध्यमातून जीवनातील विविध प्रकारचे अनुभव व्यक्त होतात. जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी वाचकाला साहित्याच्या वाचनाने लाभत असतो हे साहित्याचे सामर्थ्य होय. हे सामर्थ्य लक्ष्यात घेऊनच अनेक विचारवंतानी साहित्याच्या सामाजिकतेवर भर दिला आहे. कलावंताचे समतनिरपेक्ष व्यक्तित्व त्यांना मान्य नाही. कलावंत हा समाजाचा एक घटक असतो. ज्या समाजात तो राहतो त्या समाजातील घडामोडीनी त्याचे व्यक्तित्व घडविलेले असते त्या समाजाच्या अंतरंगातील संघर्ष चित्रित करणे हेच साहित्याचे मुख्य प्रयोजन आहे. असे हे विचारवंत मानतात त्यादृष्टीने सामाजिक बांधलकी हे लेखकगत प्रयोजन आहे.

कोणत्याही कालखंडातील विशिष्ट समाजातील पुरोगामी साहित्य त्या समाजाच्या प्रगतीची दिशा दाखवित असते प्रसिध्द साहित्यिक बर्नाड शॉ म्हणतो की, साहित्याकडून समाजाला कृतिप्रवण करण्याचे कार्य होण्याची शक्यता नसल्यास, आपण एकही शब्द लिहण्याचे श्रम घेतले नसते, (For The Arts shake alone I would not write a single sentonce) या वरुन बर्नाड शॉ च्या लेखनामागे सामाजिक बांधिलकी हे प्रयोजन सिध्द होते. लेखक ज्या समाजात वाढतो, ज्या समाजात घडतो, त्या समाजाशी बांधिलकीच्या नात्याने त्या समाजाच्या अंतरंगावर प्रकाश टाकून वाचकाच्या ठिकाणी नवी जाणीव विकसित करण्याचे महत्वाचे कार्य तो आपल्या साहित्याद्वारे करतो.

व्हाल्टेअर, रुसो याच्या साहित्याचे फ्रेंच राज्यक्रांतीची भूमिका तयार केली. टॉलस्टॉलच्या वाङःमयाने रशियन जनतेच्या अंतरंगाचे चित्रण करुन समाजिक, राजकीय

क्रांतीचा नैतिक पार्श्वभूमी उभारली. आपल्याकडील दलित, ग्रामीण लेखनामागे सामाजिक बांधिलली हेच प्रयोजन मोठ्या प्रमाणात दिसून येते.

प्रसिध्दी तत्वज्ञ सार्त्र याच्या मते, साहित्यातील वैचारिकता ज्ञानात्मकता आणि नैतिकता या निकषामुळे मानवी जीवनावर प्रकाश टाकण्याचे सामर्थ्य साहित्याला प्राप्त होते. या निकषांमुळेच वाङःमय जीवनाला मर्मदृष्टी देत असते.

साहित्य आणि समाज या बाबतीत मार्क्यवादी समीक्षा विचारानी अधिकमूलगामी मार्क्सवादी समीक्षा अधिकमूलगामी आणि सुक्ष्म विचार केला आहे. मात्र त्यांची साहित्याला साधन मानण्याची भूमिका सर्वमान्य होण्यासारखी नाही.

शुध्द कलावादी  आणि सौदर्यवादी साहित्य शास्त्राज्ञांना हे प्रयोजन मान्य नाही. या प्रयोजनामुळे कलाकृती हिणकस ठरु शकते असे त्यांना वाटते प्रभाकर पाध्ये याच्यामते कला निर्मितीच्या क्षणी कलावंताच्या बाह्य विश्वाशी असलेला संबंध पूर्णपणे तुटलेला असतो. सामाजिक बांधिलकीसारख्या जाणीवा लुप्त झालेल्या असतात. कलावादी दृष्टिकोनातून साहित्याची स्वायत्तता मान्य करुनही जीवन आणि साहित्य याचे अनिर्वाय अंतरी संबध नाकारता येत नाही. त्यामूळेच सामाजिक बांधिलकी हे साहित्याचे एक महत्वाचे प्रयोजन आहे. असे म्हणता येत नाही. लेखकदृष्ट्या हे प्रयोजन महत्वाचे ठरत असले तरी वाचकदृष्ट्या विचार केल्यास हे प्रयोजन फारसे संभवत नाही.

सारांश, पाश्चात्य व आधुनिक समीक्षकांनी सांगितलेल्या या प्रयोजनाचा विचार करता ही सर्व प्रयोजने लौकिकतावादी व अलौकिकतावादी या दोन विचारधारातून सांगितली गेली आहेत. त्यातील आत्माविष्कार, उद्बोधन, सामाजिक बांधिलकी ही लौकिकतावादी विचारधारेशी संबंधित समजली जाणारी प्रयोजने आहेत, तर पलायनवाद, इच्छापूर्तीवाद, स्वप्नरंजन जिज्ञासापूर्ती ही अलौकिकतावादी विचारधारातून सांगितली गेलेले प्रयोजने आहेत तसेच या प्रयोजन विचारामागे  विरंगुळावादी व ज्ञानवादी भूमिकाही दिसून येतात.

**समारोप :-**

साहित्य ही सौंदर्यवस्तू आहे. ती मानवी जीवनातील एक मौलिक बाब आहे. मानवी जीवनाच्या वाटचालीत साहित्याचे महत्वाचे भूमिका बजावली आहे. साहित्य हा जीवनातला मौलिक प्रकाशग्रह आहे. मानवी मनाला घडविताना त्याने आदेश दिले नाहीत वट हुकुम काढले नाहीत. मात्र आईच्या ममतेने त्याने मनामनाच्या गोळ्यांना सुंदर आकार प्रदान केले साहित्य ही कला आहे. जीवनविषयक वेगवेगळे दृष्टिकोन आहेत त्यामूळे प्रयोजना संबंधी मतभिन्नता आहे. मम्मटाने यश, अर्थप्राप्ती, व्यवहारविज्ञान, अशुभनिवारण, तात्काळ होणारा उच्च आंनद आणि पत्नी ज्या रोचक पध्दतीने उपदेश करते तसा उपदेश अशी सहा प्रयोजने सांगितली आहेत. भामहाच्या मताने चांगल्या काव्यरचनेने धर्म अर्थ काम मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ लाभून चौसष्ट कलांमध्ये प्रगती

होऊन प्रीती म्हणजे आंनद व कीर्ती म्हणजे यश याची प्राप्ती होते. वामनाने या पैकी प्रीती व कीर्ती ही दोनच प्रयोजने ग्राह्य मानली आहेत. तर रुद्रटाने चर्तुवर्गावरच भर दिला आहे. भरतमूनीने समर्थ असूनही दुःखार्त असणारे, व असमर्थ असेल तर साहजिकच अधिक दुःखार्त जे लोक असतात अशांना काही विश्रांती मिळावी हे प्रयोजन सांगितले आहे.

प्राचीन काळापासून वाडःमय हे ज्ञान आहे. असा ही दृष्टिकोन अनेक विचारवंतांनी स्वीकारलेला दिसून येतो भरतमूनी आपल्या नाट्यशास्त्रात नाटकाला पंचमवेद असे म्हटले आहे. सुप्रसिध्द संस्कृत साहित्य शास्त्रात राजशेखर याने 'काव्यमीमांसा' या ग्रंथात वेदविद्या, तर्कशास्त्र, वाणिज्य-अर्थशास्त्र व धर्मशास्त्र यांच्याबरोबरच 'पंचमीसाहित्याविद्या' म्हणून साहित्याचा गौरव केला आहे. मम्मटाने आपल्या काव्यप्रकाशात वरील जी सहा प्रयोजने सांगितले आहेत. त्यात व्यवहाराचे ज्ञान होणे (व्यवहारविदे) व सद्वर्तनाचा उपदेश करणे (उपदेशयुजे) (रामादिवत प्रवातितव्यम न रावणादिवत्) यांचा आवर्जून उल्लेख केला आहे. विश्वनाथाने आपल्या 'साहित्य दर्पणात' काव्याच्या माध्यमातून अल्पबुध्दीच्या लोकांनाही गहन विषयाचे ज्ञान होते व तो चार पुरुषार्थ साधू शकतो. ज्ञान, बोध, उपदेश असे शब्द आधुनिक कालखंडात साहित्याच्या प्रयोजनाच्या संदर्भात वारंवार उच्चारले जातात.

पाश्चात्य साहित्याविचारामध्ये हाच दृष्टिकोन ठळक दिसून येतो. पाश्चात्य साहित्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटल याने आपल्या 'पोराटिक्स' या ग्रंथात असे सांगितले आहे. की वाडःमनातून जो आनंद मिळतो त्याचा संबंध ज्ञानप्राप्तीशी आहे व साहित्यातून जे ज्ञान मिळते त्याचा दर्जा इतिहासापेक्षा श्रेष्ट आहे. होरेसने आपल्या 'आर्स पोएटिका' या लोकप्रिय ग्रंथात आंनद देणे व उपदेश करणे (To Please & to Instruct) ही वाडःमयाची दोन प्रयोजने आहेत असे म्हटले आहे. पुढील काळात होऊन गेलेल्या सरफिलिप सिडनी, जॉन ड्रायडन, डॉ.जॉनसन या इंग्रज लेखकांनी होरेसचाच दृष्टिकोन थोड्याफार फरकाने मांडला आहे.

✞✞✞✞

## घटक ‘ इ ’

# ५

# साहित्याचा आस्वाद आणि परिणाम

**प्रस्तावना :**

भारतीय साहित्यशास्त्रामध्ये ज्या विचाराचे अत्यंत सूक्ष्म आणि विस्तृत विवेचन झाले आहे. त्यामध्ये रससिद्धांत हा सर्वात महत्त्वाचा सिद्धांत होय. रससिद्धांत प्रथम भरतमुनींनी आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथात मांडला. त्यांनाही काही पूर्वपरंपरा होतीच. पण आजच्या उपलब्ध वाङ्मयात नाट्यशास्त्र हाच एतद्विषयक पहिला ग्रंथ होय. भरतांने जे नाट्य वाङ्मय उपलब्ध होते. त्यावरून त्यांनी आपला रससिद्धांत तयार केला असावा हे स्पष्ट आहे. त्यानंतरच्या काळात श्रव्य काव्याची वाढ झाली आणि त्यामुळे नाट्यशास्त्रातील हा रससिद्धांत काव्याच्या बाबतीतही लावून दाखविण्याचे प्रयत्न सुरू झाले.

‘रस‘ हा काव्याचा आत्मा आहे, असे जेव्हा म्हटले जाते. रस हा धातू रूची घेणे, आस्वाद घेणे या अर्थाचा असून रस म्हणजे आस्वादसुख असा त्याचा मूळ अर्थ आहे. ‘‘विभावानुभाव व्यभिचारिसंयोगात रसनिष्पतिः” हे भरताचे प्रसिद्ध रससुत्र आहे. विभाव, अनुभाव आणि व्यभिचारिभाव यांच्या संयोगाने रसनिष्पत्ती होते. असा या सूत्राचा अर्थ आहे. भरताच्या रससुत्राची मिमांस भट्टलोल्लट, श्रीशंकुक, भट्टनायक, अभिनवगुप्ता या टिकाकारांनी केली आहे. भट्टलोल्लट ‘उपचित स्थायी म्हणजे रस‘ हा सिद्धांत मांडला. लोल्लट हा मीमांसावादी होता. भट्ट भट्टलोल्लटने आपल्या रससिद्धांत मीमांसकांच्या अख्यातिवादावर आधारला आहे. मीमांसकांच्या मते विश्वसत्यच आहे; इंद्रियादी प्रमाणांच्या साहाय्याने होणारे ज्ञान सत्यज्ञान आहे. मृगजळासारख्या भ्रमज्ञानाच्या ठिकाणी वास्तविक दोन भिन्न सत्यज्ञानेच असतात. चकाकणाऱ्या शिंपल्यावर आपणाला रूप्याचा भास होतो. अथवा दोरीवर सर्पाचा भास होतो. येथेही दोन भिन्न ज्ञाने आहेत. या दोन भिन्न वस्तूतील सादृश्याने आपली दृष्टी बाधित होते.

शंकुकाच्या मते ‘रस निष्पत्ती म्हणजे रसाची अनुमिती‘ कवीने वर्णिलेले विभाव, नटाने अभ्यासिलेले अनुभाव व अभिनयाच्याद्वारे दाखविलेले व्यभिचारिभाव यांच्यावरून गम्य-गमक भावाने स्थायीभावाची अनुमिती होते. लोल्लट आणि शंकुक या दोघांच्या मते रस हा मुख्यतः पात्रगत व गौणवृत्तीने नटगत मानलेला आहे. रासिकाचा त्यात संबंधही येत नाही. भट्टनायक हा साख्यमतानुयायी होता. त्यांच्यामते जगत् हे त्रिगुणात्मक आहे. सुख, दुःख हे भाव त्रिभुणात्मक वस्तुमात्रातील सत्व, रज या गुणाच्या कमी-अधिक पणावर अवलंबुन असतात. काव्य नाटकांतील वर्णनानी अगर देखाव्यांनी वाचक प्रेक्षकांच्या

अंतःकरणातील सत्त्वगुणांचा उद्रेक होतो. म्हणून त्यांना आनंद होतो. भट्ट नायकाने प्रथमच रसनिष्पत्तीचा रसिकांच्या अंतःकरणाशी संबंध जोडला. भरतांच्या रससुत्रातील 'निष्पत्ती' म्हणजे उत्पत्ति उपचय-परिपोष अथवा अनुमिति ही मते भट्ट नायकानेच त्याज्य ठरविली. त्यासाठी त्याने भावकत्व आणि भोगीकरण हे दोन स्वतंत्र व्यापार मानले. थ्याचे भावकत्त्व म्हणजेच साधारणीकरण अभिनवगुप्ताने मान्यच केले; परंतु यासाठी भावकत्व नावाचा स्वतंत्र व्यापार मानण्याचे कारणनाही असे त्याचे म्हणणे होते. व्यंजना व्यापारानेच भावांच साधारणीकरण होते हे आनंदवर्धनाचे मत त्याने स्वीकारले. भट्टनायकाची भोगीकरणाची प्रक्रिया ही त्याने अनावश्यक ठरविली. रसिकाचा आस्वाद व्यंजना व्यापारातच अनुस्यूत आहे हे त्याने दाखवून दिले.

**भट्ट लोल्लट :-** भट्ट लोल्लटाने मीमांसा दर्शनाच्या आधाराने भरताच्या सुत्रातील 'संयोग ' शब्दाचा अर्थ संबंध आणि 'निष्पत्ती ' शब्दांचा अर्थ उत्पत्ती असा केला आहे त्यांच्या मते विभावामुळे रसाची निष्पत्ती होते संचारी भावामुळे पुष्टी व अनुभाव यांची अभिव्यक्ती होते.

**१) रस हा विभावात उत्पाद्य - उत्पादक**

**२) रस संचारी भावात पौष्य - पोषक संबंध**

**३) रस अनुभावात गम्य - गम्यक संबंध असतात.**

मूळ प्रश्न असा की, मूळ भाव व नट यांच्यात कोणता संबंध असतो. नटांच्या कृत्रिम अभिनयाने रसिक किंवा प्रेक्षक प्रकारे प्रभावित होतात हे महत्त्वाचे आहे

लोल्लटाच्या मते, मूळ भाव किंवा स्थायीभाव हा राम, दुष्यंतादी काव्य नाट्यगत पात्रातच असतो. तथापि नट त्याचे अभिनय कौशल्याने अनुकरण करतो. प्रेक्षक आपल्या कल्पनेने नटावर मूळ पात्राचे भाव आरोपीत करून रसानुभूती प्राप्त करून घेत असतो. म्हणजे रसानुभूतीचे कारण प्रत्यक्ष वस्तुनूरूप नसून मिथ्यारूप विधान हे असते. प्रत्यक्षातील चोर व भिकारी पाहून भय व घृणा वाटते पण नाटकात मात्र प्रसन्नताच वाटते. उत्पत्तीवाद या ऐवजी या वादास आरोपवाद हे नाव अधिक  अर्थपुर्ण वाटते असे प्रा. ब. कृ. सोनार म्हणतात.

**आक्षेप :-** लोल्लटाच्या या निष्कर्षावर स्थूल दृष्टीने असा आक्षेप घेता येईल की, रामाचा अभिनय करणाऱ्या पायासमोर मूळ राम नसतो तेव्हा तो त्याचे अनुकरण कसे करतो.

१)तसेच कृत्रिम प्रदर्शन व मिथ्या आरोपामुळे रसिकास रसिकानुभूती कशी होवू शकेल. दोरावर जाणून-बुजून सापाचा आरोप करू पहाणाऱ्यास भय कसे वाटेल? या आरोपाचे निराकरण सहज होऊ शकेल. नटासमोर जरी मूळ पात्रे नसली तरी कल्पनाशक्तीने तो त्यांचे तंतोतत अनुकरण कसे करतो.

२) कृत्रिम आक्षेपाने प्रेक्षकांस रसानुभूती होऊ शकत नाही. हा आरोप सुद्धा टिकत नाही. टी.व्ही वरील लोकप्रिय रामायण मालिकेतील अरुण गोविल (राम), दिपिका (सीता), अरविंद त्रिवेदी (रावण), यांना प्रेक्षक व्यक्तीरुपाने चांगले ओळखतात. तरीही यांच्या ठायी आपणास राम, सीता, रावण यांची रसानुभूती होत असते. कारण थोड्या वेळासाठी आपण प्रेक्षक या नात्यांने ते रुपविधान स्वीकारीत असतो. काव्यगत रसानुभूती वास्तवाने न होता कल्पित रुप विधानानेच होत असते. प्रत्यक्ष अनुभूतीत मनोविकार होत असतात रसानुभूती नाही.

भट्ट लोल्लटाच्या मतावर नंतरच्या काळात बरीच प्रतिकुल टीका झाली तरी त्याचे महत्व मान्य करावे लागते.

३) रसोत्पत्तीच्या चर्चेचा प्रारंभ करण्याचे श्रेय त्याच्याकडे जाते रसानुभूतीच्या सामुग्रीत विभाव, अनुभाव, व्याभिचारीभाव यांचे महत्व व स्थान सर्वप्रथम त्यानेच स्पष्ट केले. रसप्रक्रियेतील उत्पत्तीदृष्टी व अभिव्यक्ती या संकल्पना स्पष्ट केल्या.

४) मूळपात्राची अनुभूती, नटाची अनुभूती व प्रेक्षकांची अनुभूती यांच्यातील परस्पर भेद प्रथमतः त्याने स्पष्ट केले. त्याने म्हटले आहे की विभावांनी स्थायी उत्पन्न होतो, अनुभावांनी तो स्थायी प्रतित होतो (अनुभावास येतो) आणि व्यभिचारांनी तो परिपुष्ट होतो.

लोल्लटाच्या मते रसानित्पत्ती नाट्यातील पात्र्यांचा म्हणजे सिंधू, कांचन, दुश्यंत-शकुंतला या सारखी नाट्यातील नावे असलेल्या क्रोध, शोक इ. स्थायीभाव स्पष्टपणे व सुचकतेने रंगभुमीवर दिसून आला, म्हणजे तो रस पदवी पोहोचतो येथे रसांचा व रसिकांचा संबंध येत नाही. त्यामूळे लोल्लटाचे रसनिष्पत्ती विषयीचे मत प्रेक्षकांचा विचार करीत नाही. हा रस व्यक्तिनिष्ट असतो. प्रेक्षक कोणत्या प्रकारे रसाचा स्वाद घेतात यांचे विवेचन लोल्लट करत नाही, रस ही पात्रनिष्ट असतो ही लोल्लटची कल्पना वस्तुतः अपूर्ण आहे. कारण सिंधूत येणारा अनुभव तिची भूमिका करणाऱ्या नटीला कसा येईल? हा प्रश्न आहे, हा दोष उत्पत्तीत राहून जातो. पण श्रीशकुंक याने या दोषाचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

## अभिनव गुप्ताचा अभिव्यक्तीवाद-:

अभिनव गुप्त हा शैव संप्रदायी मिमांसक रस सिद्धांताचा सर्वश्रेष्ठ समीक्षक होता. भरताच्या ग्रंथावरील 'अभिनव भारती' ही टीका त्याने लिहिली आहे. भट्ट व श्रीशुकुक यांनी प्रामुख्याने नाट्यप्रयोगाला अनुलक्षुन रसाची चर्चा केली आहे. तर रसनिष्पत्ती नाट्यप्रमाणेच इतर ही साहित्यात म्हणजे काव्यातही होते असा विचार भट्टनायकाने मांडला आाहे. भट्टनायकाची साधारणभावाची कल्पना भरताच्या मूळ नाट्यशास्त्राला अभिप्रेत आहे असे म्हणता येण्यासारखे नाही. पण भट्ट नायकाच्या या कल्पनेमुळे रसनिस्पत्ती पात्रगत (दुस्यंत-शकुंतला सिधू इ.) की नाट्यागत ( ती भुमिका करणाऱ्या नट-नटीच्या

ठिकाणी) हा विचार मागे पडून ती रसिक गत (रसिकाच्याठिकाणी) असते, या विचाराला महत्व प्राप्त झाले.

अभिनव गुप्तने तर, रसनिष्पत्ती या शब्दाचे स्पष्टीकरण करताना असे म्हटले आहे की, रसाची निष्पत्ती होत नसून रसनेची म्हणजे आस्वादाची निष्पत्ती होते. रसाचे अस्तिव या आस्वादावरच अवलंबून असते. त्यामूळे रसनिष्पत्ती असा शब्द प्रयोग लक्षणेने केला जातो. वस्तुतः रस ही जर उत्पन्न होणारी वस्तू असती तर विभावादींना रसाचे कारण म्हणावे लागले नसते तसे झाले असते तर विभावादीभाव नाहीसे झाले तरीही रस तसाच राहाण्याचा सभंव निर्माण झाला असता पण रस हा आस्वादाचा विषय असून आस्वाद घेतला जात आहे तोपर्यंतच टिकणारी वस्तू आहे.

अभिनव गुप्ताचा मते रसनिष्पत्तीला प्रत्यक्ष अनुभवाची आवश्यकता आहे आणि अनुभवजन्य ज्ञानावरच त्याने आपली रसनिष्पत्ती करताना मत व्यक्त केले आहे. लौकिक जीवनात आपण जे अनुभव घेतो त्याचेच प्रतिबिंब नाटकात असते.

**उदा.** नुकताच विवाह झालेली मुलगी सासरी जाताना, तिच्या मनाची होणारी दोलायमान अवस्था आपल्या अनुभवाचा भाग असतो. तेव्हा आपण असे दृश्य पाहून अनुभवाने त्या विशिष्ट मुलीच्या जागी सामान्यत्वाने प्रत्येक विवाह योग्य मुलीचे दृश्य कल्पनेने चितारीत असतो. ही साधारणीकरणाची क्रिया म्हणजे भावकशक्ती होय. मग ती वेगळी मानण्याचे कारणच उरत नाही. अशा वेळी ' नववधू प्रियामी बावरते' या कवितेत पतीच्या घरात प्रथमच प्रवेश करणाऱ्या सर्व सामान्य मुलीच्या चित्तवृत्तीचा अनुभव आपणास येत असतो. अशा प्रकारची एक प्रतिती नाट्य प्रसंग पाहताना एकाच वेळी सर्व प्रेक्षकांना येत असते. प्रेक्षकांचे मन हे रसाचे आधिष्ठान असते. हे येथे महत्वाचे आहे. साधारणीकरणाच्या संदर्भात अभिनव गुप्तने जे म्हटले आहे. त्याचा आशय असा की कथानकातील पात्रांशी विभावादीभाव निगडित असतात. त्याच प्रमाणे ते देश व काल यांनी मर्यादित असतात. कीचकाला पाहून भीमाचा क्रोध विराट नगरात (हे स्थल) द्वापारयुगात (हा काळ) उद्भवला होता, पण नाटक पाहताना हाच क्रोध पात्र, देश व काळ यांच्याशी संबंध राहत नाही. त्याचे साधारणीकरण होते. व्यक्ती, देश व काळ राहतनाही. त्याचे साधारणीकरण होते. व्यक्ती, देश व काळ त्याच्या संबधापासून भावयुक्त होतो. व तो सर्वसाधारण स्वरुपात प्रतित होतो. भावाचे हे साधारणीकरण म्हणजे भावकत्व व्यापार आणि त्या दवारे भावित होणारा रस म्हणजे त्या रसाची निष्पत्ती होय. पण ही रस प्रतिती अलौकिक आहे हे विसरुन चालणार नाही कारण विभावादी साम्रगीला रसिक हद्य संवादाची जोड मिळते तेव्हाच रसप्रतिती होते.

विभावादींनी अभिव्यक्त होणारा आणि साधरीकरणाच्या पातळीवर अनुभवाला येणारा स्थायीभाव प्रथम एका व्यक्तीचा (येथे सादरी निघालेल्या रंगभूमीचा शकुंतला या पात्राचा) असला तरी तो तेव्हा रसिकाला प्रत्ययाला येतो. तेव्हा रसिकाच्या चित्तांत मुळातच असलेला वासनारुपी स्थायीभाव मिळता जुळता संवादी असतो. त्यात रसिकाचा

आत्मानुप्रवेश होतो व तो तादात्य पावतो. त्यावेळी रसिक साधरीभूत पातळीवरुन आस्वाद घेतो. साहजिकच अशा वेळी रस  निर्माण होत नसून अभिव्यक्त होतो असे अभिनव गुप्ताचे मत आहे. रसिकाच्या मनात मुळातच वासना रुपाने असलेला हा स्थायीभाव साधारणीकरणाच्या क्रियेमुळे नव्याने निर्माण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तेव्हा रस निर्माण होत नसून तो आविष्कृत होतो किंवा अभिव्यक्त होतो हेच अभिनव गुप्ताला सांगायचे आहे.

भरताच्या नाट्यसुत्रात नाट्यप्रयोगाच्या दृष्टीने रसनिष्पत्तीचा विचार मांडलेला दिसतो तर अभिनव गुप्ताच्या रसनिष्पत्ती रसिकावर होणाऱ्या रसास्वादाच्या प्रक्रियेचा विचार अधिक महत्वाचा वाटतो.

साधारणीकरणामुळे नाट्यगत पात्रांची चित्तवृत्ती ही प्रेक्षकांची चित्तवृत्ती बनते. व त्यांचा सुप्त अवस्थेतील स्थायीभाव जागा होतो. यालाच रस प्रतिती असे म्हणतात. हा अलौकिक स्थायीभाव नसून विलक्षण स्थायीभाव म्हणजे जोपर्यत आस्वाद घेता येतो तोपर्यत तो टिकतो. त्याची चर्वणा (आस्वाद) संपली की तो नाहीसा होतो. अशा प्रकारे रसचर्वणारुप असल्यामूळे तो स्थायी भावाप्रमाणे चित्तात कायमचा वास करुन राहात नाही. त्यामुळे त्याला स्थायी म्हणून विलक्षण वेगळा असल्याचे अभिनव गुप्तने म्हटले आहे. म्हणूनच भरताने नाट्यसुत्रात स्थायींचा उल्लेख केला नाही. तिथे तो बोचला असताना रसास्वाद घेताना रसिकाला मनोविश्रांती मिळते. तोच रसास्वाद होय, यात रसना व्यापाराला म्हणजे आस्वादाला अभिनव गुप्तने 'महारस ' असे म्हटले आहे आणि आस्वाद घेताना मनाला जी विश्रांती मिळते तिला विश्राती कार्यणी प्रतिती असे अभिनव गुप्ताने नाव दिलेले आहे.

## सारांश

रस हा रसनिष्ट नाही पात्रातील नाही तर तो रसिकानिष्ट असतो रस म्हणजे रसास्वाद रस उत्पन्न होत नसून रसास्वादाची निष्पत्ती होत असते. आस्वाद घेताना जातो जो पर्यंत तो टिकतो तो पर्यंतच प्रेक्षक रसास्वाद घेतो. रसस्थायी नसतो तर स्थायी विलक्षण असतो.

## अभिनव गुप्ताने सांगितलेली रसविघ्नेः

अभिनव गुप्ताने रसनिष्पत्ती या गोष्टीचा अत्यंत सूक्ष्मतेने विचार केला आहे. रसिकाची अलौकिक पातळी सुटण्याचा आणि त्याला व्यक्तिसंबंद्ध रतिक्रोधादी भावांचा अनुभव येण्याचा धोका दिसत होता; यासाठीच त्याने रसविघ्नांचा विचार केला. हा रसविघ्नांचा विचार केला. ही रसविघ्ने सात प्रकारची आहेत. डॉ. स. रा. गाडगीळ यांनी 'काव्यशास्त्रप्रदीप' या ग्रंथातून या रसविघ्नांचे विवेचन केले आहे. ते पुढीलप्रमाणे आहे.

### १) संभावनाविरहः

रसिकाच्या ठिकाणी काव्यास्वाद घेण्याची पात्रता असली पाहिजे. ही पात्रता, कल्पना सामर्थ्यामुळे येते.  संभावनाविरह म्हणजे कल्पनाशक्तीचा अभाव, वर्ण्यविषयाशी

कल्पनेने तन्मय होण्याची शक्ती नसल्यास काव्यातीस सौंदर्य रसिकाच्या प्रत्ययाला येणेच शक्य नाही. काव्यसृष्टीला आधार जरी लौकिक जीवन हा असला तरी कवीने आपल्या प्रतिभाशक्तीने लौकिक, जीवनाला अपूर्व असे नवेच रूप दिलेले असते. हे नवनिर्मित रहस्य जाणून घेण्यासाठी रसिकाच्या ठिकाणी प्रभावी कल्पनाशक्ती हवी. कल्पनाशक्तीच्या साहाय्यानेच त्याला काव्यसृष्टीत प्रवेश करून घेता येणे शक्य आहे.

कवीच्या ठिकाणी कल्पनाशक्तीचा अभाव असल्यास त्याचे काव्य नीरस होईल. कल्पनाशक्तीच्या बलावरच कवी परचित्त प्रवेश करू शकतो. "A man to be gteatly good, must imagine intensely……The great instrument of moral good is the imagination" हे कवीचे उद्‌गार कल्पना शक्तीचे महत्त्व विशद करणारे आहेत. कल्पनाशक्तीचा अभाव संभावना विरह हा दोष कविगत अथवा रसिगत असा द्विविध स्वरूपाचा असू शकतो. रसनिर्मिती अथवा रसप्रतीती या दोनही प्रक्रियांमध्ये संभावनाविरह हे महत्त्वाचे विघ्न आहे.

### २) स्व-पर-गत-देशकाल विशेषावेशः

काव्याच्या आस्वाद घेत असताना रसिकाच्या ठिकाणी असलेले 'मी' पणनष्ट झाले पाहिजे. रसिकाच्या ठिकाणी 'हे माझे आहे', हे परक्याचे आहे, 'हे विशिष्ट देशातील आहे', 'हे विशिष्ट कालातील आहे.' असा जर स्व-पर-स्थल-काल याविषयीचा विशिष्ट भाव जागृत असेल तर त्याला रसास्वाद अशक्य आहे. आस्वादाच्या वेळी त्याचा हा विशिष्ट भाव लुप्त होऊन तो साधारण्याचा पातळीवर येणे आवश्यक आहे. असे न घडल्यास काव्य-नाटकातील सुखदायक भाग तेवढाच त्याला आस्वाद्य वाटेल. या आस्वादात शुद्ध काव्यनंद नसून त्याच्या चित्तवृत्ती स्व-पर-भावाने म्हणजेच संकुचित 'स्वार्थ'बुद्धीने शबलित झालेल्या असतील. काव्य-नाटकाने जर रसिकाच्या व्यक्तिगत भावना चाळविल्या जातील तर त्याला काव्यस्वाद अशक्य होईल. काही वाचक-प्रेक्षक काव्य-नाटकांतून वासनातृप्तीचा आनंद घेण्याचा प्रयत्न करतात. हा शुद्ध काव्यनंद नव्हे. ही मनाची विकृतीच मानावी लागेल.

स्व-परभावाप्रमाणेच स्थल-कालाचेही विशिष्टपण सुटले पाहिजे. शेक्सपिअरची नाटके विसाव्या शतकातील भारतीय रसिकांना आस्वाद्य व्हावयाची तर त्यांची स्थल-काल-विषयक भावना विश्वव्यापक बनली पाहिजे. विशिष्ट काळातील विशिष्ट पात्रांच्या माध्यमातून वर्णिलेले भाव त्या त्या पात्रांचे नसून सर्वसामान्य स्त्री-पुरुषांचे आहेत. हे जाणण्याचे सामर्थ्य रसिकाच्या ठिकाणी असले पाहिजे. आनंदवर्धनाने यालाच तत्त्वार्थदर्शिनी बुद्धी म्हटले आहे. सहृदय रसिक याच तत्त्वार्थदर्शिनीबुद्धीच्या साहाय्याने स्व-परभावाच्या अतीत होऊन साधारण्याच्या पातळीवरून काव्याचा आस्वाद घेऊ शकतो.

### ३) निजसुखादिविवशीभावः

रसिक जर स्वतःच्या सुखदुःखात मग्न असेल तर रसिकाला काव्यस्वाद निर्विघ्नपणे घेता येत नाही. यासाठी लेखक आपल्या-काव्यनाट्यात रसिकाची व्यक्तिगत

सुखदु:खे विसरली जावीत या दृष्टीने काही गोष्टींची योजना करीत असतो. गीत, नृत्य, चमत्कृतिपूर्ण नाट्यमय प्रसंग, भाषाशैली इ.च्या साहाय्याने वाचक-प्रेक्षकाला लौकिक सृष्टीतून अलौकिक सृष्टीत नेण्याचा कवीचा उद्देश या रसविघ्नाचे निवारण हाच असतो. रसिकानही स्वतःच्या व्यक्तिगत सुखदु:खातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केल्याशिवाय त्याला रसास्वाद अशक्य आहे.

**४) प्रतीति-उपाय-वैफल्यः**

विभाव, अनुभाव, अभिनय हे रसनिष्पत्तीचे उपाय होत. हे उपायच जर विकल, दुर्बल असतीलतर रस प्रतीति होऊ शकणार नाही. वर्ण्य विषयाची अंगोपांगे कवीने सूक्ष्मपणे वर्णावयास हवीत अथवा नटाने त्यांचा रेखीव अभिनय करावयास हवा, तरच रसिकाला काव्यार्थाचा साक्षात प्रत्यय येऊ शकेल. कवीचे वर्णनसामर्थ्य अगर नटाचे अभिनयसामर्थ्य या दृष्टीने विकल असणे हे मोठेच रसविघ्न होय.

**५) स्फुटत्वाभावः**

काव्यार्थ रसिकाच्या अंतःसृष्टीत प्रत्यक्षवत् प्रगट झाला पाहिजे. यासाठीच कवीने आपल्या काव्यार्थाला अथवा त्याच्या अभिनयाला लोकधर्मीचा आधार घेतला पाहिजे; तरच कवीचा भाव साक्षात प्रतीतीचा विषय हो्‌ू शकेल. उदा. ग्रामीण जीवनातील प्रसंग चित्रित करावयाचा असल्यास ग्रामीण जनतेच्या आशा-आकांक्षा-श्रद्धा-भावना योग्य वातावरणासह वर्णिल्या पाहिजेत. भाषा, आचरण, चालीरिती यांच्या वास्तव चित्रणाने त्या जीवनाचा रसिकाला स्फुट प्रत्यय येऊ शकेल. यालाच भरतांनी लोकधर्मी वृत्ति-प्रवृत्ती म्हटले आहे. कोणत्याही भावानुभवाचे साक्षात्करण यांच्याच आधारे होऊ शकते. काव्यार्थाचे प्रत्यक्षवत् चित्रण न होणे म्हणजेच स्फुटत्वाभाव हे विघ्न होय.

**६) संशययोगः**

विभावादींची योजना अशा औचित्यान करावयास हवी की, रसिकाला कोणत्याही प्रकार संदिग्धता वाटू नये. विविध भावनाचे प्रत्यक्षीकरण ज्या अनुभवांच्या अगर अभिनयाच्या माध्यमातून व्हावयाचे त्यांची योजना निश्चित स्वरूपात विशिष्ट स्थायी भावाचा अविष्कार करण्यास समर्थ असावी.

**७) अप्रधानताः**

काव्य-नाटकांतील प्रधान विषय सोडून गौण विषयाला अतिरिक्त महत्त्व दिल्यास अपेक्षित स्थायीभाव उत्कट होऊ शकत नाही आणि त्यामुळे त्याचा आस्वाद अशक्य होतो. लेखकाने अगर नटाने अपेक्षित परिणाम साधण्याच्या दृष्टीने काव्यार्थातील गौण-प्रधानभागाचे तारतम्य सांभाळले पाहिजे. मध्यवर्ती विषयावरच रसिकाचे मन खिळून राहील अशी काव्यनाटकाची रचना करावयास हवी.

अभिनव गुप्ताने सांगितलेल्या यारसविघ्नाचा परिहार झाला तरच रसिकाला आस्वाद शक्य होईल. यातील काही विघ्ने काव्यगत आहेत, काही नटगत आहेत, तरकाही रसिकगत आहेत. या सर्वाचा परिहार होऊन कवि-रसिक-हृदय संवाद साधला तरच चर्वाणाव्यापार निष्पन्न होऊ शकेल.

## रिचर्डसना समधाततेचा / प्रेरणा संतुलनाचा सिद्धांत

आय.ए. रिचर्डसना समधाततेचा सिद्‌धात -: मानसशास्त्राच्या आधाराने काव्यानंदाची उपपत्ती सांगण्याचा आजच्या युगातील सर्वात महत्वाचा प्रयत्न आय.ए. रिचर्डस या सुप्रसिद्ध मानसशास्त्राज्ञाने केला आहे. कलाकुसरीच्या आस्वादाने मानवी मनात जी समधात्त आवस्था निर्माण होते तिला तो कलानंद म्हणतो. काव्य वाचनाने अनुभवास येणाऱ्या भावनांमध्ये काही विशिष्ट व्यवस्था असते म्हणून त्या काळाचा आपणास आनंद होतो. भावनांच्या या अवस्थेस रिचर्डसना यांनी समधात्तता असे म्हटले आहे. अनेक विविध प्रेरणोंचा अंतविरोधाचा परिहार करुन त्यांचा समतोल साधल्याने ही समधात अवस्था निर्माण होते.

कन्‍‌एयुशिअसच्या तत्वज्ञानाप्रमाणे मानवी मनातील भावनांचा समतोल साधणे जागृत प्रेरणांचे परस्परांशी सहकार्य घडवून आणून जीवनानध्ये जागृत प्रेरणांचे परस्परांशी सहकार्य घडवून आणून जीवनामध्ये सुसंगती निर्माण करणे हेच मानवी जावनाचे ध्येय होय. रिचर्डसना कन्‍‌एयुशिअसची ही विचारधारा कलाव्यापाराला दाखवून दिली संवादी व्यक्ती दाखवण्यासाठी अधिकाअधिक प्रेरणांचे समाधान आवश्यक आहे. जे अनुभव प्रेरणांची सुसंगत संघटना निर्माण करुन प्रेरणांचा अंतविरोध नाहीसा करुन समतोल व्यक्तिमत्व निर्माण करतात. ते अनुभव मुल्यावान होत कलाकृतीपासून येणारा अनुभव या प्रकारच, असतो.

कलाकृतीच्या आस्वाद घेत असताना रसिकाच्या व्यक्तिमत्त्वात हा समतोल साधलेला असतो. सर्व प्रेरणांचा मुक्त संचार सुरु असूनही हा समतोल साधने रसिकाला कृतीविरहीत अनुभूती घडवून आणणे हे कलांचे उद्दिष्ट असते. हा समतोल साधण्यात अयशस्वी ठरलेल्या या खऱ्या कलाकृती तरी नव्हेत अथवा अयशस्वी कलाकृती होत. कलाकृतीच्या वाचनांने ज्या प्रेरणा जागृत होतात त्यां प्रारंभीच्या अवस्थेत हर्ष, भीती, खेद क्रोध यांसारख्या भावनांशी संवादीत असतात. याद्‌वारेच कलावंताचा व्क्तीशी एकरुप होण्याचा प्रयत्न चालू असतो. याप्रक्रियेत वरील भावणाचे सादरीकरण होत असते त्यावेळी वरील प्रेरणांची व्यवस्थीत संघटना होत असते.

प्रेरणांमध्ये असलेल्या मुळाच्या संघर्षाचा परीहार होवून सर्वच प्रेरणा अनिरुदधपणे संचार करीत असतानाही समधात राहतात हाच सौंदर्यानुभव होय. सर्वच प्रेरणाचा एकत्रीत अनूभव घेण्याची ही प्रक्रिया आहे. या अनुभवाने काही विशिष्ट प्रेरणा उत्तेजित होत नसून सर्वच प्रेरणा मुक्त होत असूनही समधात राहतात. कृतिप्रवण होण्याइतकी प्रेरणाची जागृती झाली असूनही कोणत्याही दिशेने आपण कृतिप्रवण होत नाही. व्यवहारामध्ये म्हणजेच लौकिक जीवनात विशिष्ट कृती करण्याकडे जो कल असतो तो कलास्वादात विसरला जातो. विविध प्रेरणांच्या मुक्त संचारापासून जे समाधान मिळते त्यालाच काव्यानंद म्हणतात.

रिचर्डसच्या उपत्तीतून भावनांचे साधारीकरण रसिकाची स्वनिरपेक्षता कलात्मक अनुभूतीमधील कृती प्रेरेणेचा अभाव अनिश्चीत वृत्तीची समधाताता दिसून येते.

## ॲरिस्टॉटलचा कॅथार्सिसचा सिद्धांत : विशुद्धीकरण

करुण रसात्मक काव्य नाटकाचा प्रश्न भारतीयानी विचारात घेतला असला तरी टॅजेडी (शोकात्मिका किंवा भीषणनाच या प्रकाराचा विचार आपल्याकडे फारसा झालेला नाही. प्राचीन ग्रिकांच्या धार्मिक व सामाजिक जीवनात ट्रॅजेडीला खुप महत्व होते. ॲरिस्टॉलाने धार्मिक व संस्कारात्मक अगांचा विचार केला नाही. नाट्यप्रकाराच्या सामाजिक आणि नैतिक परिणामाचे) स्वरुप स्पष्ट करण्यासाठीच कॅथार्सिस हा सिध्दांत माडला. ॲरिस्टॉटलने कॅथार्सिस ही संकल्पना हिपोक्रॅटच्या वैद्‌यकीय ग्रंथातून घेतली.

वाचकांच्या मनात भय आणि अनुकंपा (दया) या भावना जागृत करुन त्यांना आरोग्यास अनुकुल अशा प्रकारची वाट करुन देण्याचे कार्य शोकांतिकेने होते, असे त्याचे मत होते. या परिणामाचे वर्णन त्याने तत्कालीन वैद्यक शास्त्रातील एक संकल्पना केवल कॅथर्सिस होय. कॅथर्सिस या शब्दाचा अर्थ विरेचन असा आहे व त्यातील मूळ धातूचा अर्थ स्वच्छ करणे निवडणे असा आहे. शरीरात काही दु:खद व शरीर क्रियेमध्ये व्यत्यय आणणारा असा एखादा पदार्थ असला तर तो काढून त्याची स्वाभाविक क्रिया व्यवस्थित करुन देणे म्हणजे कॅथर्सिस होय. ॲरिस्टॉटलने वैदयक शास्त्रातील एक संकल्पना व तिचा वाचकशब्द हा नाट्यासाठी वापरला आहे. ॲरिस्टॉटलने ट्रॅजेडीची व्याख्या देवून नाट्यप्रकाराची उपयुक्ता सांगितली आहे. "..... and by excite pity and fear it gives a healthy outlet to such emotions."

"प्रेक्षकांच्या अंत:करणामध्ये भीती आणि अनुकंपा (दया) या भावना जागृत करुन तुबंलेल्या भावनांचे विरेचना करणे म्हणजेच कॅथार्सिस होय." प्लेटोने ट्रॅजडीचा निषेध केला होता विकार आणि विवेक यांच्या संघर्षामध्ये विकारांचे दामन केल्याशिवाय आदर्श, सदगुणी जीवन जगता येणार नाही असे प्लेटोने मत होते. विकारांचे तांडव चित्रीत करुन मानवी जीवनाचे तारु भडकविणाऱ्या कवींना त्याने आपल्या आदर्श समाजात मज्जाव केला होता. ॲरिस्टॉटलला विकार दमणाचा हा मार्ग मान्य नव्हता. अतिरिक्त भावनांना वाट करुन देण्याचा ट्रॅजेडी हा निर्वेध मार्ग असल्याने सांगितले आहे. भावना प्रक्षोभक विचार करताना ॲरिस्टॉटलने कॅथर्सिस हा शब्द वापरला आणि त्याच ठिकाणी ट्रॅजेडीची प्रक्रियाही याच प्रकारची म्हणजे प्रक्षूब्ध भावनांचे विरेचन करण्याचीच असते, असे सूचित केले (विवेकप्रधान समतोल जीवन जगण्यासाठी भावनांचा अतिरेक जसा टाळला पाहिजे तसेच त्यांचे दमणही टाळले पाहिजे.) शोकनाट्यामुळे अतिरिक्त भावनांचा निचरा होतो आणि योग्य मर्यादेत या भावनांचा आस्वाद मिळून मन शांत व आंनदी होते.

अनुकंपा आणि भिती या दोन्ही मानसिक वृत्ती अथवा भावना मनाला दु:ख देणाऱ्या अशाच भावना होत. त्यामूळे मन अस्वस्य होते. अशा भावनांना वाङ् मय वाचनाने कार्य करण्यास विषय मिळतो. त्या भावना यामध्ये खर्च होऊन जातात. या भावनांचा व्यय

करण्याचा सुरक्षीत व बिनत्रासाचा मार्ग म्हणजे वाङ् मय वाचन होय. भीती आणि अनुकंपा या भावना मनुष्यात उपजतच असतात. त्यांना मधून मधून असा पाट फोडून दिला म्हणजे मनाचे आरोग्य ठीक राहते. या भावनांना वाट मिळाली की मन हलके होते. यामध्ये जे काही समाधान असेल तोच करुणरसाचा परिणाम होय. यालाच ॲरिस्टॉटलने कॅथार्सिस म्हटले आहे.

साहित्यातील घटना अशा स्वरुपाच्या असाव्यात की, भीती बरोबरच अनुकंपा निर्माण व्हावी. पराकाष्टेच्या भयात अवस्थेत अन्य कोणतीही भावावस्थ उद्‌भवू शकत नाही. प्रेक्षकांच्या मनात अनुकंपा व भीती यांचा क्षोम निर्माण करु शकतील अशाच गंभीर स्वरुपाच्या म्हणजेच शांत व मनोधैर्यशील वृत्ती, युक्ती शोकनाट्यात असाव्यात असे ॲरिस्टॉटलच्या संकल्पनेतून ध्वनित होते.

**उदा.** शनिमहात्म्य व राजा हरिचंद्राची कथा, शनीने विक्रम राजाचा छळ केला तर विश्वमित्राने हरिचंद्राचा छळ केला. विक्रमराजा व हरीशचंद्र या दोघाच्यांही जीवनात घडलेल्या घटना गंभीर स्वरुपाच्या आहेत परंतु राजा हरिचंद्राची कथा नाट्यविषय झाली.

दोन भावनांचा क्षोभ एक प्रकारचा समतोल निर्माण करु शकतो. नुसत्याच कारुण्याच्या एकामागून एक घटना प्रेक्षकांनी चित्तवृत्ती समतोल राखू शकली. तरच नाट्यगत आशय अभिनयामार्फत होऊ शकेल. ॲरिस्टॉटलाच्या या सिदंधाताचा अर्थ अनेकांनी आपआपल्या कल्पनेप्रमाणे लावलेला आहे. वास्तव जीवनात काही माणसे अतिराक्त हळवी असतात. काहींच्या ठिकाणी दया भाव बेताचाच असतो. दया हा नैतिक गुण आहे. पण आतिदया माणसाला दुर्बल बनविते. ट्रॅजेडीचा वाङ्मय प्रकाराणे या दोन टोकानमधिल सुवर्ण मध्य साधला जातो, असे लेसिंगने म्हटले आहे.

मिल्टनने कॅथार्सिसचा विरेचनअर्थ पुढीलप्रमाणे केला आहे. प्रक्षुब्ध भावनांचा निचरा करण्यासाठी ट्रॅजेडीच्या द्‌वारा भीती आणि अनुकंपा या भावना कृत्रिमरीत्या निर्माण करवयाच्या आणि त्यांच्या साहय्याने मनाला निरोगी, शातंता प्राप्त करून घ्यायची. हाच ट्रॅजेडीचा हेतू होय. ल्युकसने कॅथॉर्सिस वरील महाभाष्ये मान्य केली नाहीत. ग्रीक ट्रॅजेडीचे धार्मिक नैतिक आणि सामाजिक दृष्टया उपयुक्त असे हे वैशिष्ट्य त्याला मान्य नाही. यासाठी ट्रॅजेडी लिहीली जाते किंवा रसिक प्रेक्षक आपल्या भावनाचा निचरा करण्यास नाटकाला जातो हे म्हणणे ल्युकसला वेगळे वाटले."**The Theatre is not a hospital**" असे त्याने म्हटले आहे.

ट्रॅजेडीमध्ये जीवनाच्या सत्यदर्शनाचा आनंद, म्हणजे ट्रॅजेडीचा आनंद. मनुष्याचे सामर्थ्य आणि दुर्बलता त्याची भव्यता व शुद्रत्व त्यांच्या प्रतिमेची विशालता आणि बुद्धिदारिद्रयता या परस्पर विरूद्ध विशेषांचे अत्यंत नेत्रदीपक चित्रण ट्रॅजेडीमध्ये असते.

बुचर या ॲरिस्टॉटलच्या प्रसिद्ध भाष्यकाराने कॅथर्सिसमधून कलात्मक परिणामाचे रहस्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कलेच्या संदर्भात येणारे भावानुभव हा

काल्पनिक स्वार्थनिरपेक्ष व विश्वात्मक असल्यामुळे शोकांतिका जन्य अनुकंपा व भीती-यातील दुःखाचा अंश नष्ट होतो. व्यावहारिक पातळीवरील भय, शोक आदी भावनांचे उन्नयन होऊन त्याचे शुद्ध भावनांत रूपांतर होते. प्रेक्षकांच्या अंतः करणाचे शुद्धीकरण होण्याऐवजी भय व अनुकंपा या भावनांतील व्यक्तीसंबंधतेचे विरेचन होऊन त्या भावनांचे कॅथर्सिस होते. म्हणजेच त्या शुध्द विश्वात्मक होतात. आणि म्हणूच आस्वाद्य बनतात. असा बुचरचा निष्कर्ष आहे.

ट्रॅजेडीने जागृत होणाऱ्या भीती आणि अनुकंपा या भावनांचे व्यक्तिगत स्वरुप नाहीसे होऊन त्यांना विश्वात्मकता येते, रिचर्डस या मानशास्त्रज्ञाने ट्रॅजेडीचा परिणाम अन्य कलाकृतीप्रमाणे समधात्ततेमध्ये राहतो. असे म्हटले आहे. भय, शोक आदी भावना प्रारंभी जागृत झाल्या तरी शेवटी त्याचे व्यवस्थीकरण झाल्याशिवाय कलात्मक परिणाम साधणार नाही. शोकनाट्यामधून आविष्कृत होणाऱ्या कलात्मक सौंदर्याचा आत्मा हा समधात चित्तवृत्तीमध्ये आहे. भावनांचा प्रक्षोम हे कोणत्याही कलाकृतीचे (धेय्य) असू शकत नाही. भिषण जीवनानुभवाचे साधारण्याच्या पातळीवर शुध्दीकरण होऊन त्याचा समतोल साधतो आणि याचक्षणी रसिकाला कलात्मक प्रत्यय येतो, हाच शोकानाट्याचा अंतिम परिणाम होय.

वरील प्रमाणे ॲरिस्टॉटलने मांडलेल्या कॅथार्सिस या सिदधांताबद्दल विचार झालेला आहे.

**एका वाक्यात उत्तरे.**

**१. ॲरिस्टॉटलने शोकात्म नाट्याची संकल्पना कोणत्या ग्रंथात मांडली?**

उत्तरः 'पोएटिक्स'

**२. शोकात्मनाट्य हा साहित्यप्रकार कोणत्या देशात उदयाला आला?**

उत्तरः ग्रीस

**३. ॲरिस्टॉटलने कॅथार्सिस ही संकल्पना कशातून घेतली?**

उत्तरः हिपोक्रॅटच्या वैद्यकीय ग्रंथातून घेतली

❖❖❖❖

## घटक ‘ फ ’

# ६

# समीक्षा

### समीक्षा म्हणजे काय?

**सम + ईक्ष = समीक्षा.** सम म्हणजे सारख्या प्रमाणात आणि ईश म्हणजे पाहणे. एखाद्या कलाकृतीची समीक्षा म्हणजे त्या कलाकृतीकडे सहानुभूतीने, तटस्थपणे, वात्सल्याने समतोलवृत्तीने पाहणे, सर्वांगीण दृष्टीने पाहणे.  समीक्षा या शब्दाला ‘टीका‘ असाही शब्द वापरला जातो. परंतु ‘टीका‘म्हणजे दोष दिग्दर्शन नव्हे तर गुण-दोषांची चर्चा करणे अभिप्रेत आहे. सारांश, समीक्षा म्हणजे भाष्य करणे, निर्णय देणे, परीक्षण करणे, मूल्यमापन करणे, न्याहाळणे, काळजीपूर्वक पाहणे, समग्रपणे पाहणे, पूर्णपणे पाहणे, योग्यप्रकारे पाहणे, चिकित्सा करणे असे म्हणता येते.

**समीक्षेच्या व्याख्या :**

१) **“विचार करण्याच्या शास्त्रीय पध्दतीला अनुसरुन काही निश्चित तत्वांच्या आधारे वाङ्मयाचे विवेकपूर्ण विश्लेषण करण्याची जी शक्ती तिला टीका म्हणतात.”**

**-डॉ. रा. शं. वाळिंबे**

२) **“ललित साहित्याचे आकलन, आस्वाद व मूल्यमापन करण्यासाठी गांभीयाने होणारा विचारव्यवहार म्हणजे समीक्षा.”**

**-प्रा. रा. ग. जाधव**

३) **“परिस्थिती कोणतीही असली तरी टीकावृत्ती ही उपजतच असते. व्यक्तिपरत्वे तिचा अविष्कार कमी अधिक प्रमाणात होतो हा भाग वेगळा. या अविष्काराला विशिष्ट घाट आला की तिला टीकासमीक्षा असे संबोधले जाते. ”**

**-प्रा. गो. म. कुलकर्णी**

४) **“टीका म्हणजे वाङ्मयासंबंधीचे वाङ्मय होय. ”**

**- श्री. के. श्रीरसागर**

५) "कवीच्या काव्याचे मूल्य वाचकास प्रतीत करुन देणे."

- मॅथ्यू अर्नोल्ड

६) "पूर्वग्रह न बाळगता केलेले सरग्रहण म्हणजे टीका होय."

- मॅथ्यू अर्नोल्ड

७) "तुलना करणे हाच टीकेचा अर्थ होय."

- रॉबर्टसन

८) "विवरण करणे व निर्णय देणे हे टीकेचे प्रयोजन आहे."

-ब्रुनेनियर

९) "समीक्षेमध्ये कलाकृतीचे रसग्रहण करणे व तिचे मूल्य ठरविणे. एकंदर कलाकृतीच्या इतिहासात तिचे स्थान ठरविणे."

- विंचेस्टर

१०) "भूतकालीन वाङ्मयाचे आकलन, मूल्यमापन, भाष्य वर्तमानकालीन संदर्भात करावे तर वर्तमानकालीन कलाकृतीचे आकलन, मूल्यमापन भूतकालीन वाङ्मय परंपरेच्या व्यवहारात करावे."

- टी.एस. इलियट

११) "वाङ्मयातील नवरुपांचा शोध आणि नवनिर्मितीतील व्यापाराचे आकलन म्हणजे समीक्षा होय."

- दि.के. बेडेकर

१२) "साहित्यकृतीचा अंतर्वेध घेणे आणि तिचा बाह्यसंदर्भ स्पष्ट करणे हे समीक्षेचे काम असते."

- वसंत दावतर

**१३) "सार्वत्रिक निकषांची आकांक्षा धरणारा व यथोचित शब्दातून होणारा साहित्यकृती विषयीचा रसिकाचा जो ज्ञानगर्भ व मूल्यगर्भ अभिप्राय/प्रतिसाद त्याला साहित्यसमीक्षा म्हणता येईल. "**

**- गंगाधर पाटील**

## समीक्षेचे स्वरुप

साहित्याची समीक्षा म्हणजे साहित्याचा आस्वाद व अभ्यास होय. साहित्याच्या आस्वादाची अभिव्यक्ती करण्याचे काम समीक्षा करते. साहित्याचा साहित्य म्हणून आस्वाद घेणे, आकलन करणे, मूल्यमापन करणे समीक्षेच्या क्षेत्रात येते. समीक्षक साहित्यकृतीचे वर्णन करतो, पृथ्थकरण करतो, तिला सरसनिरयतेची तुलना करतो. या सर्व गोष्टी करीत असताना काही विशिष्ट संकल्पनांचा वापर होत असतो. अशी साहित्यविषयक संकल्पनांची व विधानाची चिकित्सा व व्यूहरुप मांडणी साहित्यमीमांसा करीत असते.

समीक्षा म्हणजे साहित्याला दिलेला जाणता प्रतिसाद, या आजच्या लवचिक व समृध्द जाणिवेचा प्रारंभ भारतीय परंपरेतील टीका या शब्दात आहे. टिकेची प्रवृत्ती ही मानवी मनातील एक सहज व स्वाभाविक प्रवृत्ती आहे. दुसरी एखादी व्यक्ती दुसऱ्याची कृती साहित्यकृती वा लेखन यात आपल्याला नेहमीच काही चांगले व विशेषतः आपल्याला नेहमीच वाईट दिसत असते. म्हणून टीका म्हणजे 'दोषदर्शक विश्लेषण' असा रुढ अर्थ झाला आहे. पण वाङ्मयीन टिकेत एवढाच अर्थ अभिप्रेत नाही. मानवी मतप्रदर्शन व सौंदर्यस्थळांचा निर्देश या गोष्टी जुन्या टिकेतही आढळतात.

ऐतिहासिक दृष्टीने विचार केल्या टिकेची सुरुवात दोन प्रकारे झालेली दिसते. एक म्हणजे काही सामान्य वाङ्मयीन तत्वे प्रभावी करण्याकरिता केलेली वाङ्मयीन मीमांसा उदा. प्लेटो, ॲरिस्टॉटल किंवा भरत, आदनंवर्धन इत्यादींचे लेखन या स्वरुपाचे म्हणता येईल. भरताचे नाट्यशास्त्र किंवा Poetics ॲरिस्टॉटलचा या ग्रंथात साहित्याचा उपलब्ध प्रकार लक्षात घेऊन तेथे चर्चा केलेली आहे. काही वेळा साहित्याचा एखादा विशेष मुख्य ठरुन त्याचा उपयोग वाङ्मयात महानता निश्चित करण्याकरिता करावा असेही सुचवले जाई. उदा. भरताचे नाट्यसूत्र, अलंकार विचार, रीतीविचार, ध्वनी, औचित्य, वक्रोक्ति इ. वैशिष्ट्यांना केंद्रस्थानी मानून निर्माण होणारे वैचारिक संप्रदाय अशा प्रकारच्या तांत्रिक टिकेत एखाद्या व्यक्तीचा व ग्रंथाचा उल्लेख अधूनमधून करणे, त्याचे मापन करणे, त्यातील सौंदर्यस्थळांचा शोध घेणे त्याचे उद्दिष्ट नसते. कधी एखाद्या ग्रंथातील उतारेही आपल्या मताचे स्पष्टीकरण करण्यासाठी वापरले जात.

दुसऱ्या प्रकारची जुनी टीका म्हणजे भाष्य, मुख्यतः शब्दार्थ, वाक्यार्थ स्पष्ट करुन ग्रंथवाचन सोपे कसे करता येईल हे पाहिले जाई. या पध्दतीत शब्दांचा अर्थ त्या अर्थाला असलेले जुने आधार, इतर लेखकांनी तो शब्द वापरल्याचे पुरावे, कोश, व्याकरण इ. अवतरणे देऊन वाचकाला अर्थ नीट कसा समजेल एवढाच विचार केला जातो. या दृष्टिकोनात केवळ विद्वत्ता महत्वाची ठरते व ज्याला आपण रसग्रहण, मूल्यमापन समीक्षा वगैरे म्हणतो त्याला जवळजवळ स्थान नाही.

पहिल्यांदा टीका म्हणजे त्रुटी एवढेच अपेक्षित होते. हळूहळू ही प्रथा बदलून स्पष्टीकरणाचे महत्व कमी होऊन लेखकाच्या एकूण विचारावर लेखन पध्दतीवर त्याच्या व्यक्तिमत्वावर भाष्य करण्यास सुरुवात झाली. ड्रायडन, डॉ. जॉन्सन यांच्या लेखनाने या टिकेला वजन प्राप्त झाले पण खऱ्या अर्थाने आधुनिक सरग्रहणात्मक टीका रोमँटिक युगातच कोलरिज, हॅजलिट अशा लेखकामुळे रुढ झाली. या प्रकारच्या टिकेत टीकाकाराला स्वतःची मर्मज्ञता वापरुन मूळ लेखकाच्या सृष्टीत प्रवेश करुन त्याचे तत्वज्ञान, त्याचे व्यक्तिमत्व त्याचे भाषिक वैशिष्ट्य, त्याचा आत्मविष्कार इत्यादींचे काव्यमय वर्णन असते. उदा. व. दि. कुलकर्णी यांचे औदुंबर वरील भाष्य समीक्षेत व्यक्तिमत्वाला फार महत्व असते. समीक्षकाचे व्यक्तिमत्व, त्यांची वाङ्मयाबद्दलची संकल्पना, संवेदनक्षमता, सामाजिक-राजकीय मते, पूर्वग्रह, त्याच्या ज्ञानाचा आवाका त्याच्या व्यक्तिमत्वाचे विशेष व मर्यादा यांचे प्रतिबिंब त्याच्या समीक्षेत पडते. उदा. माधव आचवल (किमया, जास्वंद)

आधुनिक टीका म्हणजे विशिष्ट वाङ्मयकृतीच्या सौंदर्यासंबंधी, मर्मासंबंधी, मानसिक परिणामासंबंधी, सामाजिक परिणामासंबंधी सोपत्तीक विवेचन करणे होय, असे श्री.के. क्षीरसागर यांनी म्हटले आहे. पण आजच्या काळात समीक्षेचे स्वरुप यापेक्षाही अधिक व्यापक व लवचिक झाले आहे.

लेखक ज्या काळात जन्माला, वाढला, त्यावेळची सामाजिक, राजकीय परिस्थिती, त्या परिस्थितीचा त्याच्या लेखनावर झालेला परिणाम असतो. आधुनिक काळातील वैचारिक क्रांतीचा हा परिणाम आहे. वाङ्मयीन टीकेत सर्व प्रकाच्या पैलूंचा परामर्श घेतला पाहिजे. मात्र साहित्याच्या समाजाशी संबंध असतो. तो दृष्टीआढ करता येणार नाही. कोणत्याही समाजाबद्दल यथार्थ कल्पना त्याच्याशी संबंधित असलेल्या साहित्यावरुनच येते. साहित्य समीक्षेत तर्कनिष्ठता, वस्तुनिष्ठता यापेक्षा 'मी' च्या प्रतिक्रियेला महत्व असते. एखाद्या विषयासंबंधी 'मी' आपले चिंतन, अवलोकन मांडण्याचा प्रयत्न करतो.

समीक्षा ही काही प्रमाणात स्थल-काल प्रमाणित असते. स्वकालीन रुढ ज्ञान, संकेत- वाङ्मय कला विषयक संकेत यावर समीक्षा अवलंबून असते. या गोष्टीत बदल होत जातो पण कलाकृती ही आहे तशीच राहते. त्यामुळे प्रत्येक पिढीला आपले ज्ञान,

संकेत, संकल्पना, श्रध्दा, इत्यादीच्या परिभाषेत कलाकृती नव्याने समजून घ्यावी लागते. वाङ्मय ही कला शब्दबध्द व भाषारुप असल्याने ती स्वकाळाशी अनेक स्तरांनी बांधलेली असते. स्वकालाचा हा संबंध दृढ मानून तिची आस्वादकता व आकलनक्षमता विकसित होत असते.

टीका हा एक कधीही न संपणारा शोध असतो, असे वा.ल. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. तो शोधकाच्या विनम्र परंतु जिज्ञासा वृत्तीने घेतला जावा असे त्यांना वाटते. हा शोध वाङ्मयाच्या प्रकृतीच्या, प्रयोजनाच्या, प्रश्नांचा, रुपांचा व कृतीचा असतो.

साहित्यकृती ही असाधारण स्वयंविकसित अशी एक चैतन्यपूर्ण निर्मिती असते. अशा साहित्यकृतीचा शोध म्हणजे चैतन्याचा शोध असतो. उदा. ज्ञानेश्वरी.

समीक्षेचे क्षेत्र सतत विस्तारत जाते. एखाद्या साहित्यकृतीचा, लेखकाचा कालखंडातील साहित्याचा विचार केला जातो. लेखकाच्या कालखंडातील साहित्याचा विचार त्याच्या साहित्य विचाराचा स्थितीगतीचा विचार, साहित्यकृतीच्या अभ्यासातून जाणवणारे मूल्यांचे निर्देशन अशा अनेक प्रकाराने समीक्षा लिहिली जाते. अशा विस्तारशील व बदलणाऱ्या समीक्षेचे स्वरुप व्याख्येत सामावणे कठीण जाते.

समीक्षा हा एक अभिप्राय असतो. पण तो जाणता असला पाहिजे. हे जाणतेपण समीक्षकाचा व्यासंग, अभ्यास, परिश्रम, जीवनदृष्टी, आकलनक्षमता, संवेदनक्षमता प्रौढता, परिपक्वता, व्यापक व वैश्विक दृष्टी व खोली यावर अवलंबून असते. त्या अभिप्रायात ज्ञानात्मकता म्हणणे नवी माहिती व त्यातही मूल्ययुक्तता असावी लागते.

## **समीक्षाव्यापारातील विविध टप्पे** -

### १. **साहित्यकृतीचे वाचन** -

साहित्यकृतीचे वाचन केल्याशिवाय तिचे स्वरुप कळत नाही आणि स्वरुप कळल्याशिवाय तिची समीक्षा शक्य नाही. त्यामुळे समीक्षा व्यापारामागील सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे साहित्यकृतीचे वाचन होय. सुक्ष्म वाचन हा कोणत्याही साहित्यकृतीचा पाया असतो. साहित्यकृतीचे वाचन आस्वाद, आकलन, ज्ञान या तीन गोष्टींशी निगडीत आहे. साहित्यकृतीचे प्रत्यक्ष ज्ञान हे आपणाला तिचा वाचनातून जे काही स्वरुप विशेष जाणवतात. ते साहित्यकृतीच्या सात अंगाच्या माध्यमातून स्पष्ट होतात.

### 1. **भाषिक अंग** -

साहित्यकृती ही शब्दानी बनलेली असते. शब्दाचे ध्वनीरुप, अर्थरुप व वाक्यविन्यासात्मक रुप भाषिक अंगानी घडलेले असते.

### 2. **आध्यात्मिक किवां अर्थात्मक अंग -**

भाषिक अंगातूनच साहित्यकृतीचे आशयात्मक अंग उलगडते. हा आनंद सामाजिक मानसिक स्वरुपाचा असू शकतो.

### 3. **रुपबंधात्मक/संरचनात्मक -**

साहित्यकृती ही शब्दबंध वाक्यबंध, प्रतिमाबंध चरण कडवी, कथानक, पात्रे इत्यादी अनेकविंध घटकांनी मिळून एकात्मिक/संघटित झालेली असते. त्यामुळे तिला एकजिनसी संघटना किंवा सेंद्रीय समष्टी प्राप्त झालेली असते.

### 4. **कल्पकतापूर्ण अंग -**

साहित्यकृतीत घटना, कथानक, पात्रे प्रतिमा, आदी गोष्टीतून शब्दार्थजनित असे एक कल्पित विश्व निर्माण केले जाते. हे कल्पनाविश्व प्रत्यक्ष विश्वाची अनुकृती असते.

### 5. **प्रकारात्मक अंग -**

साहित्यकृतीचे वाचन करुत असताना आपण एक कविता, कथा, कादंबरी, नाटक म्हणून वाचत असतो. म्हणजे प्रत्यक्ष साहित्यकृती कथा, कादंबरी नाटक आदी कोणत्यातरी प्रकारात मोडत असते. प्रत्येक साहित्य प्रकाराचे विशिष्ट संकेतसंच असतात. हे वाचनातूनच स्पष्ट होते.

### 6. **सौंदर्यात्मक / कलात्मक अंग -**

प्रत्येक साहित्यकृती ही सौंदर्यपूर्ण कलाकृती मानली जाते. म्हणजेच साहित्यकृतीला सौंदर्यात्मक अंग असते.

### 7. **अस्तित्वात्मक/सत्ताशास्त्रीय अंग -**

साहित्यकृता ही एक विशेष प्रकारची संहिता असते. प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या भौतिक गोष्टींच्या सत्ताशास्त्रीय स्थानापेक्षा साहित्यकृतीचे सत्ताशास्त्रीय स्थान भिन्न स्वरुपाचे असते. या वाचनामुळे साहित्यकृती उमगते. इतकेच नव्हे तर पूर्ण ही होते. साहित्यकृती ही एक कलाकृती असते. वाचनात ती सौंदर्यकृती बनते. बोल्फगॅग आयझर म्हणतो की, साहित्यकृतीला दोन ध्रुव असतात. १) **कलात्मक ध्रुव** २) **सौंदर्यात्म ध्रुव.**

कलात्मक ध्रुव लेखकाने निर्मिलेल्या संहितेशी निगडीत असतो. तर सौंदर्यात्म ध्रुव वाचकाच्या त्या संहिताच्या अनुभवात नसतो. तर या दोघामध्ये कुठेतरी असतो.

वाचक, सुक्ष्म वाचन हा कोणत्याही समीक्षाकृतीचा पाया असतो. वाचनाच्या अनुभवातून त्या साहित्यकृतीच्या विश्लेषणाकडे, अर्थनिर्णयाकडे व मूल्यमापनाकडे वळता येते.

## २ **साहित्यकृतीचे विश्लेषण -**


साहित्यकृती ही अनेक घटकांनी बनलेली असते. ती सुनियोजित संघटित अशी कृती असते. या कृतीमधील विविध घटकांना वेगळे काढून त्याचे संघटित कृतीमधील स्थान आणि योगदान पाहणे हे विश्लेषणाचे एक कार्य असते. पृथ्थकरण करणाऱ्या क्रियेला विश्लेषण असे म्हणतात, अशी व्याख्या गंगाधर पाटील यांनी केलेली आहे.

कोणतेही साहित्यकृती ही अनेक घटकांनी बनलेली एक एकजिन्सी समष्टी असते ती शब्द, शब्दबंध, वाक्यबंध, प्रतिमाबंध, कडवी, आशयसूत्र, भावनाविचार, कथानक, पात्रे, निवेदक, निवेदनशैली इ. अनेक घटकांनी मिळून बनलेली असते. साहित्यकृतीच्या या एकजिन्सी समष्टीच्या अनेक घटकांमधील परस्पर संबंधाचे सौंदर्यदृष्टीने वर्णन करणे म्हणजे वाङ्मयीन संश्लेषण होय.

साहित्यकृतीच्या एकजिन्सी सेंद्रीय समष्टीचे विघटन व विश्लेषण केले तर तिचे सौंदर्य नष्ट होते आणि तिचा आस्वाद घेण्यात बाधा येते. असे प्रसिध्द सौंदर्यमीमांसक कोचे याचे मत आहे. म्हणून त्यांचा वाङमयीन विश्लेषणाला विरोध आहे. परंतु उत्तर संरचनावादी मीमांसकांनी हे मत खोडून काढले आहे. त्यांच्यामते, साहित्यकृतीचा कोणताही घटक या सेंद्रीय समष्टीचा एक अविभाज्य घटक समजून त्याचे व समष्टीचे परस्पर संबंध पाहिले जातात.

त्यामुळे विश्लेषणातून साहित्यकृतीचे सौंदर्य बाधीत होत नाहीत. प्लेटो आणि रुपवादां समीक्षकांनी वाङमयीन विश्लेषणावर भर दिला आहे.

साहित्यकृतीचा जाणवलेला समग्र अर्थ व सौंदर्य एकदम एका क्षणात सांगता येत नाही. म्हणून समष्टीचे घटक अलग करुन विश्लेषण करावे लागते. म्हणजेच साहित्यकृतीचे वाचन विशिष्ट कालावधीत वाक्य, परिच्छेद, प्रकरण अशा क्रमाने होत असते. वाचन व्यवहार हा विशिष्ट कालावधीत घडत असतो. साहित्यकृतीचे वाचन झाल्यावर त्या साहित्यकृतीचा अर्थाच्या प्रकाशात पुन्हा या घटकांचा अर्थ लावला जातो. अशाप्रकारे वाचनाचा प्रवास घटकाकडून समष्टीकडे आणि समष्टीकडून घटकाकडे होत असतो. यालाच घटकाचे अलगीकरण व सलगीकरण म्हणतात.



साहित्यकृती ही एक भाषिककृती असते. साहित्यकृतीमधील भाषा ज्या पध्दतीने कार्य करते त्या पध्दतीतून साहित्यकृतीत सौंदर्य निर्माण होते. भाषा प्रामुख्याने दोन प्रकारचे कार्य करते.

१) **संप्रेषण**

२) **सौंदर्यात्मक किंवा काव्यात्मक**

**उदा.** रोज पहाटे कोंबडा आरवतो. या वाक्यातून व्याकरणाच्या नियमानुसार वाच्यार्थाचा निर्देश होतो याउलट पुढील काव्यपंक्तीत

पुट पिवळ्या पहाटी
आरवतो दैनंदिन कोंबडा

या काव्यपंक्तीत आरवतो, भोंगा वाक्याचा वाच्यार्थाच्या पातळीवर अर्थबोध होत नाही म्हणजेच येथे संप्रेषणाचे कार्य होत नाही. आरवतो भोंगा यातून कोंबडा आरवतो हे खेडयातील घटीत डोळ्यासमोर येते. भोंग्याच्या आरवण्याने हा वाकप्रचार अपरिचित वाटतो. पण वाजणे व आरवणे यातील सामर्थ्यनिष्ट संबंध लक्षात येतो. शहरातील गिरणीकामगाराची पहाट भोंग्याच्या आवाजाने उगवते. त्यामुळे कोंबडा, भोंगा, आरवणे, वाजणे यातील उलटा-पालट केल्यामुळे तो शब्द कवितेत सौंदर्यात्मक कार्य करतात. अशाप्रकारे वाङ्मयीन विश्लेषणातून साहित्यकृतीतील सौंदर्याचा शोध घेता येतो.

विश्लेषण साहित्यकृतीच्या आस्वादानंतर तिच्या आकलनासाठी व ज्ञानासाठी अर्थनिर्णयासाठी व मूल्यमापनासाठी विश्लेषण आवश्यक असते. साहित्यकृतीच्या अध्ययनातील विश्लेषण ही एक अपरिहार्य कृती आहे. साहित्यकृतीच्या अध्ययनाच्या दोन पध्दती रेनेवे लेक आणि ऑस्टीन वॉरन यांनी सांगितल्या आहेत-

१. **बहिर्निष्ठ -**

साहित्यकृती आणि तिला असलेला सामाजिक संदर्भ तपासणे ही बर्हिनिष्ठ कृती होय. साहित्यकृतीची निर्मिती एखाद्या विशिष्ट काळात, स्थितीत झालेली असते. एखाद्या समाजाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक स्थितीच्या प्रभावातून साहित्यकृतीला आकार मिळतो. ही बर्हिनिष्ठ विश्लेषणाची अभ्यासपध्दती होय.

२. **अंगनिष्ठ -**

साहित्यकृतीच्या संदर्भापेक्षा प्रत्यक्ष साहित्यकृतीवर लक्ष्य केंद्रीत करतो. बाह्य साधनाऐवजी साहित्यकृतीतील अंतर्गत साधनाचा उपयोग करणे, ही अंगनिष्ठ अभ्यास पध्दती होय, साहित्यकृती ही एक चिन्ह व्यवस्था असते. अथवा चिन्हाची संरचना असते आणि या व्यवस्थेमागे सौंदर्य हेतू असतो. साहित्यकृतीचे आस्तित्वरुप निर्धारित करुन मग तिचे विश्लेषण केले जाते. प्रत्येक शब्दाचे, प्रत्येक वक्यबंधाचे मूल्ये ओळखून शब्द, वाक्य, प्रतिमा यातील परस्पर संबंध अंगनिष्ठ विश्लेषणपध्दती द्वारे शोधला जातो.

तात्पर्य, साहित्यकृतीच्या अध्यनातील विश्लेषण ही एक अपरिहार्य अशी कृती आहे.

३. **अर्थनिर्णय -**

समीक्षाव्यापारात जेथे वाचनप्रक्रिया अपूर्ण वाटू लागते. तेथे चिंतनाचा व्यापार सुरु होतो आणि चिंतानातून वाङ्मयीन विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन व शब्दांकन या टप्प्यांनी समीक्षेपर्यंत जाता येते. सलगीकरण प्रक्रियेतून आपण साहित्याच्याअर्थाला भिडतो एखादी साहित्यकृती विशिष्ट अर्थ प्रकट करण्याची क्षमता असलेली अनेकाची साहित्यकृती असते या अनेकार्थचा शोध घेण्याच्या प्रक्रियेला अर्थनिर्णयन असे म्हणतात. साहित्यातील अर्थाशी निगडीत असा प्रश्न मानवी जीवनाचा असतो किंबहुना साहित्यकृतीच्या अर्थाचा प्रश्न हा मानवाच्या एकंदर ज्ञानक्रियेशी निगडीत आहे. जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत माणूस प्रत्येक क्षणाला वेगवेगळे अनुभव घेत असतो हे अनुभव घेत असताना मानवाच्या जगण्याला अर्थ प्राप्त होत असतो.

मानवाने धर्म, कायदा, तत्वज्ञान, पुराणे, ललित, साहित्य आदी विषयावरील अनेक ग्रंथ संहिता निर्माण केलेल्या आहेत. यासंहिता निर्माण करताना मानवाला अर्थाच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. साहित्यिक, समीक्षक, वाचक या सर्वानाच संहितेच्या अर्थाचा विचार करावा लागतो. साहित्यकृतीच्या अर्थाचे स्वरूप सांगताना तीन प्रकारच्या प्रक्रिया होत असतात.

१) **ज्ञातृनिष्ठ**

साहित्यकृतीचा अर्थ हा वाचकाच्या मनस्थितीशी त्याचा इतिहास, परंपरादी ज्ञान प्रक्रियेशी बांधलेला असतो. त्याला ज्ञातृनिष्ठ भूमिका म्हणतात.

२) **वाच्यार्थ**

साहित्यकृतीचा अर्थ हा तिच्या स्थिर अशा संहितारूपी वस्तुस्थितीशी बांधलेला असतो. अशी वस्तुनिष्ठ भूमिका घेतली जाते.

३) **उभयचर अर्थ / संज्ञामीमांसक अर्थ**

साहित्यकृतीचा अर्थ हा केवळ साहित्यकृतीत बसत नाही. वाचकाच्या मनात किंवा संज्ञेतही नसतो तर तो साहित्यकृती व वाचक याच्यामधील सहसर्जन वाचनाक्रियेत म्हणजेच देव-घेवीत निर्माण होत असतो. अशी संज्ञावादी साहित्यिकांची मीमांसा आहे.

साहित्यकृतीच्या अर्थाचे, तिचे आशयसूत्राचे किंवा तिच्या अर्थपूर्णतेचे सौंदर्यदृष्टीने केलेले विवरण व स्पष्टीकरण म्हणजे वाङमयीन अर्थनिर्णयन होय.

कोणत्याही साहित्यकृतीचे वाचन करताना त्यातील वाक्याचा, प्रसंगाच्या अथवा पात्रांचा अर्थ सरळपणे कळत नाही. परंतु पुन्हा वाचन व चिंतन केल्यानंतर त्या साहित्यकृतीतील आशयसूत्र लक्षात घ्यावेसे वाटते म्हणजेच त्या साहित्यकृतीच्या सारांशाकडून आशयसूत्राकडे आपले चिंतन वळते आणि तथेच अर्थनिर्णयनाचे क्षेत्र सुरू होते.

अर्थनिर्णयनाच्या प्रक्रियेत वाचकाचे वाङमयीन ज्ञान, त्याची संवदेनशीलता कलाकता आणि बुद्धिमत्ता कार्यशील होतात. अशाप्रकारे साहित्यसमीक्षेत अर्थनिर्णयन आवश्यक ठरते. कारण साहित्यकृती ही एक अर्थवृत्त वस्तू असते. त्यामुळे तिचा अर्थबोध होणे आवश्यक असते. अर्थाच्या आकलनाशिवाय साहित्यकृतीचे सौंदर्यग्रहण व मूल्यमापन समीक्षकाला योग्यरीतीने करता येणार नाही. साहित्यकृतीचा अर्थ हा निश्चित स्वरूपाचा असतो. कित्येकदा अनेकार्थता त्यामध्ये दडलेली असते. ही अनेक अर्थता समजून घेण्यासाठी अर्थनिर्णयनाची नित्तांत गरज असते.

४) **मूल्यमापन**

समीक्षेच्या कृतीमधील महत्वाचे अंग म्हणजे मूल्यमापन होय. त्यासाठी साहित्यकृतीचे मूल्यांकन आवश्यक ठरते. विविधसाहित्यकृतीमधून काही साहित्यकृतीची निवड आपण करतो. तेव्हा त्या निवडीमागे मूल्यमापनाचे भान असते. आकलनात्मक मूल्यमापन जन्माला येते आणि योग्य आकलनातून साहित्यकृतीचे यथार्थ आकलन साहित्यकृतीच्या सुक्ष्म वाचनातून आणि विश्लेषण अर्थनिर्णयन यातून होत असते, मूल्य ही दोन प्रकारची असतात.

१) **साध्यात्मक मूल्य**

२) **साधनात्मक मूल्य**

साहित्यकृती ही कोणत्या कृतीनी बनलेली आहे आणि त्यातून काय साधले काय आहे ही मूल्यमापनाची पहिली पायरी असते. साहित्यकृतीत नैतिकता आणि सामाजिकता संकल्पना आशयाच्या अंगात समाविष्ट असल्यातरी त्या संघटनाचे मूल्यमापन केले जात नाही. त्यात विशिष्ट साहित्यकृतीत त्या संकल्पनांनी काय साधले आहे ? हे पाहिले जाते. मूल्यमापन या संदर्भात मूल्यमापनाचे दोन प्रकार पडतात.

१) **सौंदर्यमूल्येत्तर मूल्यमापन**

नैतिक, राजकीय, सामाजिक आदी दृष्टिकोनातून केलेले मूल्यमापन सौंदर्येत्तर बाबीवर आधारलेले असते

**उदा.** मार्क्सवादी मूल्यमापन, आभिजातवादी मूल्यमापन हे या वर्गात मोडते

२) **सौंदर्यमूल्यात्मक मूल्यमापन**

साहित्यकृती ही एक स्वतंत्र स्वयंपूर्ण व अनन्य साधारण असते. या दृष्टिकोनातून केलेले मूल्यमापन सौंदर्यमूल्यात्मक मूल्य होय.

**उदा.** रूपवादी मूल्यमापन हे या वर्गात मोडते.

साहित्यिकृतीच्या गुणवत्तेचे कोणत्यातरी निकषांवर विवेचन करणारा व्यापार म्हणजे साहित्यक मूल्यमापन होय. असे मूल्यमापन करताना वाचकाकडे अनेक प्रकारची सक्षमता असावी लागते. नॉर्थनिफ्रार्य यांच्यामते, समीक्षेत मूल्यमापन नसावे. कारण मूल्यवाचक विधाने ही पांडित्यपूर्ण व पोकळ - वर्तुळकार असतात तर रा. भा. पाटणकर. रेने वेलेक,याच्या मते- समीक्षेत मूल्यमापनाची गरज असते. कारण मूल्यवाचक विधानाशिवाय समीक्षा होत नाही.

तात्पर्य साहित्यकृतीच्या समीक्षेतील मूल्यमापन ही एक अपरिहार्य कृती आहे.

## समीक्षेचे कार्य.

१) **अभिरूची घडविणे -**

वाचक आणि लेखक यांना जोडणार महत्त्वाचा दुवा म्हणजे समीक्षक. कारण सामान्य वाचकांची अभिरुची ही वरवरची असते. कलाकृती हे एक गूढ असते. ते गूढसौंदर्य उकलून दाखविण्याचे कार्य समीक्षा करते वाचकाची अभिरूची ही बाह्य घटकावर त समीक्षकाची अंतर्गत घटकावर अवलंबून असते. समीक्षक काय वाचावे, काय वाचू नये, त्याचे मार्गदर्शन करते. वाचकाची अभिरूची घडवितो. अभिरूची घडविणे हे समीक्षेचे महत्त्वाचे कार्य आहे.

२) **श्रेष्ठ आणि शाश्वत स्वरूपाच्या कलामूल्यांची प्रातिष्ठापना करणे**

समीक्षा ही श्रेष्ठ व शाश्वत स्वरूपाच्या कलामूल्यांची प्रतिष्ठापना करत असते. एखादी कलाकृती तिच्यातील बाह्यगुणांमुळे प्रचंड गाजते. परंतु समीक्षक विवेकी दृष्टिकोनातून विचार करून अशा गाजलेल्या कलाकृतीत टाकाऊ काय टिकाऊ काय हे वाचकांच्या निर्दशनास आणून देतात. कलाकृतीमध्ये जी शाश्वत मूल्य आहेत त्यांची जोपासना केली जाते.

३) **प्रयोगशीलतेचे मर्म सांगणे**

कलाकृतीची निर्मिती कशी झाली. तिचा अविष्कार कसा झाला हे कलाकृतीच्या निर्मितीच्या संदर्भात लेखक सांगत नाही. लेखकाचा हा मुकेपणा समीक्षक उघड करतो. नवीन नवीन प्रयोग लेखक करीत असतो. हे सगळे प्रयोग वाचक वाचेलच असे नाही. त्यातील मर्म कळेलच असे नाही. अशावेळी समीक्षक या प्रयोगशीलचे मर्म उलगडून दाखवितात.

४) **रसिक मध्यस्थाची कामगिरी**

लेखक व वाचक (रसिक) यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे समीक्षक होय. कलाकृतीमध्ये कोणती सौंदर्यस्थळे आहे. प्रतिमा, प्रतिकांचा वापर कसा केला आहे. कलावंताच्या निर्मितीची कारणमीमांसा यांचा शोध समीक्षक घेत असतो. कलाकृतीतील रहस्यांचे उद्घाटन समीक्षक करीत असतो. म्हणजे समीक्षेची कामगिरी रसिक मध्यस्थांची आहे.

५) **कलाकृतीतील गूढ आणि अद्ययावत रहस्यांचा शोध**

सामान्य वाचकाला कलाकृतीतील गूढ उकलत नाही. अशा गूढाचा शोध घेऊन कलाकृतीतील गूढ सौंदर्याचा शोध घेण्यास वाचकाला मदत करण्याचे काम समीक्षा करते. उदा. 'नववधू प्रिया मी बावरते' या कवितेतील जीवा - शिवाचे मिलन. असे गूढ कळले तरच रसिक आस्वाद घेऊ शकतो.

६) **ऐतिहासिक दृष्टीने परमर्श घेणे**

एखादी विशिष्ट कलाकृती वाङमयप्रकाराच्या विकासावस्थेत कुठे आहे, याची चिकित्सा समीक्षा करते. ऐतिहासिक पद्धतीमुळे दोन कलाकृतीची तुलना करता येते. काळाच्या संदर्भात कलाकृतीचे योगदान स्पष्ट करण्याचे काम समीक्षा करते.

७)**लेखकाला घडविणे**

कलाकृती निर्दोष होण्यासाठी समीक्षा मदत करते. लेखकाच्या उणिवा शोधून काढून लेखक घडविण्याची जबाबदारी समीक्षक पार पडतो. तथापि केवळ दोष दिग्दर्शन न करता समीक्षा सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोण स्वीकारते. कलावंताला मार्गदर्शन करते.

८)**सामान्य वाचकांवर संस्कार करणे**

कलाकृती कशी आस्वादायची याबाबत मार्गदर्शन समीक्षक करतात. अभिरूची घडविण्याचे काम करतात. रसिकाची अभिरूची उंचावण्यासाठी प्रयत्न करतात. समीक्षेमुळे वाचकांवर योग्य संस्कार होतात.

९) **निर्दोष भूमिका**

समीक्षक साहित्य प्रांतात निर्माण झालेल्या वादाबाबत आग्रही राहतात. त्यामुळे वातावरण बिघडते. त्यासाठी कला व नीति यांची सांगड घालून वाङमयीन वातावरण स्वच्छ ठेवणे ही भूमिका समीक्षा ठेवते.

## समीक्षकाचे गुण

**१) टीकाकार सत्यप्रय असावा.**

**२) त्याच्या ठिकाणी मर्मग्राही बुद्धिमता व विश्लेषण कौशल्य असावे.**

**३) समीक्षकाकडे निर्णय देण्यासाठी युक्तिवाद व कणखरपणा पाहिजे.**

**४) समीक्षक सौजन्यशील व निरहंकारी असावा. त्याने शास्त्र, काव्य यांचे सूक्ष्म अवलोकन केलेले असावे. काव्यात नैपुण्य मिळविलेले असल्यामुळे त्याने सतत ज्ञान ग्रहण करावे. ज्ञानाच्या साहाय्याने आपला अभ्यास समृध्द करावा**

**५) तो निः पक्षपाती असावा**

६) साहित्यशास्त्रतील विविध प्रणालीचे ज्ञान असणारा हवा.

७) स्वतंत्र बुद्धीचा असावा

८) वाङ्मयातील निरनिराळ्या परंपरांचे व संप्रदायाचे ज्ञान मिळवून एखाद्या ज्ञानाच्या क्षेत्रात त्याने अद्ययावत असावे. त्याचबरोबर इतर ज्ञानशाखाचा परिचय त्याला असावा.

९) स्वत:च्या अभिरूचीला वळण लावण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ असावे.

१०) तो केवळ दोष दिग्दशन करणारा नसावा. त्याच्या अभिमानाला विवेकाची जोड असावी.

११) समीक्षकाने वैयक्तिक स्वरूपाची टीका करू नये.

१२) समीक्षकाने दिलेली माहिती व संदर्भ सदोष असावेत.

✞✞✞✞

## घटक ‘ग’

# वस्तुनिष्ठ प्रश्न- उत्तरे

१) **शब्द आणि अर्थ यांचे साहितत्व म्हणजे काव्य असे कोणी म्हटले आहे. (“शब्दार्थी सहितौ काव्यम्।।”)**

उत्तर- भामह

२) **खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्य असे कोणी म्हटले आहे. (“ननु शब्दाथौ काव्यम्।।”)**

उत्तर- रुद्रट

३) **कवी दण्डीने काव्याची व्याख्या कशी केली आहे.**

उत्तर- इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशरीर अशी व्याख्या केलेली आहे. (“शरीर ताव दिष्टर्थव्यवच्छिन्ना पदावली.”)

४) **“रीती : आत्मा का व्यवस्था ।।” ही व्याख्या कोणाची ?**

उत्तर- ही व्याख्या कवी वामनाची आहे.

५) **दोषरहित, गुणयुक्त, क्वचित स्फूट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य असे कोणी म्हटले .**

उत्तर- मम्मट

६) **“रमणीयार्थ प्रातिपादनः शब्दः काव्यम्।।” ही व्याख्या कोणी दिली (रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य)**

उत्तर- पंडित जगन्नाथ

७) **“अर्थ क्रियोपेतम् काव्यम् ” अशी काव्याची व्याख्या कोणी केली आहे.**

उत्तर- भरतमुनी

८) **“शब्दाथौ सहितौ काव्यम्।।” ही व्याख्या कोणाची?**

उत्तर- भामह

९) **कवी राजशेखर यांची काव्याची व्याख्या सांगा**

उत्तर- “वाक्य रसात्मक काव्यात ” (रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य होय.)

१०) **“ध्वनी हाच काव्याचा आत्मा होय.” असे कोणी म्हटले**

उत्तर- आनंदवर्धन

११) **काव्याची लक्षणे सांगा.**

उत्तर- अलंकार, रिती, औचित्यविचार, वक्रोक्ति, रस, ध्वनी ही काव्याची लक्षणे आहेत.

१२) **क्षेमेंद्र यांनी कोणता विचार मांडला आहे.**

उत्तर- औचित्यविचार क्षेमेंद्राने मांडला आहे.

१३) **"काव्य म्हणजे संसृतिटीका" ही उक्ती कोणाची?**

उत्तर- मॅथ्यू अर्नोल्ड यांची होय.

१४) **आनंदानुभूतीचे वर्णन "ब्रम्हानंदसहोदर" अशा शब्दात कोणी केले.**

उत्तर- कवी विश्वनाथ यांनी केले आहे.

१५) **"प्रज्ञा नव नवोन्मेषशालीनी प्रतिभानम् " असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- भट्ट तौत यांनी म्हटले आहे.

१६) **अभिनवगुप्ताच्या मते प्रतिभेचे सामर्थ्य कशात आहे.**

उत्तर- त्यांच्या मत प्रतिभेचे सामर्थ्य "अपूर्व वस्तुनिर्माण क्षमतेत आहे."

१७) **प्रतिभेचे अलौकिकत्व कशात आहे.**

उत्तर- प्रतिभेचे अलौकिकत्व तिच्या विरलत्वात आहे.

१८) **"अपूर्ववस्तुनिर्माणक्षम प्रज्ञा" अशी प्रतिमेची व्याख्या कोणी केली आहे.**

उत्तर- अभिनवगुप्त यांनी प्रतिभेची अशी व्याख्या केलेली आहे.

१९) **साहित्यनिर्मितीकरीता प्रतिभेबरोबरच कोणत्या दोन महत्वपूर्ण घटकांची आवश्यकता असते.**

उत्तर- बहुश्रुतता आणि अभ्यास या दोन घटकांची आवश्यकता असते

२०) **"प्रतिभा ही वेडाची बहीण आहे " ते मत कोणी मांडले.**

उत्तर- इटालियन संशोधक लोंब्रोसो याने माडले.

२१) **प्रतिभेचे कोणते दोन प्रकार कवी दण्डीने सांगितले आहेत.**

उत्तर- कवी दण्डी यांनी प्रतिभेचे नैसर्गिक आणि पूर्ववासना गुणानुबन्धि असे दोन प्रकार सांगितले आहेत.

२२) **मम्मटाने प्रतिभेला काय म्हटले आहे.**

उत्तर- मम्मटाने प्रतिभेला "शक्ती" म्हटले आहे.

२३) **रुद्रटाच्या मते प्रतिभा किती आणि कोणत्या प्रकारची आहे.**

उत्तर- रुद्रटाच्या मते दोन प्रकारची आहे. एक सहज व दुसरी उत्पाद्य

२४) **प्रतिभेचा प्राण कशाला म्हटले आहे.**

उत्तर- प्रभावी कल्पनाशक्तीला प्रतिभेचा प्राण म्हटले आहे.

२५) **“कवित्वबीजरुपी विशिष्ट संस्कार म्हणजे प्रतिभाशक्ती” असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- कवी मम्मटाने म्हटले आहे.

२६) **“उत्स्फूर्त भावनांचा तीव्र आविष्कार म्हणजे काव्य ” अशी काव्याची व्याख्या कोणी केली**

उत्तर- ही व्याख्या इंग्लिश कवी वर्डस्वर्थ यांनी केली.

२७) **मम्मटाने काव्याची कोणती प्रयोजने सांगितली आहेत.**

उत्तर- यश, कीर्ती, पैसा, अशुभनिवारण, व्यवहारज्ञान आणि कांता समित उपदेश ही प्रयोजने सांगितली आहेत.

२८) **डॉ. ब्रॅडले यांच्या मते कलेचे प्रयोजन कोणते?**

उत्तर- डॉ. ब्रॅडले यांच्या मते आत्माविष्कार हेच कलेचे प्रयोजन होय.

२९) **“ध्वन्यालोक” या ग्रंथाचा कर्ता कोण**

उत्तर- “ध्वन्यालोक” या ग्रंथाचा कर्ता आंनदवर्धन आहे.

३०) **शब्दाच्या तीन शक्ती कोणत्या?**

उत्तर- अभिधा, लक्षण, व्यंजना ह्या शब्दाचा तीन शक्ती आहेत

३१) **अभिधाशक्ती म्हणजे काय?**

उत्तर- एखादा शब्द उच्चारताच विशिष्ठ आकृतीची वस्तु आपल्या नजरेपुढे येते शब्दांच्या ठिकाणी ही जी शक्ती असेल ती आभिधाशक्ती होय

३२) **वाच्यार्थ म्हणजे काय**

उत्तर- अभिधाशक्तीमुळे शब्दांना जो अर्थ प्राप्त होतो तो वाच्यार्थ होय.

३३) **लक्षणाशक्ती म्हणजे काय**

उत्तर- एखादे वाक्य किंवा शब्द उच्चारल्याबरोबर त्याचा अर्थ पटकन कळत नाही तेव्हा वेगळ्याच शक्तीचा जास्त आश्रय घ्यावा लागतो ही लक्षणा शक्ती होय,

३४) **लक्ष्यार्थ म्हणजे काय**

उत्तर- लक्षणाशक्तीने व्यक्त केलेला अर्थ म्हणजे लक्ष्यार्थ होय.

३५) **व्यंगार्थ म्हणजे काय**

उत्तर- वाक्यतून सूचित होणारा अर्थ म्हणजे व्यंग्यार्थ होय.

३६) **व्यंजनेचे मुख्य दोन प्रकार लिहा.**

उत्तर- (अ) शाब्दी व्यंजना(ब) आर्थी व्यंजना

३७) **निरुढा लक्षणा कधी होते.**

उत्तर- मुळातील लक्ष्यार्थ पुढे वाच्यार्थ बनला की निरुढा लक्षणा होते,

उदा. मुळचा कुशल पुढे चतुर झाला.

३८) **लक्षणेचे सहा प्रकार कोणते**

उत्तर- सारोपा, साध्यवासना, उपादान, लक्षणलक्षणा, शुध्द, गौणी इ.

३९) **वस्तुध्वनी म्हणजे काय**

उत्तर- वाच्यार्थातून व्यक्त होणारा ध्वन्यर्थ जेव्हा केवळ वस्तुचा आवि करतो तो वस्तुध्वनी होय. (उदा. सूर्य अस्तासा गेला)

४०) **अलंकार ध्वनी कधी होतो.?**

उत्तर- व्यंग एखाद्या अलंकाराच्या रुपाने जेव्हा व्यक्त होते तेव्हा अंलकार ध्वनी होतो.

४१) **पार्वती आपल्या हातातील कमळाच्या पाकळ्या मोजू लागले हे कोणत्या ध्वनीचे उदाहरण आहे.**

उत्तर- रसध्वनीचे उदाहरण आहे.

४२) **विश्वनाथाने केलेली काव्याची व्याख्या लिहा.**

उत्तर- रसात्मकं वाक्य काव्यम्

४३) **भरताचे रससूत्र लिहा.**

उत्तर- विभावानुभावव्यभिचारिसंयोगात रसनिष्पति

४४) **चित्तवृत्ती म्हणजे काय?**

उत्तर- चित्तवृत्ती म्हणजे भाव होय.

४५) **चित्तवृत्तीची निर्मिती कोठे होते?**

उत्तर- चित्तवृत्तीची निर्मिती लौकिक जीवनात होते.

४६) **नाट्यामध्ये नटाचे कार्य कोणते?**

उत्तर- चित्तवृत्तीचा अभिनय करणे हे नाट्यामध्ये नटाचे कार्य आहे

४७) **नाट्यभाव म्हणजे काय?**

उत्तर- नाट्यात नटाच्या अभिनयाने अभिनीत होणारे भाव म्हणजेच नाट्यभाव होय.

४८) **गौणी लक्षणेचे दोन प्रकार कोणते?**

उत्तर- सारोपा आणि साध्यवसाना हे गौणी लक्षणेचे दोन प्रकार आहेत.

४९) **शुद्ध लक्षणेचे चार प्रकार कोणते?**

उत्तर- सारोपा, साध्यवसाना, उपादान (अज हल्लक्षणा) लक्षण लक्षणा (जह लक्षणा) हे चार प्रकार होत.

५०) **लौकिक जीवनात भाव कशामुळे निर्माण होतात.**

उत्तर- लौकिक जीवनात भाव हे कारण, कार्य आणि इतर सहचर गोष्टीमुळे निर्माण होतात.

५१) **नाट्यात रस निर्माण होतो काय?**

उत्तर- नाही, नाटयात रसाची निष्पत्ती होते.

५२) **नाट्यातील भाव लौकिक असतात की अलौकिक**

उत्तर- नाट्यातील भाव हे अलौकिक असतात.

५३) **नाट्यात रसनिष्पत्ती कशामुळे होते ?**

उत्तर- नाट्यात रसनिष्पत्ती विभाव, अनुभाव व व्यभिचारीभाव यांच्या संयोगाने होते.

५४) **विभाव म्हणजे काय?**

उत्तर- लौकिक जीवनातील व्यक्तीच्या किंवा प्रियकर-प्रेयसीच्या जीवनात निर्माण होणारे भाव जेव्हा नाट्यात जातात ते विभाव होत.

५५) **अनुभाव म्हणजे काय?**

उत्तर- विशिष्ट कारणामुळे नट-नटीच्या शरीरावर जे दृष्य परिणाम दिसू लागतात ते अनुभाव होत.

५६) **व्यभिचारी भाव म्हणजे काय?**

उत्तर- लौकिक प्रियकर - प्रेयसीच्या ठिकाणी निर्माण होणारे भाव जेव्हा नाट्यातील नट-नटाच्या ठिकाणी निर्माण होतात ते व्यभिचारी भाव होत.

५७) **नाट्यातील नट-नटीचे भाव हे खरे असतात काय?**

उत्तर- नाही. नाट्यातील नट-नटीचे भाव हे कृत्रिम असतात.

५८) **नाट्यात नटाचे कार्य कोणते?**

उत्तर- चित्तवृत्तीचा अभिनय करणे हे नटाचे कार्य असते.

५९) **हर्ष आणि लज्जा प्रेयसीच्या ठिकाणी दिसणारी हे कोणते भाव**

उत्तर- सहचारी भाव होत.

६०) **विभावाचे दोन प्रकार कोणते?**

उत्तर- आलंबन विभाव व उद्दीपन विभाव हे दोन प्रकार आहेत.

६१) **लौकिक चित्तवृत्ती ह्या कशा असतात.**

उत्तर- लौकिक चित्तवृत्ती ह्या सुखदु:खात्मक असतात.

६२) **"नाट्ये एव रसः न तु लोके" असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- अभिनव गुप्त यांनी म्हटले आहे.

६३) **सहस्य नाट्यरसिक रसाचा आस्वाद कसा घेतो.**

उत्तर- सहस्य नाट्यरसिक नटामुळे विभावित आणि अभिनीत झालेल्या रसाचा आस्वाद घेतो.

६४) **आलंबनविभाव कशाला म्हणतात.**

उत्तर- विशिष्ट स्थायी भाव ज्या व्यक्तीवर अधिष्ठित होणार आहेत त्यांना आलंबनविभाव म्हणतात.

६५) **उद्दीपनविभाव म्हणजे काय.**

उत्तर- काव्यगत पात्राचे भाव ज्या कारणामुळे उद्दीपीत होतात. त्यांना उद्दीपन विभाग म्हणतात. उदा. कमळ, भ्रमर, उद्यान, बगीचा.

६६) **स्थायीभाव किती व कोणते**

उत्तर- स्थायीभाव आठ असून रति, हास, उत्साह, विस्मय, जुगुप्सा, क्रोध, करुणा हे आहेत.

६७) **व्याभिचारी भाव एकूण किती आहेत.**

उत्तर- व्याभिचारी भाव तेहतीस आहेत.

६८) **अष्ट सात्त्विक भाव कोणते आहेत.**

उत्तर- स्वेद, रोमांच, स्वरभेद, कंप, वैवर्ण्य, अश्रु, स्तंभ, प्रलय हे आहेत

६९) **भरतानी नाट्यात कोणते दोन भाव विचारार्थ घेतले आहेत.**

उत्तर- भरतानी नाट्यात भवन्ति आणि भावयन्ति हे दोन भाव विचार घेतले आहेत.

७०) **काव्याला आस्वाद्य बनविणारा भाव कोणता.**

उत्तर- काव्याला आस्वाद्य बनविणारा भाव म्हणजे भावयन्ति होय.

७१) **व्यक्तिविशिष्ट भाव कधी आस्वाद्य होतो.**

उत्तर- व्यक्तिविशिष्ट भाव जेव्हा साधारण्याच्या पातळीवर जातो तेव्हाच आस्वाद्य होतो.

७२) **भट्ट लोल्लट नावाच्या पंडिताने रसाचा कोणता सिध्दांत मांडला**

उत्तर- "उपचित स्थायी म्हणजे रस" हा सिध्दांत भट्ट लोल्लटाने मांडला

७३) **भट्ट लोल्लटाचा सिद्धांत कशावर आधारित आहे.**

उत्तर- भट्ट लोल्लटाचा सिध्दांत अख्यातिवादावर आधारित आहे.

७४) **भट्ट लोल्लटाने स्थायी भाव कोणाच्या ठिकाणी कल्पिलेले आहेत.**

उत्तर- काव्यगत नाट्यगत मूळ पात्राच्या ठिकाणी स्थायीभाव कल्पिले आहेत.

७५) **श्री शकुंकाच्या मते रसनिष्पती म्हणजे काय.**

उत्तर- श्री शंकुकाच्या मते रसनिष्पती म्हणजे रसाची अनुमित्ती होय

७६) **नैयायिकांचा भर कशावर आहे.**

उत्तर- नैयायिकांचा भर अनुमान प्रमाणावर आहे.

७७) **नाट्यगत भावाशी रसिकप्रेक्षक कशामुळे तन्मय पावतो.**

उत्तर- नाट्यगत भावाशी रसिकप्रेक्षक 'ह्द्यसंवादा' मुळे तन्मय पावतो.

७८) **अभिनवगुप्त यांनी रसाला काय म्हटले आहे.**

उत्तर- अभिनवगुप्त यांनी रसाला 'स्थायी विलक्षण' असे म्हटले आहे.

७९) **अभिनवगुप्ताच्या मते काव्यानंद म्हणजे काय**

उत्तर- रसिकाची आस्वादरुप स्वसंविदू चर्वणी म्हणजेच काव्यानंद होय.

८०) **अभिनवगुप्ताने चित्तवृत्तीचे वर्णन कोण्त्या शब्दात केलेले आहे.**

उत्तर- अभिनवगुप्ताने चित्तवृत्तीचे वर्णन 'हद्यसंवादात्मक तन्मयीभवन' या शब्दात केले आहे

८१) **रस हे सुखदु:खात्मक असतात हे मत रामचंद्र व गुणचंद्र यांनी कोणत्या ग्रंथात मांडले आहे.**

उत्तर- हे मत रामचंद्र व गुणचंद्र यांनी 'नाट्यदर्पण' या ग्रंथात मांडले आहे.

८२) **स्वायत्त तादात्म्य ही आपत्ती कोणी मांडली आहे.**

उत्तर- स्वायत्ता तादात्म्य ही उपपत्ती प्रा. द.के. केळकर यांनी मांडली आहे.

८३) **सविकल्प समाधीची कल्पना कोणाची आहे.**

उत्तर- सविकल्प समाधीची कल्पना न. चि. केळकर यांची आहे.

८४) **सहानुभूतीपूर्वक ताटस्थ ही कल्पना कोणी मांडली आहे.**

उत्तर- सहानुभूतीपूर्वक ताटस्थ ही कल्पना प्रा.रा.श्री.जोग यांनी मांडली आहे.

८५) **डॉ. माधवराव पटवर्धन यांनी काव्यस्वादकासाठी रसिकाच्या ठिकाणी कोणते ताटस्थ कल्पिले आहे.**

उत्तर- काव्यास्वादकासाठी रसिकाच्या ठिकाणी डॉ. माधवराव पटवर्धन या जिज्ञासू ताटस्थ कल्पिले आहे.

८६) **हर्बर्ट स्पेन्सरने कोणती उपपत्ती मांडली आहे.**

उत्तर- क्रीडानंदानी उपपत्ती हर्बर्ट स्पेन्सरने मांडली आहे.

८७) **अभिनवगुप्ताचे रसविध्ने किती सांगितली आहेत.**

उत्तर- अभिनवगुप्ताचे सात रसविध्ने सांगितली आहेत.

८८) **आय.ए.रिचर्डस या सौंर्द्यवादी शास्त्राने काव्यानंदाची कोणती उपपत्ती सांगितली आहे.**

उत्तर- 'समधातता' ही उपपत्ती आय.ए.रिचर्डस यांनी सांगितले आहे.

८९) **प्रेरणा संतुलनाचा सिध्दान्त कोणी लिहीला आहे.**

उत्तर- आय.ए.रिचर्डस यांनी प्रेरणा संतुलनाचा सिध्दांत लिहिला आहे.

९०) **भावना विरेचनाचा सिध्दांत कोणी मांडला आहे.**

उत्तर- भावना विरेचनाचा सिध्दांत ॲरिस्टॉटल यांनी मांडला आहे.

९१) **कवी वामन यांनी कोणता विचार मांडला आहे.**

उत्तर- कवी वामन यांनी रीती विचार मांडला आहे.

९२) **'कॅथॉर्सिस' म्हणजे काय.**

उत्तर- 'कॅथॉर्सिस' म्हणजेच भावनाविरेचन होय.

९३) **रीतीचे मुख्य प्रकार कोणते.**

उत्तर- वैदर्भी, गौडी आणि पंचाली असे रीतीचे तीन प्रकार आहेत.

९४) **वामनाचे रीतीने प्रकार कशानुसार मानले आहे.**

उत्तर- वामनाच्या रीतीचे प्रकार गुणभेदानुसार मानले आहेत.

९५) **वामनाने शब्दगुण किती मानले आहेत.**

उत्तर- वामनाने दहा शब्दगुण मानले आहेत.

९६) **वामनाने कोणते काव्यगुण सांगितले आहेत.**

उत्तर- ओज, प्रसाद, श्लेष, समता, समाधि, माधुर्य, सौकुमार्य, उदारता व अर्थव्यक्ती हे गुण सांगितले आहेत.

९७) **प्रतिमा म्हणजे काय?**

उत्तर- "अमूर्त कल्पनेचा किंवा एखाद्या संकल्पनेचा इंद्रियांना आवाहन करणारा आशय म्हणजे प्रतिमा होय."

**किंवा**

"प्रतिमा म्हणजे शब्दनिष्ठ चित्र, काव्यामध्ये संवेदनाना प्रतित करणारा भाग म्हणजे प्रतिमा होय."

९८) **"तिचे मुख म्हणजे जणू चंद्रबिबंच आहे." या वाक्यातील प्रतिमा ओळखा.**

उत्तर- "तिचे मुख्य म्हणजे जणू चंद्रबिबंच आहे" या वाक्यातील 'चंद्रबिंब' ही प्रतिमा आहे.

९९) **रुपक म्हणजे काय?**

उत्तर- "अनेक अवलोकन घटकांचे एका समर्थ प्रतिमेत होणारे संश्लेषण म्हणजे रुपक होय" हर्बर्ट रोड

१००) **ॲरिस्टॉटलची रुपकाबद्दलची व्याख्या लिहा.**

उत्तर- "विशिष्ठ वस्तूसाठी वापरल्या जाणाऱ्या नामाचे दुसऱ्या वस्तूचा निर्देश करण्यसाठी साधर्म्याद्वारे स्थलांतर होते यालाच रुपक म्हणतात"

१०१) **वाङ्:मय निर्मितीसाठी प्रतिभेबरोबरच कोणत्या दोन महत्वाच्या घटकांची गरज असते.**

उत्तर- बहुश्रुतता आणि अभ्यास या दोन घटकांची गरज असते.

१०२) **कोलरिजने कोणता सिध्दात मांडले आहेत.**

उत्तर- कोलरिजने कल्पनाशक्तीचा सिध्दात मांडला आहे.

१०३) **चमत्कृतीशक्ती म्हणजे काय?**

उत्तर- देशकालाची बंधनापासून मुक्त झालेली स्मरणशक्ती म्हणजे चमत्कृती शक्ती होय.

१०४) **मूल्य म्हणजे काय?**

उत्तर- "जे जे म्हणून एखाद्या मानवी आकांक्षाची तृप्ती करीत असेल ते मूल्य होय."

१०५) **कोलरिजने कल्पनाशक्तीचे कोणते दोन प्रकार मांडले आहेत.**

उत्तर- कोलरिजने कल्पनाशक्तीचे प्रथमश्रेणीची कल्पनाशक्ती आणि द्वितीय श्रेणीची कल्पनाशक्ती हे प्रकार मांडले आहे.

१०६) **उत्पेक्षण म्हणजे काय.?**

उत्तर- निर्जीव कल्पनांशी चाललेली क्रीडा म्हणजे उत्प्रेक्षण होय

१०७) कल्पनात्मक निर्मितीमध्ये कशाचा आविष्कार असतो.

उत्तर- चैतन्याचा व मानवी अंतःकरणाचा आविष्कार कल्पनात्मक निर्मितीमध्ये असतो.

१०८) **आस्वादक्रिया म्हणजे काय.?**

उत्तर- अर्थनिर्णयन व मूल्यमापन ह्या क्रियांच्या दरम्यान जी क्रिया चालते तिला आस्वादक्रिया म्हणतात.

१०९) **अनुकृतीचा सिध्दांत कोणी सांगितला आहे.**

उत्तर- ॲरिस्टॉटल आणि प्लेटो यांनी अनुकृतीचा सिध्दान्त सांगितला आहे.

११०) **वाङ्मयात कशाची अनुकृती केली जाते.**

उत्तर- वाङ्मयात मानवी भावना, मानवी स्वभाव व मानवी वर्तन यांची अनुकृती केली जाते.

१११) **कॅथर्सिस म्हणजे काय.?**

उत्तर- अंतःकरणामध्ये भीती आणि अनुकंपा (दया) या भावना जागृत करुन तुंबलेल्या भावनांचे विरचेन करणे म्हणजे कॅथर्सिस.

११२) **अर्थनिर्णयन म्हणजे काय.?**

उत्तर- एखाद्य कलाकृतीचे संपूर्ण सम्यक आकलन करुन घेणे म्हणजेच अर्थनिर्णयन होय.

११३) **'अभिनव भारती' ह्या ग्रंथाचा लेखक कोण?**

उत्तर- अभिनव भारती ह्या ग्रंथाचा लेखक अभिनवगुप्त आहे.

११४) **स्फूर्ती म्हणजे काय?**

उत्तर- प्रतिभावंताच्या निर्माणक्षमतेची उत्कट अवस्था म्हणजे स्फूर्ती होय.

११५) **उत्प्रेक्षा म्हणजे काय.**

उत्तर- कल्पनांचा स्वैर विहार म्हणजे उत्प्रेक्षा होय.

११६) **म्हाइंभट यांच्या मते प्रतिभा कशी आहे.**

उत्तर- म्हाइंभटच्या मते प्रतिभा शंकराच्या तिसऱ्या डोळ्यासारखी आहे.

११७) **पंडित जगन्नाथ यांच्या मते प्रतिभा म्हणजे काय ?**

उत्तर- काव्यरचनेला अनूकूल अशा शब्दार्थांची रचना म्हणजे प्रतिभा होय.

११८) **समीक्षा म्हणजे काय?**

उत्तर- कलाकृतीतील गुणांची स्तुती करणे किंवा एखाद्या वस्तुचे यथार्थ अवलोकन करणे म्हणजे समीक्षा होय.

**किंवा**

कलाकृतीचा जाणकारपणे आस्वाद घेणे आणि आस्वादाच्या शोधातच अवश्य तेथे मूल्यमापन करणे म्हणजे समीक्षा .

११९) **काव्यात वर्णिलेल्या भावना रसिकाच्या चवर्णेचा विषय झाल्या की त्या कोणत्या पदवीस पोचतात?**

उत्तर- रसपदवीस पोचतात.

१२०) **प्रत्येक व्यक्तीच्या हृद्यात नित्य पण सुप्तावस्थेत असणारा भाव कोणता?**

उत्तर- स्थायीभाव होय.

१२१) **रसोत्पतीस मदत करणारे अस्थिर भाव कोणते?**

उत्तर- रसोत्पतीस मदत करणारे अस्थिर भाव हे संचारीभाव (व्याभिचारी) भाव होय.

१२२) **वाड्:मयीन टीका हा एक कधीही न संपणारा शोध आहे.असे कोणी म्हटले.**

उत्तर- वाड्:मयीन टीका हा एक कधीही न संपणारा शोध आहे, असे प्रा.वा.ल.कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

१२३) **आत्मविष्कार म्हणजे काय?**

उत्तर- स्वतःला आलेले अनुभव शब्दांच्या द्वारे व्यक्त करणे म्हणजे आत्मविष्कार होय.

**किंवा**

कला म्हणजे आत्माविष्कार होय. क्रोचे

१२४) **अलौकिक अशा काव्यानंदाला 'ब्रम्हनंद सहोदर' असे कोणी म्हटले**

उत्तर- अलौकिक अशा काव्यानंदाला कवी विश्वनाथ यांनी 'ब्रम्हनंद सहोदर' असे म्हणतात.

१२५) **रीती विचारात पदांच्या संघटनेला कोणी महत्व दिले.**

उत्तर- कवी विश्वनाथने रीतीविचारात पदांच्या संघटनेला महत्त्व दिले

१२६) **रसाला 'स्थायी विलक्षण' कोणी म्हटले.**

उत्तर- रसाला 'स्थायी विलक्षण' अभिनवगुप्ताने म्हटले आहे.

१२७) **“शब्दार्थो सहितौ काव्यम्।।” ही काव्याची व्याख्या कोणाची.**

**किंवा**

**“शब्दा आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य असे कोणी म्हटले आहे.”**

उत्तर-“शब्दार्थो सहितौ काव्यम्।।” ही काव्याची व्याख्या भामहाची आहे.

**किंवा**

“शब्दा आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य होय असे भामहाने म्हटले आहे.”

१२८) **“ननु शब्दार्थो सहितौ काव्याम्।।” ही काव्याची व्याख्या कोणी केली?**

उत्तर-“ननु शब्दार्शी काव्यम् ।।” ही काव्याची व्याख्या रुद्रटाने केली आहे.

१२९) **“खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य होय.” असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- “खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य होय.” असे रुद्रटाने म्हटले आहे.

१३०) **“रीती हाच काव्याचा आत्मा होय.” असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- “रीती हाच काव्याचा आत्मा होय.” असे वामनाने म्हटले आहे.

१३१) **“रमणीयार्थ प्रतिपादन:शब्द :काव्यम् ।।” ही व्याख्या कोणाची**

उत्तर- “रमणीयार्थ प्रतिपादन : शब्द काव्यम् ।।” ही व्याख्या जगन्नाथाची आहे.

१३२) **“रमणायार्थ प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य होय. असे कोणी म्हटले आहे.”**

उत्तर- “रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य होय.” असे जगन्नाथाने म्हटले आहे

१३३) **“दोषरहित, गुणयुक्त, क्वचित स्फूट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य असे कोणी म्हटले.”**

उत्तर- “दोषरहित, गुणयुक्त, क्वचित स्फूट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य असे मम्मटाने म्हटले आहे.”

१३४) **“कवीची अनूभूती व्दिपदात्मक असते” असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- “कवीची अनूभूती व्दिपदात्मक असते ” असे बा.सी. मर्ढेकर यांनी म्हटले आहे.

१३५) **सर्व अलंकाराचे बीज कशात आहे.**

उत्तर- सर्व अलंकाराचे बीज वक्रोक्तीत आहे.

१३६) **कवीच्या वैशिष्टपूर्ण शब्दयोजनेला काय म्हणतात?**

उत्तर- कवीच्या वैशिष्टपूर्ण शब्दयोजनेला कविव्यापार म्हणतात.

१३७) **काव्यात सौंदर्य कशामुळे प्रगट होते.**

उत्तर- काव्यात सौंदर्य कवीच्या वैशिष्टपूर्ण शब्दार्थयोजनेमुळे प्रगट होते.

१३८) **अलंकारामुळेच काव्याला काव्यप्रतिष्ठा प्राप्त होते असे कोणी म्हटले आहेत.**

उत्तर- अलंकारामुळेच काव्याला काव्यप्रतिष्ठा प्राप्त होते, असे वामनाने म्हटले आहे

१३९) **"काव्येडपि सर्वो नाट्यायमान एवार्थः" असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- "काव्येडपि सर्वो नाट्यायमान एवार्थ :" असे अभिनवगुप्त यानी म्हटले आहे.

१४०) **भामहाच्या मते कवी व्यापाराच्या मूळाशी कोणते तत्व असतो.**

उत्तर- भामहाच्या मते कवी व्यापाराच्या मूळाशी वक्रोक्ति हेच तत्व असते.

१४१) **वक्रोक्तिमुळे सामान्य शब्दार्थांचे काय होते.**

उत्तर- वक्रोक्तिमुळे सामान्य शब्दार्थांचे विभावन होते.

१४२) **अतिशयोक्ति म्हणजे काय.**

उत्तर- अतिशयोक्ति म्हणजे सर्वसामान्याहून वेगळी अशी बोलण्याची पध्दती होय.

१४३) **कवीची वाणी कशी असते.**

उत्तर- कवीची वाणी विदग्ध असते.

१४४) **भामहाने विदग्धोक्तीला काय म्हटले आहे.**

उत्तर- भामहाने विदग्धोक्तीला 'लोकातिक्रांतगोचर' म्हटले आहे.

१४५) **कुंतक वक्रोक्तीला काव्याचे काय मानतो.**

उत्तर- कुंतक वक्रोक्तीला काव्याचे जीवित मानतो.

१४६) **वक्रोक्ती म्हणजे काय?**

उत्तर- विदग्ध लोकांची बोलण्याची पध्दती म्हणजे वक्रोक्ती होय.

१४७) **काव्य किंवा नाटकांचे उद्दिष्ट काय असते.**

उत्तर- लोकस्वभावाचे चित्रण करणे हेच काव्य आणि नाटकांचे उद्दिष्ट असते.

१४८) **'पदरचना म्हणजे शब्दार्थांची'सौंदर्यपूर्ण योजना होय असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- 'पदरचना म्हणजे शब्दार्थाची सौंदर्यपूर्ण योजना होय' असे वामनाने म्हटले आहे.

१४९) **"विशिष्ट पदरचना रीतीः" अशी काव्याची व्याख्या कोणी केली.**

उत्तर- "विशिष्ट पदरचना रीतीः" अशी काव्याची व्याख्या वामनाने केली आहे.

१५०) **औचित्य म्हणजे काय.**

उत्तर- रसाचा उत्कर्ष साधणारी अलंकारांची योजना म्हणजे अैचित्य होय.

१५१) **काव्यात औचित्याला अत्यंत महत्वाचे स्थान कोणी दिले आहे.**

उत्तर- काव्यात औचित्याला अत्यंत महत्वाचे स्थान क्षेमेद्रांने दिले आहे.

१५२) **क्षेमेंद्राने कोणता सिध्दान्त मांडला आहे.**

उत्तर- क्षेमेंद्राने औचित्याला अत्यंत महत्वाचे स्थान क्षेमेंद्राने दिले आहे.

१५३) **अनौचित्य म्हणजे काय.**

उत्तर- वस्तुसुंदर असूनही तिची अयोग्य ठिकाणी योजना केल्यास सौंदर्यहानी होते तेच अनौचित्य होय.

१५४) **"रसध्वनीचा उत्कर्ष साधणारी शब्दार्थांची रचना म्हणजे औचित्य" असे म्हणतात.**

उत्तर- "रसध्वनीचा उत्कर्ष साधणारी शब्दार्थांची रचना म्हणजे औचित्य" असे आनंदवर्धनाने म्हटले आहे.

१५५) **" शब्दार्थो सहितौ काव्यम् " किंवा (शब्दार्थाचा यथोचित सहभाव म्हणजे काव्य) ही व्याख्या कोणती आहे.**

उत्तर- "शब्दार्थो सहितौ काव्यम् " किंवा (शब्दार्थाचा यथोचित सहभाव म्हणजे काव्य) ही व्याख्या राजशेखर यांची आहे.

१५६) **"रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य"**

**किंवा**

**"वाक्य रसात्मक काव्यम्" ही व्याख्या कोणी केली आहे.**

उत्तर- ही व्याख्या विश्वनाथाने केली आहे.

१५७) **कवी भोजाने काव्यलक्षणात कोणत्या चार घटकांचा समावेश केला आहे.**

उत्तर- कवी भोजाने रस, अलंकार, गुण आणि निर्दोषता या चार घटकाचा समावेष केला आहे.

१५८) **"ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे " हा विचार कोणाचा**

उत्तर- "ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे " हा विचार आनंदवर्धन आहे.

१५९) **लैकिक जीवनातील भावानुभव कसे असतात.**

उत्तर- लैकिक जीवनातील भावानुभव सुखदु:खात्मक असतात.

१६०) **कविव्यापार रसप्रतीती कशामुळे होते.**

उत्तर- कविव्यापार रसप्रतीती व्यंग्र्थामुळे येते.

१६१) **व्यंग्यार्थ किंवा ध्वन्यर्य म्हणजे काय?**

उत्तर- शब्दांच्या वाच्यार्थाहून वेगळाच असा जो रमणीय अर्थ सूचित होतो तोच व्यंगार्थ किंवा ध्वन्यर्य होय.

१६२) **आनंदवर्धनाने काव्याचे आत्मपद कोणाला दिले आहे.**

उत्तर- आनंदवर्धनाने काव्याचे आत्मपद प्रतीयमान अर्थाला दिले आहे.

१६३) **ध्वन्यार्थाल पर्यायी शब्द कोणता.**

उत्तर- ध्वन्यार्थाल पर्यायी शब्द "प्रतीयमान" आहे.

१६४) **"इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्य" ही व्याख्या कोणाची आहे.**

उत्तर- "इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्य" ही व्याख्या दण्डीची आहे.

१६५) **"रितिरात्मा काव्यस्य ।।" ही काव्याची व्याख्या कोणी केली आहे.**

उत्तर- " रितिरात्मा काव्यस्य।।" ही काव्याची व्याख्या वामनाने केली आहे.

१६६) **रिति म्हणजे काय**

उत्तर- प्रसाद - माधुर्यादी गुणांनी युक्त अशी पदरचना म्हणजे रिति होय.

१६७) **रस म्हणजे काय.**

उत्तर- नाट्य-काव्यातील भावानुभूतीच्या प्रत्ययालाच रस असे म्हणतात.

१६८) **नाट्यातील आशय रसिकापर्यंत कोणत्या माध्यमातून पोहचतो.**

उत्तर- नाट्यातील आशय रसिकापर्यत नटांच्या माध्यमातून पोहचतो.

१६९) **नाट्यातील भावानुभव कोणाच्या मार्फत आविष्कृत होतो.**

उत्तर- नाट्यकाल भावानुभव नट-नटीच्या मार्फत आविष्कृत होतो.

१७०) **मम्मटाने काव्याची किती प्रयोजने सांगितली आहेत.**

उत्तर- मम्मटाने काव्याची सहा प्रयोजने सांगितली आहेत.

१७१) **काव्यानंदाचे वर्णन अभिनवगुप्ताने कोणत्या शब्दात केले आहे.**

उत्तर- काव्यानंदाचे वर्णन अभिनवगुप्ताने "प्रतीतिपर्यवयासी " किंवा "विश्रांतीकारिणी" अशा शब्दात केले आहे.

१७२) **विश्वनाथाने काव्यातील आंनदानुभूतीचे वर्णन कोणत्या शब्दात केले आहे.**

उत्तर- विश्वनाथाने काव्यातील आंनदनुभूतीचे वर्णन "ब्रम्हानंदसहोदर" या शब्दात केले आहे.

१७३) **कवीची किंवा लेखकाची प्रमुख प्रेरणा कोणती असते.**

उत्तर- कवीची किंवा लेखकाची प्रमुख प्रेरणा आत्माविष्कार व कल्पनात्मक नवनिर्मिती हीच असते.

१७४) **काव्यनिंर्मिती कोणती तीन कारणे मम्मटाने सांगितले आहेत.**

उत्तर- शक्ती, निपुणता, अभ्यास ही तीन कारणे काव्यनिर्मितीची मम्मटाने सांगितली आहेत.

१७५) **आभिनवगुप्ताच्या मते प्रतिभेचे सामर्थ्य कशात आहे.**

उत्तर- आभिनवगुप्ताच्या मते प्रतिभेचे सामर्थ्य तिच्या "अपुर्ववस्तुनिर्माण क्षमतेत" आहे.

१७६) **आनंदवर्धनाने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव सांगा.**

उत्तर- आनंदवर्धनाने 'ध्वन्यालोक' ग्रंथ लिहिला.

१७७) **प्रतिभेचे अलौकिकत्व कशात आहे.**

उत्तर- प्रतिभेचे अलौकिकत्व विरलत्वात आहे.

१७८) **अभिधाशक्तीने कळणाऱ्या शब्दाच्या अर्थास काय म्हणतात**

उत्तर- अभिधाशक्तीने कळणाऱ्या शब्दाच्या अर्थास आभिधार्थ म्हणतात.

१७९) **शब्द उच्चारल्यानंतर तात्काळ होणाऱ्या अर्थबोधास काय म्हणतात.**

उत्तर- शब्द उच्चारल्यानंतर तात्काळ होणाऱ्या अर्थबोधास वाच्यार्थ म्हणतात.

१८०) **छंद म्हणजे काय.**

उत्तर- **नियमबध्द पदय प्रकार म्हणजे छंद होय.**

१८१) **उद्दिपन म्हणजे काय**

उत्तर- मानवी मनातील भावना ज्या कारणामूळे उद्दीपीत होतो तो उद्दीपन विभाव होय.

१८२) **रुद्रटाने प्रतिभेचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत.**

उत्तर- रुद्रटाने प्रतिभेचे सहसा आणि उत्पात्य हे दोन प्रकार सांगितले आहेत.

१८३) **भट्टलोल्लटाने स्थायीभाव कोणाच्या ठिकाणी कल्पिले आहेत.**

उत्तर- भट्टलोल्लटाने स्थायीभाव नाट्यगत नायक-नायिकांच्या ठिकाणी कल्पिले आहेत.

१८४) **स्थायीभाव म्हणजे काय.**

उत्तर- मानवी मनात कायम स्थिर असणारे भाव म्हणजे स्थायीभाव होय.

**किंवा**

विरुध्द अथवा अविरुध्द भावांनी ज्याच्या विच्छेद होत नाही तो भाव म्हणजे स्थायीभाव होय.

१८५) **अभिनवगुप्ताने किती रसविध्ने सांगितली आहेत.**

उत्तर- अभिनवगुप्ताने सात रसविध्ने सांगितली आहेत.

१८६) **रीतिने मुख्य प्रकार कोणते.**

उत्तर- विदर्भी, गौडी, पांचाली हे रीतिचे मुख्य प्रकार आहेत

१८७) **राजशेखरने प्रतिभेचे कोणते प्रकार सांगितले आहेत.**

उत्तर- कारयत्री व भावयत्री असे दोन प्रकार सांगितले आहेत.

१८८) **"अनिर्वेद" या काव्याकारणाचा अर्थ लिहा.**

उत्तर- निर्विह किंवा भावरहितता हा "अनिर्वेद" या काव्याकारणाचा अर्थ आहे.

१८९) **सर्जन अनुकृतीची कल्पना कोणी मांडली.**

उत्तर- ॲरिस्टॉटलनी सर्जक अनुकृतीची कल्पना मांडली आहे

१९०) **वाड्:मयीन मूल्यमापनाचे दोन प्रकार कोणते**

उत्तर- जीवनवादी आणि कलावादी असे वाड्:मयीन मूल्यमापनाचे दोन प्रकार आहेत.

१९१) **समीक्षाव्यापाराची परिणती कशात होते.**

उत्तर- समीक्षाव्यापाराची परिणती शब्दांकनात होते.

१९२) **प्रीती व कीर्ती ही काव्यप्रयोजने कोणी सांगितली आहेत.**

उत्तर- प्रीती व कीर्ती ही काव्यप्रयोजने भामहाने सांगितली आहेत.

१९३) **आभिनवगुप्ताने रसप्रक्रियेस काय म्हटले आहे.**

उत्तर- आभिनवगुप्ताने रसप्रक्रियेस 'स्थायी विलक्षण' म्हटले आहे.

१९४) **"अपूर्व वस्तुनिर्माण क्षमा प्रज्ञा प्रतिभा" असे कोणी म्हटले आहे.**

उत्तर- "अपूर्व वस्तुनिर्माण क्षमा प्रज्ञा प्रतिभा" असे अभिनवगुप्ताने म्हटले आहे.

१९५) **गौणी लक्षणा म्हणजे काय**

उत्तर- गुण सादृश्यामुळे होणाऱ्या लक्षणेस गैणी लक्षणा म्हणतात.

१९६) **शब्दशक्ती म्हणजे काय?**

उत्तर- शब्दाच्या  ठिकाणी अर्थ व्यक्त करण्याची जी शक्ती असते ती शब्दशक्ती होय.

१९७) **उपादन लक्षणा दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखली जाते.**

उत्तर- उपादान लक्षणा अजहल्ल,  अजहतस्वार्थी लक्षणा नावाने ओळखली जाते.

१९८) **अनुभाव म्हणजे काय**

उत्तर- शरीरावरील प्रकट भाव म्हणजे अनुभाव होय.

१९९) **सहचारी भाव म्हणजे काय**

उत्तर- रती भावनेच्यावेळी प्रकट होणारे हर्ष आणि ग्लानां हे सहचारी भाव आहेत.

२००) **ॲरिस्टॉटलच्या साहित्यविषयक ग्रंथाचे नाव सांगा**

उत्तर- 'पोएटिक्स' / काव्यशास्त्र ॲरिस्टॉटलच्या साहित्यविषयक ग्रंथाचे नाव आहे.

२०१) **क्षेमेन्द्राने "औचित्याची" केलेली व्याख्या लिहा.**

उत्तर- "उचितस्य" भाव म्हणजे औचित्य होय.

२०२) **कॅथार्सिस या संकल्पनेच्या बुचरने सांगितलेला अर्थ कोणता?**

उत्तर- कॅथर्सिस या संकल्पनेच्या बुचरने सांगितलेला अर्थ विशुध्दीकरण होय.

२०३) **शृगांररसाचा स्थायीभाव कोणता?**

उत्तर- शृगांररसाचा स्थायीभाव रती आहे.

२०४) **अभिधा म्हणजे काय?**

उत्तर- पद आणि पदअर्थ यांच्या ठिकाणी असलेल्या वाच्य-वाचक संबंध म्हणजे अभिधा होय.

२०५) **दंण्डी केलेली अलंकाराची व्याख्या लिहा.**

उत्तर- "काव्यशोभा कारनाम । धर्माने अलंकारम् प्रच्यक्षते।"

२०६) **शब्दांना संकेताने प्राप्त होणाऱ्या अर्थास काय म्हणतात.**

उत्तर- शब्दांना संकेताने प्राप्त होणाऱ्या अर्थास संकेतार्थ म्हणतात.

२०७) **काव्यातील ध्वन्यर्थाला आंनदवर्धनाने उपयोजिलेला प्रतिशब्द कोणता.**

उत्तर- काव्यातील ध्वन्यर्थाला आंनदवर्धनाने " प्रतीयमान" प्रतिशब्द योजला आहे.

२०८) **संस्कृत साहित्यमीमांसकानी काव्यानंदाचे वर्णन कोणत्या शब्दात केले आहे.**

उत्तर- “ब्रह्मास्वादसहोदर” या शब्दात संस्कृतसाहित्यमीमांसकानी काव्यानंदाचे वर्णन केले आहे.

२०९) **ललित लेखनासाठी राजशेखराने कोणता शब्द उपयोजिला आहे.**

उत्तर- ललित लेखनासाठी राजशेखराने प्रतिभासनिबंधन हा शब्द उपयोजिला आहे.

२१०) **व्यभिचारीभावासाठी दुसऱ्या कोणता प्रतिशब्द आहे.**

उत्तर- संचारीभाव हा प्रतिशब्द व्यभिचारीभावासाठी आहे.

२११) **भरतमुनीनी सांगितलेले साहित्य प्रयोजन लिहा.**

उत्तर- श्रमिक-दु:खी लोकांना विश्रांती मिळवून देणे हे साहित्याचे प्रयोजन भरतमुनींनी सांगितले आहे.

२१२) **रसास्वादकात रसिकाच्या होणाऱ्या मनोवस्थेचे वर्णन अभिनव गुप्ताने कोणत्याही शब्दात केले आहे.**

उत्तर- “निर्विध्नस्वरुप विश्रांतिकारिणी ” या शब्दात रसास्वादकात रसिकाच्या होणाऱ्या मनोवस्थेचे वर्णन अभिनवगुप्ताने केले आहे.

२१३) **सहदय रसिक कोणत्या भावाचा आस्वाद घेतात?**

उत्तर- सहदय रसिक विभावित आणि अभिनीत भावाचा आस्वाद घेतात.

२१४) **नटाच्या आभिनयामुळे चित्तवृत्तीचे काय होते.**

उत्तर- नटाच्या आभिनयामुळे चित्तवृत्तीचे अभिनयन होते.

२१५) **रस निष्पती कशाच्या संयोगाने होते.**

उत्तर- ‘विभाग, अनुभाव आणि व्यभिचारीभाव यांच्या संयोगाने रसनिष्पती होते’

२१६) **स्थायीभावांना रसत्व कशामुळे प्राप्त होते**

उत्तर- विभावानुभावांनी स्थायीभावांना रसत्व प्राप्त होते

२१७) **रस:इति का पदार्थ या प्रश्नाचे उत्तर भरतमुनींनी कसे दिले आहे.**

उत्तर- “उच्चते आस्वाद्यत्वात।” असे उत्तर भरतमुनींनी दिले् आहे.

२१८) **रसिक प्रेक्षक कोणत्या स्थायीभावाचा आस्वाद घेतो.**

उत्तर- रसिक प्रेक्षक साधारणीभूत स्थायीभावाचा आस्वाद घेतो.

२१९) **भट्ट लोल्लटाने कोणता सिध्दांत मांडला आहे.**

उत्तर- भट्ट लोल्लटाने 'उपचित स्थायी' म्हणजे रस हा सिध्दांत मांडला आहे.

२२०) **भट्ट लोल्लटाने रससूत्राचा अर्थ कोणत्या वादाच्या आधारे दाखविला आहे.**

उत्तर- भट्ट लोल्लटाने रससूत्राचा अर्थ अख्यातिवादाच्या आधारे दाखविला आहे.

२२१) **"उपचित अथवा परिपुष्ट स्थायीभाव म्हणजे रस असे कोणी म्हटले आहे."**

उत्तर- "उपचित अथवा परिपुष्ट स्थायीभाव म्हणजे रस असे भट्ट लोल्लटाने म्हटले आहे."

२२२) **काव्यसृष्टीतील व्यापार कसा असतो.**

उत्तर- काव्यसृष्टीतील व्यापार प्रतितिपर्यवसायी असतो.

२२३) **भरतमुनींनी कोणते चार प्रमुख रस सांगितले आहेत.**

उत्तर- भरतमुनींनी शृगांर, वीर, बीभत्स, रौद्र हे चार प्रमुख रस सांगितले आहेत.

२२४) **भरतमुनींनी रसांची संख्या किती मानली आहे.**

उत्तर- भरतमुनींनी रसांची संख्या आठ मानली आहे.

२२५) **शब्दाचे अर्थ कशाने निश्चित होतात.**

उत्तर- शब्दाचे अर्थ संकेताने निश्चित होतात.

२२६) **विश्वनाथाने काव्याचे वर्णन कोणत्या शब्दात केले आहे.**

उत्तर- विश्वनाथाने काव्याचे वर्णन ब्रम्हानंद-सहोदर या शब्दात केले आहे.

२२७) **अभिनवगुप्ताच्या मते काव्यानंद म्हणजे काय?**

उत्तर- "रसिकाची आस्वादरुप स्वसंविद चर्वणा म्हणजेच काव्यानंद होय" असे अभिनवगुप्ताचे मत आहे.

२२८) **व्यक्तिगत अनुभूतीला रमरणीयत्व कधी प्राप्त होते.**

उत्तर व्यक्तिगत अनुभूतीला रमरणीयत्व साधारणीकरण झाल्यावरच प्राप्त होते.

२२९) **संभावनाविरह म्हणजे काय?**

उत्तर- संभावनाविरह म्हणजे कल्पनाशक्तीचा अभाव होय.

२३०) **रिचर्डसने कोणाची जीवनविषयक विचारधारा कलाव्यापाराला लावून दाखविली.**

उत्तर- कन्फ्युशिअसची जीवनविषयक रिचर्डसने विचारधारा कलाव्यापाराला लावून दाखविली आहे.

२३१) **ललित साहित्याचे प्रधान कार्य कोणते.**

उत्तर- भावनात्मक अनुभूतीचा आविष्कार हे ललित साहित्याचे प्रधान कार्य आहे.

२३२) **कवी दण्डीच्या मते प्रतिभेचे लेणे प्राप्त होणे हा कशाचा परिणाम आहे.**

उत्तर- कवी दण्डीच्या मते प्रतिभेचे लेणे प्राप्त होणे हा पूर्वजन्मीच्या संस्काराचा परिणाम आहे.

२३३) **भट्ट तौताने प्रतिभेची व्याख्या कशी केली आहे.**

उत्तर- "प्रज्ञा नव नवोन्मेषशालीनी प्रतिभा अशी भट्ट तौताने प्रतिभेची व्याख्या आहे."

२३४) **आंनदवर्धनाच्या मते तत्वार्थदर्शिनी बुध्दी म्हणजे काय.**

उत्तर- सुखदःखात्मक घटकांचे आकलन साधारण्याच्या पातळीवर करणारी रसिकाची बुध्दी म्हणजे तत्वार्थदर्शिनी बुध्दी होय.

२३५) **उत्प्रेक्षा म्हणजे काय.**

उत्तर- उत्प्रेक्षा म्हणजे कल्पनांचा स्वैर विहार होय.

२३६) **कोलरिजच्या मते उत्प्रेक्षण कोणते कार्य करते.**

उत्तर- कोलरिजच्या मते उत्प्रेक्षण ही निर्जीव कल्पनांशी चाललेली क्रीडा असते.

२३७) **कोलरिजच्या मते कल्पनात्मक निर्मितीमध्ये कशाचा आविष्कार असतो.**

उत्तर- कोलरिजच्या मते कल्पनात्मक निर्मितीमध्ये चैतन्याचा, मानवी अंतः करणाचा आविष्कार असतो.

२३८) **शब्द म्हणजे काय.**

उत्तर- कवीच्या अंतःकरणातील भाव प्रकट करण्यास समर्थ झालेल्या उच्चार म्हणजे शब्द

२३९) **सहितत्व म्हणजे काय.**

उत्तर- सहितत्व म्हणजे एकरुपता होय.

२४०) मम्मटांनी कोणती प्रयोजने सांगितली आहेत.

उत्तर- यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण, कांन्तासंम्मित उपदेश, आल्हाद ही प्रयोजने आहेत.

२४१) अलंकारध्वनी म्हणजे काय.

उत्तर- ज्या रचनेत अलंकार वाच्य नसतात पण सूचित असतात ती रचना म्हणजे अलंकारध्वनी होय.

२४२) रसध्वनी म्हणजे काय.

उत्तर- जेव्हा एखाद्य वर्णनातून आपोआप रस व्यक्त होतो तो रसध्नवी होय.

२४३) **ध्वनीचे किती प्रकार आहेत**

उत्तर- ध्वनीचे तीन प्रकार आहेत

२४४) **ध्वनीचे तीन प्रकार कोणते.**

उत्तर- अंलकार ध्वनी, रसध्वनी, वस्तुध्वनी असे तीन प्रकार आहेत

२४५) **रसाची कसोटी कोणती?**

उत्तर- आस्वाद्दता हीच रसाची कसोटी आहे.

२४६) **मीमांसकाच्यामते विश्व कसे आहे.**

उत्तर  मीमांसकाच्यामते विश्व सत्य आहे.

२४७)**भट्टलोल्लट हा कोणत्या दर्शनाचा प्रतिनिधी होता.**

उत्तर- भट्टलोल्लट हा मीमांसावादी दर्शनाचा प्रतिनिधी होता.

२४८) **"उपचित स्थायी म्हणजे रस"  असे मत कोणी मांडले आहे.**

उत्तर- "उपचित स्थायी म्हणजे रस"  असे मत भट्ट लोल्लटाने मांडले आहे.

२४९) **भट्टनायकाच्या मते रस कुठे आहे.**

उत्तर- भट्टनायकाच्या मते रस रसिकनिष्ठ आहे.

२५०) **समीक्षा म्हणजे काय?**

उत्तर- कोणत्याही कलाकृतीचे परिपूर्ण अवलोकन व सांगोपांग चिकित्सा म्हणजे समीक्षा होय.

२५१) **समीक्षेच्या मूळाशी कोणती प्रवृत्ती असते.**

उत्तर- अनूकुल किंवा प्रतिकूल व्यक्त करणे मानवाची स्वाभाविक प्रवृत्ती समीक्षेच्या मूळाशी असते.

२५२) **समीक्षक हा कलावंत व आस्वादक यामधील कोण असतो.**

उत्तर- समीक्षक हा कलावंत व आस्वादक यामधील जाणकार मध्यस्थ असतो.

२५३) **समीक्षकाची प्रतिक्षा कोणत्या स्वरुपाची असते.**

उत्तर- समीक्षकाची प्रतिक्षा आस्वाद घेणारीअसते.

२५४) **सर्वसाधारण वाचकांचा समीक्षक हा कोण असतो.**

उत्तर- समीक्षक हा सर्व वाचकांचा मार्गदर्शक असतो

१५५) **समीक्षेची अनेक अंगे कोणती.**

उत्तर- अवलोकन, आस्वाद, गुणदोषदर्शन, तुलना, चिकित्सा, मूल्यमापन सिद्धांत प्रस्थापन ही समीक्षाची अंगे आहेत.

२५६) **समीक्षकाचे मन कसे असते**

उत्तर- समीक्षकाचे मन विश्लेषक असते

२५७) **कलावंताचे मन कसे असते?**

उत्तर- कलावंताचे मन संश्र्लेषक असते

२५८) **प्रतिभावंत कलाकृतीच्या रुपाने कोणती प्रतिसृष्टी निर्माण करतो.**

उत्तर- प्रतिभावंत कलाकृतीच्या रुपाने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करतो.

२५९) **प्रतिभेमध्ये कोणत्या मानसिक शक्ती अंतर्भूत असतात.**

उत्तर- प्रतिभेमध्ये स्मृती, मती, प्रज्ञा या मानसिक शक्ती अंतर्भूत असतात.

२६०) **वाङ्मयातील नवरूपांचा शोध आणि नवनिर्मितीतील व्यापाराचे आकलन म्हणजे समीक्षा ही व्याख्या कोणी केली.**

उत्तर- दि. के. बेडेकर

| | **ग्रंथनाम** | **ग्रंथकार** |
|---|---|---|
| १) | नाट्यशास्त्र | भरतमुनी |
| २) | काव्यालंकार | भामह/ रुद्रट |
| ३) | काव्यालंकार (सूत्र्-वृत्ती) | वामन |
| ४) | काव्यादर्श | दण्डी |
| ५) | काव्यप्रकाश | मम्मट |
| ६) | ध्वन्यालोक | आनंदवर्धन |
| ७) | साहित्यदर्पण | विश्वनाथ |
| ८) | वक्रोक्तिजिवीत्म | कुंतल |
| ९) | औचित्यविचारचर्चा /कविकंठामरण | क्षेमेंद्र |
| १०) | रसगंगाधर | जगन्नाथ पडिंत |
| ११) | काव्यानुशासन | हेमचंद्र |
| १२) | ध्वन्यालोकलोचन | अभिनवगुप्त |
| १३) | काव्यामीमांसा | राजशेखर. |
| १४) | अलंकार सर्वस्व | रुय्यक |
| १५) | सरस्वती कंठाभरण | भोज |

✢✢✢✢

# नमुना प्रश्नपत्रिका कृ: एक
# साहित्यशास्त्र आणि साहित्यसमीक्षा

वेळ – ३तास गुण – १००

**सूचना :**१) उजवीकडील अंग गुण दर्शवितात.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

१. (अ) भरतमुनींच्या रससुत्राधारे साहित्यात रसनिर्मिती कशी होते ते विशद करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:-**
(१) प्लेटोची अनुकृतीची कल्पना
(२) क्षेमेन्द्राचा औचित्यविचार

२. (अ) वामनाचा रीतिविचार सविस्तर सांगा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा**:-
(१) रसध्वनी
(२) काव्यातील वक्रोक्ति

३. (अ) व्यंजना म्हणजे काय ते सांगून तिचे प्रकार उदाहरणासह लिहा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:-**
(१) काव्यातील वृत्तविचार
(२) साहित्याची भाषाः प्रतिमा

४. (अ) भारतीय साहित्यशास्त्रकारांनी सांगितलेले 'प्रतिभा' या काव्यकारणाचे स्वरूप विशद करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:-**
(१) कोलरिजचा चमत्कृतीशक्तीचा विचार
(२) अनिर्वेदः एक काव्यकारण

५. (अ) मम्मटाने सांगितलेल्या काव्यप्रयोजनांचा परिचय करून द्या. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:-**

(१) आत्माविष्कार : एक काव्यप्रयोजन
(२) भामहाचा काव्यप्रयोजनविचार

६. (अ) अभिनवगुप्ताच्या रसनिष्पत्तीविषयक मताचा सविस्तर परिचय करून द्या. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:-**

(१) रिचर्डचा 'प्रेरणासंतुलना'सिद्धांत
(२) संभावनाविरह : एक रसविघ्न

७. (अ) वाङ्मयीन अर्थनिर्णयन म्हणजे काय ते सांगून त्याचे समीक्षा व्यापारातील महत्त्व विशद करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:-**

(१) वाङ्मयीन मूल्यमापनाचे प्रकार
(२) समीक्षेची उद्दिष्टे

८. पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा (**कोणतीही १६**) १६

१) विश्वनाथाचे केलेली काव्याची व्याख्या द्या ?
२) 'ध्वन्यालोक' या ग्रंथाचा कर्ता कोण ?
३) कुंतकाने केलेली वक्रोक्तीची व्याख्या सांगा.
४) उपादान लक्षणा दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखली जाते.
५) अनुभाव म्हणजे काय ?
६) ॲरिस्टॉटलच्या साहित्यविषयक ग्रंथाचे नाव सांगा.
७) क्षेमेन्दाने केलेली 'औचित्या'ची व्याख्या लिहा.
८) 'कॅथार्सिस' या संकल्पनेचा बुचरने सांगितलेला अर्थ कोणता ?
९) शृंगाररसाचा स्थायीभाव सांगा.
१०) अभिधेची व्याख्या द्या.
११) राजशेखराने सांगितलेले प्रतिभेचे दोन प्रकार कोणते ?
१२) दंडीने केलेली अलंकारांची व्याख्या लिहा.

१३) शब्दांना संकेताने प्राप्त होणाऱ्या अर्थास काय म्हणतात ?

१४) काव्यातील ध्वन्यर्थाला आनंदवर्धनाने उपयोजिलेला प्रतिशब्द कोणता ?

१५) संस्कृत साहित्यमीमांसकांनी काव्यनंदाचे वर्णन कोणत्या शब्दात केले आहे ?

१६) विभावांचे प्रकार कोणते ?

१७) ललित लेखनासाठी राजशेखराने कोणता शब्द उपयोजिला आहे ?

१८) व्यभिचारी भावांसाठी उपयोजिला जाणारा प्रतिशब्द कोणता ?

१९) भरतमुनींनी सांगितलेले साहित्यप्रयोजन लिहा.

२०) रसास्वादकाली रसिकाच्या होणाऱ्या मनोवस्थेचे वर्णन अभिनवगुप्त कोणत्या शब्दात करतो ?

✞✞✞✞

# नमुना प्रश्नपत्रिका क्रः दोन
# साहित्यशास्त्र आणि साहित्यसमीक्षा

वेळ – ३तास गुण – १००

**सूचना :**१) उजवीकडील अंग गुण दर्शवितात.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

१. (अ) भरतमुनींचे रससूत्र स्पष्ट करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:**
(१) वक्रोक्तीचे प्रकार
(२) काव्यातील अलंकारांचे महत्त्व

२. (अ) ॲटिस्टॉटलचा, साहित्याच्या स्वरूपाविषयीचा विचार अनुकृतिसिद्धांताच्या आधारे स्पष्ट करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:**
(१) वस्तुध्वनि
(२) क्षेमेंद्राचा औचित्यविचार

३. (अ) शब्दशक्ति म्हणजे काय ते सांगून अभिधा शब्दशक्तीचे प्रकार व कार्य स्पष्ट करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:**
(१) काव्यातील मुक्तछंद
(२) काव्याची भाषा : रूपक

४. (अ) साहित्य निर्मिती प्रक्रियेमागील प्रतिभेचे स्वरूप साधार लिहा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:**
(१) कोलरिजप्रणित कल्पना शक्तीचे स्वरूप
(२) अभ्यासः एक काव्यकारण

५. (अ) भारतीय साहित्यशास्त्रातील काव्यप्रयोजनांचा थोडक्यात अढावा घ्या. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:**

(१) आत्मविष्कार : काव्यप्रयोजन

(२) मम्मट प्रणित कोणतीही तीन काव्यप्रयोजने.

६. (अ) आय.ए. रिचर्डस् यांचा प्रेरणा संतुलनाचा सिद्धांत विशद करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:**

(१) अभिनव गुप्ताची आत्मानु प्रवेशाची संकल्पना

(२) कॅथार्सिस : विशुद्धीकरणाची उपपत्ती

७. (अ) समीक्षा म्हणजे काय ते सांगून समीक्षेतील 'विश्लेषण' ही संकल्पना स्पष्ट करा. १२

**किंवा**

(आ) **टिपा लिहा:**

(१) वाङ्मयीन अर्थानिर्णयनाचे प्रकार

(२) समीक्षेचे कार्य

८. पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा (**कोणतीही १६**) १६

१) वामनाने कोणता सिद्धांत मांडला ?

२) आनंदवर्धनाने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव सांगा ?

३) प्रतिभेचे अलौकित्व कशात आहे.

४) अभिधाशक्तीने कळणाऱ्या शब्दांच्या अर्थास काय म्हणतात ?

५) छंद म्हणजे काय... ?

६) उद्दीपन विभाव म्हणजे काय ?

७) रूद्रटाने प्रतिभेचे कोणते दोन प्रकार सांगितलेले आहेत ?

८) भट्टलोल्लटाने स्थायीभाव कोणाच्या ठिकाणी कल्पिले आहेत.

९) स्थायीभाव म्हणजे काय ?

१०) अभिनव गुप्ताने किती रसविघ्ने सांगितलेली आहेत ?

११) रीतीचे मुख्य प्रकार कोणते ?

१२) 'अनिर्वेद' याकाव्यकारणाचा अर्थ लिहा.

१३) शब्दांना संकेताने प्राप्त होणाऱ्या अर्थास काय म्हणतात ?

१४) वाङ्मयीन मूल्यमापनाचे दोन प्रकार कोणते ?

१५) गौणी लक्षणा म्हणजे काय ?

१६) 'प्रतिभा ही वेडाची बहीण आहे' असे कोणी म्हटले आहे ?

१७) 'अपूर्व वस्तुनिर्माण क्षमाप्रज्ञा प्रतिभामता' असे कोणी म्हटले आहे ?

१८) अभिनव गुप्ताने रसप्रक्रियेस काय म्हटले आहे ?

१९) समीक्षा व्यापाराची परिणती कशात होते ?

२०) प्रीती व किर्ती ही काव्यप्रयोजने कोणी सांगितली आहेत ?

✞✞✞✞